मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : १४५ ■ सोमवार, ०१ /06/ २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514






मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : १४५ ■ सोमवार, ०१ /06/ २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514





















मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : १४५ ■ सोमवार, ०१ /06/ २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514
























युवक आधार



# 1 जून पासून वादळी पावसाचा अंदाज; शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये !

### 10 जून पर्यंत राज्यात मान्सूनच्या आगमनाची शक्यता नाही

दैनिक युवक आधार
महाराष्ट्र प्रतिनिधी

सध्या राज्यातील हवामानात बदल होण्यास सुरुवात झाली आहे, आणि 1जून पासून नाही. सध्याच्या स्थितीनुसार राज्यातील बहुतांश भागांमध्ये किमान10 जून पर्यंत मान्सूनच्या आगमनाची शक्यता नाही.

कृषी आणि आपत्ती व्यवस्थापन



सुरु होणाऱ्या आठवड्यात हवामानात अजून बदल होईल. प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि खानदेशात दुपार नंतरचे ढग आणि काही प्रमाणात वादळी पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. कोकणात देखील काही प्रमाणात पावसाचा अंदाज आहे. याच बरोबर मे महिन्याच्या तुलनेत राज्यातील कमाल तापमानात घट होईल, मात्र विदर्भातील काही भागांमध्ये, प्रामुख्याने पूर्व विदर्भ, कमाल तापमान 40 अंशाच्या वर कायम राहील. आगामी वादळी पावसाचा मान्सूनशी काहीही संबंध नाही, कारण मान्सून अद्याप केरळात पोहोचलेला विभागांकडून शेतकऱ्यांना आणि लोकांना आवाहन करण्यात येत आहे की, संभाव्य हवामान बदल लक्षात घेऊन योग्य ती प्रतिबंधात्मक उपाययोजना करावी शेतकऱ्यांनी वादळी पावसावर अवलंबून राहून आणि मान्सूनचे आगमन होण्यापूर्वी पेरणीची घाई करू नये विजेच्या कडकडाटाच्या वेळी नागरिकांनी व शेतकऱ्यांनी स्वतःची तसेच पाळीव जनावरांची सुरक्षितता सुनिश्चित करावी. अशा वेळी झाडाखाली, टिनशेडखाली तसेच विद्युत ट्रान्सफॉर्मर, वीज खांब आणि विद्युत वाहिन्यांच्या जवळ उभे राहणे टाळावे

# शिवसंवादातून संघटन अधिक भक्कम करणार, प्रत्येक घरापर्यंत शिवसेनेची भूमिका पोहोचवा. :- खासदार डॉ.श्रीकांत शिंदे

### पाटोदा येथील शिवसंवाद मेळाव्यात जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर व तालुकाप्रमुख राहुल चौरे यांच्या कार्याचे कौतुक

दैनिक युवक आधार
पाटोदा (प्रतिनिधी)

- शिवसंवादातून संघटन अधिक भक्कम करणार असुन आपण प्रत्येक घरा घरापर्यंत शिवसेनेची भूमिका पोहोचवा असे आवाहन शिवसेनेचे संसदीय नेते खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी पाटोदा येथे शिवसंवाद दौऱ्या प्रसंगी केले. शिवसंवाद दौऱ्यानिमित्त संपूर्ण पाटोदा शहर भगवामय झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. शहरातील प्रमुख चौक, रस्ते, स्वागत कमानी, भगवे झेंडे व बॅनरमुळे राजकीय वातावरण चांगलेच तापले होते. शिवसैनिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. या दौऱ्याची तालुकाभर जोरदार चर्चा सुरू आहे. या वेळी पाटोदा येथे नव्याने सुरू करण्यात आलेल्या शिवसेना कार्यालयाचे उद्घाटन प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले. या कार्यालय उद्घाटन सोहळ्यासाठी शिव सैनिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. भगव्या झेंड्यांनी सजलेले कार्यालय परिसर आकर्षणाचे केंद्र ठरले. विशेष म्हणजे पाटोदा तालुका प्रमुख पदाची जबाबदारी सांभाळत असताना राहुल भैय्या चौरे यांनी अनेकांना जे शक्य झाले नाही ते करून दाखविल्याने शिव सैनिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. शिवसंवाद दौऱ्यासाठी तालुक्यात मोठ्या प्रमाणात नियोजन करण्यात आले होते. विविध गावांमधून आलेल्या शिवसैनिकांनी घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडले, या वेळी युवकांची उपस्थिती विशेष लक्षवेधी ठरली. शहरात ठिकठिकाणी स्वागत फलक लावण्यात आले होते. या दौऱ्यामुळे पाटोदा तालुक्यात शिवसेनेची



ताकद पुन्हा एकदा दिसून आली असून आगामी स्थानिक राजकारणात राहुल भैय्या चौरे यांची भूमिका महत्त्वाची ठरणार असल्याची चर्चा आता सुरू झाली आहे. मराठवाड्यात सुरू असलेल्या 'शिवसंवाद दौऱ्या' च्या दुसऱ्या टप्प्यात आष्टी विधानसभा मतदारसंघांमधील शिवसेना पदाधिकारी, युवासेना, महिला आघाडी तसेच स्थानिक शिव सैनिकांसोबत उत्साहपूर्ण आणि सखोल आढावा बैठका पाटोदा येथे रोहीदास मंगल कार्यालय येथे संपन्न झाली. आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक बळकटी, बूथ निहाय नियोजन, गाव पातळी वरील पक्ष विस्तार आणि जनसंपर्क मोहिमेच्या कामांचा या वेळी विस्तृत आढावा घेण्यात आला. शिवसेनेची विचारधारा आणि पक्षाची भूमिका प्रत्येक घरा घरापर्यंत पोहोचवण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी अधिक सक्रिय राहून नागरिकांशी सातत्याने संवाद साधावा असे आवाहन या वेळी करण्यात आले. शेतकरी, युवक, महिला आणि सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या जाणून घेत त्या सोडवण्यासाठी स्थानिक पातळीवर प्रभावीपणे काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या. मतदार यादी विशेष पुनरिक्षण मोहिमेच्या (SIR) अनुषंगाने प्रत्येक बूथवर संघटना अधिक सक्षम करण्यावर विशेष भर देण्यात आला. नवीन मतदार नोंदणी, मतदार यादी पडताळणी, बोगस नावे कमी करणे तसेच बीएलए, शाखाप्रमुख आणि स्थानिक पदाधिकाऱ्यांनी अधिक जबाबदारीने बूथस्तरावर काम करावे असे निर्देश देण्यात आले. या वेळी मंत्री भरत गोगावले, खासदार संदीपान भुमरे, शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी, संपर्क प्रमुख मनोज शिंदे, माजी खासदार आनंद परांजपे, माजी आमदार प्रा. संगिताताई ठोंबरे, युवासेनेचे अभिमन्यू खोतकर, रुपेश कदम यांच्या सह स्थानिक जिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख, विभागप्रमूख, शाखाप्रमुख, पदाधिकारी, कार्यकर्ते शिव सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पहेला येथे 9 जून ला प्रकाश सोनवणे पुणे ब्ल्यू स्टार्म टीव्ही न्यूज चैनल चे मुख्य संपादक उपस्थित राहणार

दैनिक युवक आधार
संजीव भांबोरे

भंडारा- सन्मान द्या व सन्मान घ्या या सामाजिक उपक्रमांतर्गत प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस संजीव भांबोरे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त 9 जून 2026 ला सकाळी 11 वाजता सम्यक बुद्ध विहार पहेला येथे विविध सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते, अधिकारी, कर्मचारी, कवी, पत्रकार ,प्रबोधनकार,शाहीर गुणवंत विद्यार्थी यांच्या सत्कार सोहळा कार्यक्रम प्रसंगी ब्ल्यू स्ट्रार्म टीव्ही न्यूज चैनल चे मुख्य संपादक प्रकाश सोनवणे पुणे हे उपस्थित राहणार आहेत.



# सोयगाव आगारातील अशोक गिते,व कृष्णा मिसाळ कर्मचाऱ्यांचा गौरवपूर्ण सेवानिवृत्ती सोहळा उत्साहात संपन्न....

दैनिक युवक आधार सोयगाव
तालुका प्रतिनिधी विजय काळे

सोयगाव : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सोयगाव आगारातील दीर्घकाळ प्रामाणिक व कर्तव्यनिष्ठ सेवा बजावणारे लोहारा येथील चालक अशोक फकिरा गिते (सेवा २६ वर्षे) आणि तसेच आमखेडा येथील वरिष्ठ नियंत्रक कृष्णा बाबूराव मिसाळ (सेवा ३० वर्षे) हे नुकतेच सेवानिवृत्त झाले.त्यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त सोयगाव आगारात भावपूर्ण निरोप व सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आगार प्रमुख मनिष जावळीकर होते. यावेळी महामंडळातील अधिकारी,कर्मचारी,निवृत्त कर्मचारी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. आपल्या सेवाकाळात दोन्ही कर्मचाऱ्यांनी प्रवासी सेवेला प्राधान्य देत कर्तव्यनिष्ठेने काम केल्याबद्दल त्यांचा विशेष गौरव करण्यात आला.

याच कार्यक्रमात मागील वर्षी आयटीआय उत्तीर्ण होऊन सोयगाव आगारात वेल्डर म्हणून एक वर्ष सेवा पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थी युवकांचाही विशेष सत्कार करण्यात आला. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. युवकांनी आपल्या कौशल्याने आणि मेहनतीने आगाराच्या कामकाजात दिलेल्या योगदानाचे उपस्थितांनी कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समाधान जाधव यांनी केले,तर आभार प्रदर्शनही त्यांनीच केले. उपस्थित मान्यवरांनी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या सेवाभाव,प्रामाणिकपणा आणि सहकाऱ्यांशी असलेल्या जिव्हाळ्याच्या नात्याचा उल्लेख केला.

सोयगाव निर्मल निर्भय युवा पत्रकार संघाच्या वतीने अशोक गिते व कृष्णा मिसाळ यांचा सत्कार करून त्यांना छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा भेट देण्यात आली.यावेळी दोन्ही सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी आपल्या सेवाकाळातील आठवणींना उजाळा देत सर्व सहकारी व वरिष्ठांचे आभार मानले. कार्यक्रमानंतर उपस्थितांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती.स्नेह,कृतज्ञता आणि गौरवाच्या वातावरणात पार पडलेला हा सेवानिवृत्ती व सत्कार सोहळा उपस्थितांच्या स्मरणात कायम राहील, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या. तसेच आयटीआय उत्तीर्ण प्रशिक्षणार्थी युवकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करताना.यावेळी आगार प्रमुख मनिष जवळीकर, आबासाहेब बावस्कर, सुभाष चौधरी,माजी पोलीस रतन फुसे, कूषी भुषण




अरुण सोहणी, ईश्वर चौधरी, वाडेकर,समाधान जाधव,कैलास बागुल, जयराम सुर्यवंशी, विष्णू सोनवणे,पंजाबराव कुणघर ,रमेश पायघन, मधुकर शिंदे, सुरेश हाळनोर, राजेंद्र भोपे, सुरेश मोरे, दिपक पाटील, दिनेश विसपुते, संतोष पाखरे, आदींची उपस्थिती होती.




# अभंगाचे निरूपण

**अभंग :**

आम्हीं कीर्तन कुळवाडी ।
आणिक नाहीं उदीम जोडी ॥१॥
वाचा पिकली पिकली ।
हरिनामाची वृष्टी झाली ॥२॥
दशमी एकादशीच्या दिवशीं ।
झाल्या कैवल्याच्या राशी ॥३॥
संत म्हणती नामा भला ।
हरिनामाचा सुकाळ झाला ॥४॥





**निरूपणकार : ह.भ.प. तुळशीराम लबडे महाराज**

संतश्रेष्ठ नामदेव महाराजांनी या अभंगातून हरिनाम, कीर्तन आणि संतसंग यांचे महत्व अतिशय सहज, सोप्या आणि रसाळ भाषेत सांगितले आहे. ज्याच्या जीवनात हरिनामाचा आधार आहे, त्याला इतर कोणत्याही आधाराची गरज भासत नाही. हरिभक्तांचे खरे धन म्हणजे हरिनाम आणि त्याचे खरे कार्य म्हणजे भगवंताचे भजन-कीर्तन.

❖ **"आम्हीं कीर्तन कुळवाडी"**

या चरणात नामदेव महाराज सांगतात की, आमचा खरा व्यवसाय, आमचा खरा उद्योग म्हणजे कीर्तन आणि हरिभक्ती. संसारातील इतर व्यवसाय मनुष्याला केवळ उदरनिर्वाह देतात; परंतु हरिनामाचा व्यवसाय आत्म्याचे पोषण करतो. भगवंताच्या नामस्मरणाने जीवनाला दिशा, शांती आणि समाधान प्राप्त होते.

❖ **"वाचा पिकली पिकली, हरिनामाची वृष्टी झाली"**

या ओवीत संतांनी नामस्मरणाचा परिणाम स्पष्ट केला आहे. ज्या मुखातून सतत हरिनामाचा उच्चार होतो, ती वाणी मधुर, शुद्ध आणि मंगल बनते. जशी पावसाच्या वर्षावामुळे धरती हिरवीगार होते, त्याचप्रमाणे हरिनामाच्या वर्षावामुळे मन, बुद्धी आणि वाणी पवित्र होते.

❖ **"दशमी एकादशीच्या दिवशी, झाल्या कैवल्याच्या राशी"**

दशमी आणि एकादशी हे वैष्णव भक्तांसाठी अत्यंत पवित्र दिवस मानले जातात, या दिवशी केलेले नामस्मरण, उपवास, जप आणि साधना विशेष फलदायी ठरते. म्हणूनच "झाल्या कैवल्याच्या राशी" असे म्हणत महाराज सांगतात की, या पर्वकाळात भक्तांच्या जीवनात कल्याणाचे, पुण्याचे आणि आध्यात्मिक उन्नतीचे ढीग साचतात.

❖ **"संत म्हणती नामा भला, हरिनामाचा सुकाळ झाला"**

अंतिम चरणात नामदेव महाराज नम्रतेने सांगतात की संतजन मला 'भला' म्हणतात, कारण माझ्या जीवनात हरिनामाचा सुकाळ झाला आहे. जिथे हरिनामाची विपुलता असते, तिथे सदाचार, भक्ती, प्रेम, दया आणि समाधान यांचाही सुकाळ असतो. हरिनामामुळेच जीवन धन्य होते आणि समाजात सद्‌भावना निर्माण होते.

आजच्या धावपळीच्या युगात मनुष्य अनेक चिंता, तणाव आणि स्पर्धामध्ये अडकला आहे. अशा वेळी संतांचा हा अभंग आपल्याला सांगतो की, जीवनात कितीही कामे असली तरी भगवंताच्या नामाचा विसर पडू देऊ नका. हरिनाम हेच मनःशांतीचे, आत्मकल्याणाचे आणि मोक्षाचे सर्वात सोपे साधन आहे.

**शब्दार्थ :**

- कुळवाडी – उत्पन्न साधन, कामकाज
- पिकली – गोड झाली, मधुर झाली
- वृष्टी – वर्षाव
- कैवल्य – कल्याण
- भला – चांगला
- सुकाळ – विपुलता, भरपूर, पुष्कळ

**शिकवण :**

- हरिनाम हेच खऱ्या कल्याणाचे आणि मुक्तीचे साधन आहे.
- संतसंगती आणि नामस्मरणामुळे वाणी व मन पवित्र होते.
- एकादशीसारख्या पवित्र पर्वकाळात केलेली साधना विशेष फलदायी ठरते.
- जीवनात हरिनामाचा सुकाळ असेल तर समाधान, आनंद आणि आध्यात्मिक प्रगती आपोआप प्राप्त होते.

॥ रामकृष्ण हरी ॥

# समुदाय आरोग्य अधिकारी (CHO) बदली प्रक्रिया पारदर्शकतेने पूर्ण

## मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी यांच्या उपस्थितीत समुपदेशनाद्वारे ३६ अधिकाऱ्यांच्या बदल्या

दैनिक युवक आधार
अमरावती, प्रतिनिधी

जिल्हा परिषद अमरावतीच्या आरोग्य विभागामार्फत समुदाय आरोग्य अधिकारी (CHO) यांच्या विनंती बदल्यांची प्रक्रिया अत्यंत पारदर्शक व समुपदेशन पद्धतीने यशस्वीरित्या पार पडली. ही प्रक्रिया जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सत्यम गांधी (भा.प्र.से.) यांच्या उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली डॉ. पंजाबराव देशमुख सभागृहात आयोजित करण्यात आली होती.

आरोग्य विभागाच्या या बदली प्रक्रियेत एकूण ४८ समुदाय आरोग्य अधिकारी सहभागी होणे अपेक्षित होते. मात्र, त्यापैकी ११ अधिकारी गैरहजर राहिले, तर एका अधिकाऱ्याने बदलीस नकार दिला. त्यामुळे उर्वरित ३६ समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांच्या विनंतीनुसार समुपदेशनाच्या माध्यमातून त्यांच्या बदल्या करण्यात आल्या.






बदली प्रक्रियेदरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सत्यम गांधी यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी प्रशासनातील पारदर्शकता, कार्यक्षमता आणि लोकाभिमुख आरोग्य सेवा यांना सर्वोच्च प्राधान्य देण्याचे निर्देश दिले. तसेच बदल्यांची ही प्रक्रिया केवळ प्रशासकीय स्वरूपाची नसून ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्थेला अधिक सक्षम आणि प्रभावी बनविण्यासाठी महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले.

ग्रामीण नागरिकांना गुणवत्तापूर्ण व वेळेवर आरोग्य सेवा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी योग्य मनुष्यबळाचे नियोजन आवश्यक असल्याचे सांगत त्यांना बदल्यामुळ आरोग्य सेवच्या कायक्षमतत वाढ होईल, असा विश्वास व्यक्त केला.

या प्रसंगी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रवीण पारिसे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. हर्षल क्षिरसागर, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. शरद जोगी, जिल्हा समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. पराग राठोड, जिल्हा लेखा व्यवस्थापक (एनएचएम) श्री. अशोक कोठारी तसेच आरोग्य विभाग, जिल्हा परिषद अमरावती येथील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

आरोग्य विभागामार्फत राबविण्यात आलेल्या या पारदर्शक बदली प्रक्रियेचे उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वागत केले असून, यामुळे जिल्ह्यातील आरोग्य सेवांच्या बळकटीकरणाला चालना मिळणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

# वाघनदी परिसरात वाहतूक तपासणी की वसुली मोहीम? वाहनचालकांमध्ये संतापाची लाट"

दैनिक युवक आधार
रोशन खोब्रागडे

देवरी : देवरी शहरापासून सुमारे 10 किलोमीटर अंतरावर वाघनदी परिसरात वाहतूक पोलिसांकडून वाहनचालकांची कथित अवैध लूटमार सुरू असल्याचा गंभीर आरोप नागरिकांकडून केला जात आहे. वाहतूक नियमांच्या नावाखाली वाहनांची अडवणूक करून दंडाची भीती दाखवत रोख रकमेची मागणी केली जात असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत.

स्थानिक नागरिक व प्रवाशांच्या म्हणण्यानुसार, अनेक वाहनचालकांकडे आवश्यक कागदपत्रे असतानाही त्यांना तासन्तास थांबवून मानसिक त्रास दिला जात आहे. अधिकृत पावती न देता काही ठिकाणी पैसे उकळले जात असल्याचा आरोपही केला जात आहे. त्यामुळे या कारवाईमागे नेमके वाहतूक नियमांचे पालन आहे की अवैध वसुलीचा प्रकार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

दररोज शेकडो वाहनचालक या मार्गाने प्रवास करतात. मात्र पोलिसांच्या या कथित कारवायांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

वाहतूक नियमांचे पालन करणे आवश्यक असले तरी कायद्याच्या अंमलबजावणीच्या नावाखाली नागरिकांची आर्थिक पिळवणूक होत असेल तर ते अत्यंत गंभीर प्रकरण असल्याचे मत सामाजिक कार्यकर्त्यांनी व्यक्त केले आहे "वाघनदीतील वाहतूक तपासणीची सत्यता काय?याबाबत संबंधित विभागाने खुलासा करून नागरिकांमधील संभ्रम दूर करावा, अशी मागणी जोर धरत आहे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त १ जूनला पनवेलमध्ये भव्य सांगीतिक कार्यक्रम

## सारेगमप लिटलचॅम्प फेम सुप्रसिद्ध गायिका अंजली गायकवाड आणि ज्ञानेश्वरी गाडगे यांचे सुमधुर गायन

दैनिक युवक आधार
पनवेल (प्रतिनिधी)

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त "लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सव वर्ष नियोजन समिती", "श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ" तसेच नादब्रह्म साधना मंडळ खारघर यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार दिनांक १ जून रोजी सायंकाळी ५ वाजता पनवेल येथे "स्वर संध्या" या भव्य सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात आयोजित करण्यात आला असून रसिकांसाठी प्रवेश विनामूल्य ठेवण्यात आला आहे.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि ांस्कृतिक कार्याचा गौरव करण्यासाठी अमृत महोत्सव वर्ष विविध उपक्रमांनी साजरे करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून आयोजित करण्यात आलेल्या "स्वर संध्या" या कार्यक्रमात संगीतप्रेमींसाठी दर्जेदार आणि सुरेल संगीताची मेजवानी अनुभवायला मिळणार आहे. या कार्यक्रमात सुप्रसिद्ध गायिका सारेगमप लिटल चॅम्प फेम अंजली गायकवाड तसेच ज्ञानेश्वरी गाडगे आपल्या सुमधुर आवाजाने रसिकांना मंत्रमुग्ध करणार आहेत. दोन्ही कलाकारांनी आपल्या गायकीच्या जोरावर अल्पावधीतच रसिकांच्या मनात विशेष स्थान निर्माण केले असून त्यांच्या सादरीकरणाची संगीतप्रेमींमध्ये उत्सुकता आहे. कार्यक्रमाला पंडित प्रतापबुवा पाटील यांची मृदुंग साथ, प्रसाद पाध्ये यांची तबला साथ तसेच सूर्यकांत सुर्वे यांचे तालवाद्य लाभणार आहे. अनुभवी कलाकारांच्या साथसंगतीमुळे कार्यक्रमाची रंगत अधिक वाढणार आहे. याशिवाय नवदुर्गा प्रासादिक भजन मंडळ कोपरा यांच्यावतीने सुरेल भजन सादर करण्यात येणार असून गायिका शिवमाला पाटील, पखवाज वादक निलेश पाटील तसेच तबला साथीसाठी मृगेंद्र कडू हे कलाकार सहभागी होणार आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनोहर मडके करणार आहेत. संगीत, भजन आणि सांस्कृतिक परंपरेचा संगम असलेल्या या अविस्मरणीय मैफलीचा लाभ रसिकांनी मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन "लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सव वर्ष नियोजन समिती", "श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ" तसेच "नादब्रह्म साधना मंडळ खारघर" यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# येवदा येथे राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंती व 'मन की बात' कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

दैनिक युवक आधार दर्यापूर
ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी

येवदा दि.31:भारतीय जनता पार्टीच्या वतीने येवदा येथे राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात' कार्यक्रमाचे सामूहिक श्रवण मोठ्या उत्साहात पार पडले.

*अहिल्यादेवींच्या प्रतिमेचे पूजन*

कार्यक्रमाची सुरुवात राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी अहिल्यादेवींच्या लोककल्याणकारी कार्याला व आदर्श नेतृत्वाला वंदन केले. अहिल्यादेवींनी धर्म, न्याय व प्रजाहितासाठी केलेले कार्य आजही प्रेरणादायी असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

*'मन की बात'चे सामूहिक श्रवण*



यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात' या लोकप्रिय कार्यक्रमाचे सामूहिक श्रवण करण्यात आले. देशाच्या विकासासाठी, समाजहितासाठी व नवभारताच्या उभारणीसाठी पंतप्रधानांनी मांडलेले प्रेरणादायी विचार ऐकण्याची संधी उपस्थितांना मिळाली. 'मन की बात'मधून सामान्य नागरिकांच्या कर्तृत्वाला मिळणारी दाद व देशभरातील नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती ऐकून कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले.

यावेळी भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे मेळघाट जिल्हाध्यक्ष नकुलभाऊ सोनटक्के यांनी आपले मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले, "राजमाता अहिल्यादेवी होळकर यांनी सर्व समाजघटकांना सोबत घेऊन न्याय व समतेचे राज्य निर्माण केले. महिलांना, वंचितांना व शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून त्यांनी केलेले कार्य आजच्या पिढीसाठी दिशादर्शक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हेसुद्धा अहिल्यादेवींचा हाच वारसा पुढे नेत आहेत. 'सबका साथ, सबका विकास' या मंत्रातून शेवटच्या माणसापर्यंत योजना पोहोचवण्याचे काम सुरू आहे. 'मन की बात'मधून देशाच्या कानाकोपऱ्यातील अनुसूचित जाती, जमाती व वंचित बांधवांच्या कर्तृत्वाला व्यासपीठ मिळते, ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे."

या कार्यक्रमाला ओमप्रकाश शर्मा, संजय वाघमारे, चंदुभाऊ रघुवंशी, नितीन बडे, मयूर वांदे, पिंटुभाऊ आसरे, अभिजीत कराळे, दिलीप दवंडे, अमोल कवळे यांच्यासह भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते व मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य व पंतप्रधानांचे विचार एकाच व्यासपीठावरून ऐकायला मिळाल्याने प्रेरणा मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. "अहिल्यादेवींचा आदर्श व पंतप्रधानांचा संदेश घेऊन आम्ही समाजकार्यात अधिक जोमाने काम करू," असे मत युवक कार्यकर्त्यांनी मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन स्थानिक पदाधिकाऱ्यांनी केले.

# आयपीएलवर सट्टा लावणाऱ्या 13 जणांना अटक

दैनिक युवक आधार
नवीन पनवेल वार्ताहर :

वाकडी येथील फार्महाऊस वर छापा टाकत पोलिसांनी आयपीएलवर सट्टा लावणाऱ्या 13 जणांना अटक केली आहे. त्यांच्यावर पनवेल तालुका पोलीस ठाण्यात 30 मे रोजी करण्यात आला.

पनवेल तालुक्यातील वाकडी येथील एका फार्म हाऊस वर आयपीएल क्रिकेटवर सट्टा लावण्यात येत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली त्यानुसार पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिरुद्ध गीजे आणि पनवेल सायबर सेल च्या पोलीस निरीक्षक दिपाली पाटील आणि अन्य यांनी वाकडी येथील फार्म हाऊस वर छापा टाकला. या ठिकाणी डेव्हिल या आरोपीने भारतात प्रतिबंधित असलेल्या गेमिंग साईट उपलब्ध करून लोटस 365 नावाचे ॲप लिंक साईट मध्ये आयपीएल क्रिकेटवर सट्टा खेळण्यासाठी ऑनलाईन सुविधा पुरवल्या. या ठिकाणाहून पोलिसांनी विक्रांत उदय टाकळे, सोहेल राकेश खन्ना, वंश कमल कुमार चावला, विरल रमेश कुमार तेली, सुरज परमेश्वर कंधा, विशाल अजयसिंह पाटील, प्रवीण राजेंद्र सिंह ऐलावत, सत्यजित गुलाल मंडळ, विजय नवीन तेली, शिवम संजीव गुप्ता, छबिलाल ओम बहादुर छत्री, राजेश परमेश्वर कंधा, तसलीम मोहम्मद हुसेन खान पठाण या 13 जणांना ताब्यात घेतले. पोलिसांनी आरोपींकडून ऑनलाईन गेमसाठी वापरात असलेले 15 मोबाईल, सहा लॅपटॉप, लॅपटॉपचे चार चार्जर, चार एक्सटेंशन बोर्ड, 10 मोबाईल चार्जर, कॅल्क्युलेटर, वायफाय, राऊटर, पासबुक, चेक बुक, क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, सिम कार्ड, पासपोर्ट आणि लिखाणासाठी वापरण्यात येणाऱ्या डायऱ्या असा एकूण दोन लाख 80 हजारांचा मुद्देमाल जप्त केला. यातील डेव्हिल नामक पाहिजे आरोपीचा शोध सुरू आहे.

# सटाणा नगरपरिषदेच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांना अभिवादन..

दैनिक युवकआधार
प्रतिनिधी - दीपक गायकवाड

सटाणा : भारतीय इतिहासातील तेजस्वी आणि स्त्रीशक्तीच्या ताकदीची समाजाला जाणीव करून देणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीच्या औचित्याने अहिल्यादेवी चौकातील अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मारकाचे पूजन नगराध्यक्ष हर्षदा राहुलबाबा पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

नगर परिषदेच्या वाचनालयात अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे उपनगराध्यक्ष सुमित वाघ यांच्या हस्ते पुजन व पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी बोलतांना नगराध्यक्षा म्हणाल्या अहिल्याबाई होळकर यांना त्यांच्या वडीलांनी बालपणीच वेद, शास्त्र, प्रशासन, न्याय आणि धर्मशास्त्र यांचे ज्ञान दिल्यामुळे त्यांनी पती निधना नंतर यशस्वी पणे राज्य कारभार करून हिंदू धर्माची पताका भारतभर पसरवली. त्यांच्या कार्य काळात काशीच्या शिव मंदिरात पिंड स्थापन करून मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला. तसेच मध्य प्रदेशातील महेश्वर येथील घाटाची निर्मीती आणी वाराणशी, गंगोत्री, सोमनाथ, रामेश्वर, प्रयाग, अयोध्या येथे मंदिरांची निर्मीती व धर्मशाळा बांधण्यात आल्या. तसेच जिल्हयातील चांदवड येथिल रंग महालाची निर्मीती म्हणजे त्या काळातील इंजीनीरींगचा उत्कृष्ट नमुना होय. त्यांच्या कार्य काळात व्यापार आणि कृषी उत्पादनाला मोठी चालना मिळाली आहे.आज त्यांच्या कार्याची प्रेरणा घेऊन निस्वार्थी अहिल्या तयार झाल्यास भारत विश्व गुरु झाल्याशिवाय रहाणार नाही असेही त्यांनी म्हटले,

शिवसेना गटनेता राहुलबाबा पाटील,देव मामलेदार गटनेता मनिषा पवार, पाणीपुरवठा समिती सभापती भूषण सोनवणे, नगरसेवक जयश्री गरुड, विलास दंडगव्हाळ, रऊफ मुल्ला, सामाजिक कार्यकर्ते बाबूलाल मोरे, साहेबराव गरुड, संदीप खैरनार, बापू नंदाळे,नारायण नंदाळे, आबा नंदाळे,आदींसह विद्युत अभियंता मोहन पवार, स्वच्छता निरीक्षक मनोहर बोरसे, ग्रंथपाल ज्ञानेश्वर खैरनार, सचिन जाधव, विनायक पाकळे,विवेक सोनवणे, अमोल सोनवणे,कृष्णा कासार, प्रमोद गहिवड तसेच वाचनालयाचे वाचक उपस्थित होते.



# डोंगराळ भागात वृक्षतोडीमुळे होणाऱ्या निर्वनीकरणाचा पक्षांवर परिणाम

दैनिक युवक आधार
प्रतिनिधी

डोंगराळ भागात दरवर्षी मोठ्या प्रमाणात होणाऱ्या जंगल तोडीमुळे निसर्गाचा ऱ्हास होऊन निर्वनीकरण होण्याची संभावना तयार होताना दिसते. ऋतुमानानुसार दिवस बदलत जातात .पावसाळ्यात दिसणारी हिरवीगार निसर्गसृष्टी आणि उन्हाळ्यात उष्ण तापमान थंड हवेची लागणारी चाहूल हे भाव सौंदर्य दिवसेंदिवस कमी होताना दिसते . जंगल तोडीमुळे उष्णतेचे तापमान वाढत चालले आहे. त्याचा परिणाम मानवालाच भोगावा लागत आहे. ह्या जंगल सृष्टीवर मानवाची जितकी मक्तेदारी आहे तितकाच हक्क पशुपक्ष्यांचा पण आहे. याची आठवण झाडाविना व पक्षाविना उजाड झालेल्या डोंगरावर जंगलात गेल्यानंतर कळते, इथल्या बुद्धिजीवी मानवाने केवळ स्वतःच्या सुखासाठी पूर्ण जंगलाची कत्तल केली आहे. त्यामुळे हिरवाईची शान नष्ट होऊन डोंगराळ भाग उजाड आणि भकास दिसत आहे. त्यामुळे रानातील पशु पक्षी अन्न पाण्याच्या शोधात मानवी वस्तीकडे येताना आढळतात पक्षी पाण्याच्या थेंबासाठी तडफडतांना दिसतात. त्यामुळे डोंगराळ भागात वृक्ष लागवड करून संवर्धन करणे प्रत्येकाचे काम आहे आणि रानातील पक्षांची शिकार करणे थांबवले पाहिजे.

आदिवासी डोंगराळ भागात पूर्वीतर घनदाट अरण्ये पसरले होते. त्यामुळे वेगवेगळ्या जातीचे रंगाचे पक्षी रानात झाडाझुडपात भ्रमंती करताना आढळून येत होते. परंतु एकविसाव्या शतकात तसे वातावरण आता राहिलेले दिसत नाही त्याचे



कारण असे आदिवासी डोंगराळ भागात मोठ्या प्रमाणात जंगलतोड होताना दिसते. मानवाने स्वतःच्या कामासाठी घर बांधणे, वीट भट्टी भाजणे, इंधनासाठी लाकूड फाट्या वापरणे, वेळोवेळी लागलेले वनवे ह्यामुळे वनस्पती सृष्टी धोक्यात येऊन बऱ्याचशा औषधी व डेरेदार वृक्ष नामशेष होऊन तेथील पक्षी पण नष्ट झाले, जंगलातील फळे, झाडावरील किटक खाऊन पक्षी जगतात, मोठ्या झाडाच्या फांद्या पोकळ झाडाच्या फांदीत पक्षी घरटी करतात, प्राणवायू हा पक्षांमार्फत मिळत असतो रानावनात काम करणाऱ्या माणसाचे मनोरंजन हे पक्षी करत असतात त्यामुळे जंगलातील शोभा वाढत असते आज जंगलात बरेचसे पक्षी नामशेष झालेले दिसतात तीतर हा शाकाहारी पक्षी तुरळक प्रमाणात रानात आढळतो लावरं, चकाकी,कोतकर, रान कोंबडी, तिरगा, फेसा, काच्या, काळाबाणोळा, ससाणा, घुबड, कोकण घार, हारोळ, कोतवाल, हळदुण्या, सुतार पक्षी, होला,दडुल्या,चुहीट,काकड कुंबाऱ्या,गांजी , टिटवी,हे पक्षी नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत पक्षांचा राजा मोर पक्षी काही प्रमाणात तरी आहे उन्हाळ्यात कोणच्या नजरेत पडत नाही पण पावसाळ्यातील ढगाळ वातावरण निर्माण झाले की मोरचा हिरव्यागार रानातून मॅओ,मॅओ असा मंजुळ आवाज डोंगर पहाडातून शेतकऱ्यांना ऐकायला मिळतो अशा पक्षांची जंगलात शिकारही केली जाते .

> आदिवासी डोंगराळ भागातील खेडूत मुलं शिकारीसाठी लाकडी बेंग्याची गल्लूर वापरतात.जास्तीत जास्त रानात कावळा, साळुंखी, पांढरा बगळा, काळा बगळा (पांन डोसला) चिमणी,पोपट, हे पक्षी रानात काही प्रमाणात आढळतात वटवाघुळट हा सस्तन प्राणी म्हणून ओळखला जाणारा पक्षी पण आता जास्त प्रमाणात रानात आढळत नाही.
>
> महाराष्ट्र राज्याला लागूनच गुजरात राज्याची सिमा तिथे मोठ्या प्रमाणावर जंगल क्षेत्र असल्याने पक्षांची रहाळी देखिल आपल्या दृष्टीस पडत आहे.
>
> **सुभाष कामडी**
> **( आदिवासी साहित्य अभ्यासक )**

# लोकमातेच्या विचारांचा जयघोष! लेहणीत अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंती जल्लोषात!

## अहिल्यादेवींच्या आदर्शांचा वारसा जपावा – भगवान हुले




दैनिक युवक आधार रिसोड
रंजित ठाकुर तालुका प्रतिनिधी

रिसोड, दि. ३१ मे : तालुक्यातील लेहणी येथे लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी गावातील धनगर समाज बांधव, महिला भगिनी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण व पूजन करून करण्यात आली. त्यानंतर "येळकोट येळकोट जय मल्हार", "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर की जय" अशा जयघोषांनी परिसर दुमदुमून गेला.

यावेळी ह.भ.प. लक्ष्मण महाराज देवकर, वसंता हुले, केशव हुले, भागवत हुले, राजू पातळे, भगवान हुले (यशवंत संघर्ष सेना तालुका अध्यक्ष), रामेश्वर हुले, नागेश हुले, अमोल नव्हाळे, नारायण हुले, रामदास खणपटे, संतोष पातळे, डॉ. ज्ञानेश्वर टोंचर (अध्यक्ष, धनगर समाज लेहणी), समाधान हुले, पवन हुले, डिगांबर गावंडे, कैलास हुले, गणेश जामकर, महादेव हुले, प्रभु गावंडे, विष्णु हुले, सिद्धेश्वर हुले, घनश्याम हुले, गजानन टाकसाळ, दत्ता टोंचर, कुणाल टोंचर, विशाल टोंचर, विठ्ठल हुले, पुरुषोत्तम हुले, दत्ता हुले, सार्थक हुले, अभिषेक हुले, शुभम हुले, संदीप हुले, तुकाराम बोडखे, अर्जुन गावंडे, वैभव शेळके, ज्ञानेश्वर गावंडे, संकेत छत्रे, अंकुश गायकवाड, राजू गायकवाड, योगेश गायकवाड यांच्यासह समस्त गावकरी उपस्थित होते.

यावेळी बोलताना यशवंत संघर्ष सेना तालुका अध्यक्ष भगवान हुले म्हणाले की, "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जीवन हे समाजसेवा, न्यायनिष्ठा आणि लोककल्याण यांचे प्रेरणादायी उदाहरण आहे. त्यांच्या विचारांचा वारसा जपत समाजातील युवकांनी शिक्षण, संघटन आणि सामाजिक कार्यात पुढाकार घेणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. अशा महापुरुषांच्या जयंतीमुळे नव्या पिढीला इतिहासाची आणि समाजकारणाची प्रेरणा मिळते."

कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या लोककल्याणकारी कार्याचा गौरव करत त्यांच्या आदर्शांचे अनुसरण करण्याचे आवाहन केले. समाजसेवा, न्यायप्रियता आणि लोकहितासाठी आयुष्य समर्पित करणाऱ्या लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी अशा जयंती सोहळ्यांचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झालेल्या या जयंती सोहळ्याने गावात सामाजिक एकात्मता, इतिहासाबद्दलचा अभिमान आणि महापुरुषांच्या विचारांचे संवर्धन करण्याचा संदेश दिला. उपस्थितांनी लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मृतींना अभिवादन करत त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रमाचा समारोप जयघोष आणि सामूहिक अभिवादनाने करण्यात आला.

# नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य : वालचंदनगर पोलीस ठाण्यात ब्लॅक स्पॉटवर उपाययोजना निश्चित



दैनिक युवक आधार
सणसर : विकास क्षत्रिय

वालचंदनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वारंवार अपघात होणाऱ्या ठिकाणांवर (ब्लॅक स्पॉट) नियंत्रण मिळवण्यासाठी स्थानिक प्रशासनाने ठोस पावले उचलण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी नुकतीच वालचंदनगर पोलीस ठाणे स्तरावरील 'रोड ॲक्सिडेंट कमिटी'ची बैठक पार पडली.

सहाय्यक पोलीस निरीक्षक राजकुमार डूणगे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत अपघातग्रस्त ठिकाणांना प्रत्यक्ष भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेण्यात आला.संबंधित ठिकाणांवरील अडचणी व संभाव्य उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करून अहवाल वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला.

बैठकीस सार्वजनिक बांधकाम विभागाचे इंजिनियर सौरभ देसाई,बारामती उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाचे मोटार वाहन निरीक्षक संजय भापकर, पोलीस उपनिरीक्षक रतिलाल चौधर तसेच आनंदनगर ग्रामपंचायतीचे सरपंच रोहित मोहोळकर उपस्थित होते.

अपघातप्रवण ठिकाणांची 'ब्लॅक स्पॉट' म्हणून नोंद करून त्यावर तातडीने उपाययोजना राबविण्यावर भर देण्यात आला. यामध्ये रस्त्यांवर स्पीड ब्रेकर उभारणे, पांढऱ्या रंगाच्या सीमारेषा आखणे, रोड मार्किंग सुधारणे, रिफ्लेक्टर व 'कॅट आय' बसविणे, तसेच धोकादायक वळणांवर सूचना फलक उभारणे यांचा समावेश आहे.

यासोबतच वाहतूक नियमांचे काटेकोर पालन, वेग नियंत्रण आणि दारू पिऊन वाहन चालविणाऱ्यांविरोधात विशेष मोहिमा राबविण्याचेही ठरविण्यात आले.दरमहा बैठका घेऊन अपघातांचा आढावा घेणे आणि त्याबाबतचा अहवाल वरिष्ठांकडे सादर करणे बंधनकारक राहणार आहे.

सर्व विभागांनी समन्वयाने काम करून अपघातांची संख्या कमी करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे निर्देश देण्यात आले.नागरिकांची सुरक्षा हीच प्राथमिकता असून अपघातमुक्त परिसर निर्माण करण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

# "शहर स्वच्छ ठेवणारेच उपाशी!" — सफाई कामगारांच्या वेतनासाठी वंचितचा एल्गार; नगर परिषदेला आंदोलनाचा इशारा

## दर महिन्याच्या १ तारखेलाच पगार द्या, अन्यथा नगर परिषदेसमोर तीव्र आंदोलन; किरणाताई गिऱ्हे यांचा थेट इशारा

दैनिक युवक आधार वाशीम
करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी

वाशिम शहरातील रस्ते, चौक, गल्लीबोळ आणि सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ ठेवण्यासाठी अहोरात्र मेहनत घेणाऱ्या सफाई कामगारांवर आणि कचरा संकलन करणाऱ्या ट्रॅक्टर चालकांवर आज उपासमारीची वेळ आल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. नियमित वेतन मिळत नसल्याने या कामगारांच्या कुटुंबीयांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत असून, या गंभीर प्रश्नावर वंचित बहुजन आघाडीने आक्रमक भूमिका घेत नगर परिषद प्रशासनाला थेट इशारा दिला आहे.

वंचित बहुजन आघाडीच्या प्रदेश सदस्या सौ. किरणाताई गिऱ्हे यांनी मुख्याधिकारी, नगर परिषद वाशिम यांना निवेदन सादर करून सफाई कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित वेतनाचा प्रश्न तातडीने सोडविण्याची मागणी केली. शहरातील स्वच्छतेची संपूर्ण जबाबदारी पार पाडणारे कर्मचारी आणि कचरा संकलनासाठी दिवस-रात्र काम करणारे ट्रॅक्टर चालक यांचे कुटुंब त्यांच्या मासिक वेतनावर अवलंबून आहे. मात्र वेतन वेळेवर न मिळाल्याने त्यांच्या घरातील




आर्थिक गणित कोलमडले असून अनेकांना रोजच्या गरजाही भागवणे कठीण झाले आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, शहरातील नागरिकांना स्वच्छ वातावरण मिळावे म्हणून हे कर्मचारी कोणत्याही परिस्थितीत आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडत आहेत. पाऊस असो, उन्हाळा असो किंवा इतर कोणतीही प्रतिकूल परिस्थिती असो, हे कर्मचारी शहराच्या स्वच्छतेसाठी रस्त्यावर उतरतात. मात्र त्यांच्या श्रमांचा योग्य सन्मान होत नसल्याची भावना आता तीव्र होत आहे.

सौ. किरणाताई गिऱ्हे यांनी नगर परिषद प्रशासनाला स्पष्ट शब्दांत सांगितले की, सफाई कामगार व ट्रॅक्टर चालकांचे वेतन दर महिन्याच्या १ तारखेलाच नियमितपणे अदा करण्यात यावे. वेतनासाठी कर्मचाऱ्यांना वारंवार प्रतीक्षा करावी लागणे ही अत्यंत गंभीर बाब असून प्रशासनाने याकडे संवेदनशीलतेने पाहण्याची गरज आहे.

वंचित बहुजन आघाडीने या प्रश्नावर आता संघर्षाची भूमिका घेतली असून, मागणी मान्य न झाल्यास नगर परिषद कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे येत्या काळात हा प्रश्न अधिक चिघळण्याची शक्यता निर्माण झाली असून नगर परिषद प्रशासनावर दबाव वाढताना दिसत आहे.

शहरातील स्वच्छता व्यवस्थेचा कणा असलेल्या कर्मचाऱ्यांना वेळेवर वेतन मिळाले नाही तर त्याचा परिणाम त्यांच्या कुटुंबांबरोबरच शहराच्या स्वच्छता व्यवस्थेवरही होऊ शकतो. त्यामुळे या प्रश्नावर तातडीने निर्णय घेण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

यावेळी वंचित बहुजन आघाडी व सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष अभिषेक सपकाळ, स्वप्निल खांदळे, आकाश पंडित, अक्षय सपकाळ यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

"शहर स्वच्छ करणाऱ्यांच्या घरात अंधार, प्रशासन मात्र शांत!"

वंचित बहुजन आघाडीने उपस्थित केलेला हा प्रश्न केवळ वेतनाचा नसून कामगारांच्या सन्मानाचा आणि त्यांच्या कुटुंबाच्या जगण्याचा असल्याचे सांगितले जात आहे. शहराला स्वच्छ ठेवणाऱ्या हातांना वेळेवर मोबदला मिळाला नाही तर प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण होणार असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. आता नगर परिषद प्रशासन या मागणीवर काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

# सिल्लोडमध्ये सेवानिवृत्त अधिकाऱ्यांचा सेवागौरव सोहळा

## आ. अब्दुल सत्तार यांच्या हस्ते सन्मान; प्रदीर्घ प्रशासकीय सेवेचे स्मरण

दैनिक युवक आधार छत्रपती संभाजीनगर
योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी

सिल्लोड :-सिल्लोड–सोयगाव तालुक्यात प्रशासकीय सेवेत कार्यरत राहून प्रदीर्घ काळ सेवा बजावलेल्या अधिकाऱ्यांचा सेवापूर्ती व सेवा गौरव सोहळा स्वस्तिक लॉन्स येथे संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार अब्दुल सत्तार होते.

यावेळी उपविभागीय अधिकारी लतीफ पठाण, पोलीस उपाधीक्षक शेषराव उदार, जलसंपदा विभागाचे उपअभियंता राजधर दांडगे, जि.प. बांधकाम विभागाचे उपअभियंता दिलीप फुलारी, प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेचे उपअभियंता उमेश लिंबारे, सहायक महसूल अधिकारी शिवाजी सोनवणे व एएसआय सुरेश तायडे यांचा आमदार अब्दुल सत्तार यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.




यावेळी बोलताना आमदार अब्दुल सत्तार म्हणाले की, ''प्रशासकीय जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडणे महत्त्वाचे असते. सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांचा अनुभव व कार्यपद्धती पुढील पिढीसाठी मार्गदर्शक ठरेल.'' यावेळी त्यांनी राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करून त्यांच्या आदर्श प्रशासकीय कार्याचा उल्लेख केला.

सत्काराला उत्तर देताना पोलीस उपाधीक्षक शेषराव उदार यांनी आपल्या सेवा काळातील आठवणींना उजाळा दिला. त्यांनी अत्यंत खडतर परिस्थितीत शिक्षण पूर्ण करून नोकरी मिळविण्यासाठी केलेल्या संघर्षाचा प्रवास मांडला.

याप्रसंगी जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन गाढे, बाजार समिती सभापती विश्वास दाभाडे, उपसभापती संदीप राऊत, उपनगराध्यक्ष विठ्ठल सपकाळ, देविदास लोखंडे, रामदास पालोदकर, राजू बाबा काळे, दामू अण्णा गव्हाणे, नानासाहेब रहाटे, शेख जावेद, जयराम चिंचपुरे, फिरोज पटेल, सुधाकर पाटील, विनोद मंडलेचा, शंकरराव खांडवे, राजेंद्र ठोंबरे, सयाजीराव वाघ, सय्यद नासिर हुसेन, अकील वसईकर, सिद्धेश्वर आहेर, शेख इमरान (गुड्डू), सत्तार हुसेन, संजय डमाळे, मनोज झंवर, प्रशांत क्षीरसागर, मुक्ताराम पाटील, अनिल पालोदे, शेख सलीम, शमी चाऊस, राजू मिया देशमुख, रामेश्वर सुरडकर, डॉ. फिरोज खान, मधुकर गवळी, अंबादास सपकाळ, रमेश प्रभाकर पारधे, बबलू पठाण, अक्षय काळे, संतोष बोडखे, गोपीचंद जाधव, राजीव गौर, अक्षय मगर यांच्यासह केशवराव तायडे तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.



राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त मादळमोही येथे विनम्र अभिवादन करण्यात आले.(दैनिक युवक आधार )

# सिल्लोड भाजपच्या वतीने पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांना विनम्र अभिवादन

दैनिक युवक आधार छत्रपती संभाजीनगर
योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी

सिल्लोड:-भारतीय जनता पार्टी, सिल्लोड यांच्या वतीने पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त सिल्लोड येथील भाजप कार्यालय आणि भराडी चौक येथे राजमातांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या लोककल्याणकारी कार्याचे, न्यायप्रिय प्रशासनाचे आणि समाजहितासाठी दिलेल्या अमूल्य योगदानाचे उपस्थितांनी कृतज्ञतापूर्वक स्मरण केले. त्यांच्या आदर्श विचारांवर चालून समाजसेवा व जनकल्याणासाठी कटिबद्ध राहण्याचा संकल्प याप्रसंगी व्यक्त करण्यात आला.

या कार्यक्रमास भाजपचे प्रदेश चिटणीस सुरेश बनकर, सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन ज्ञानेश्वर मोठे, मंडळ अध्यक्ष मनोज मोरेल्लु, जिल्हा परिषद सदस्य राधाकृष्ण काकडे, भवन मंडळ तालुकाध्यक्ष एकनाथ हिवाळे, नगरसेवक स्वप्निल शिनगारे, सुदाम बन्सोड, अनिल खरात, पंजाबराव कोलते, विनोद टिकारे, विजय वानखेडे, अतुल साळवे, अमोल कुलकर्णी, योगेश साळवे, अरुण राठोड यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय रिसोड येथे राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंती उत्साहात साजरी !

दैनिक युवक आधार
*रिसोड (प्रतिनिधी):*

स्थानिक श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय रिसोड येथे दिनांक ३१ मे २०२६, रविवार रोजी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना पुष्पहार अर्पण करण्यात आला. हा सोहळा महाविद्यालयाचे प्राचार्य संजय देशमुख आणि उपप्राचार्य संजय नरवाडे यांच्या हस्ते संपन्न झाला. याप्रसंगी कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षिका तसेच शिक्षकेतर कर्मचारी वृंद प्रामुख्याने उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्राचार्य संजय देशमुख यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या न्यायप्रियतेचे आणि प्रजाहिताच्या विविध निर्णयांचे दाखले देत त्यांच्या महान जीवनकार्यावर सविस्तर प्रकाश टाकला.

राजमाता अहिल्यादेवी होळकर या केवळ एक कुशल शासक नव्हत्या, तर त्या न्यायप्रियतेचे आणि जनकल्याणाचे एक महान प्रतीक होत्या. त्यांचे कार्य आणि विचार आजही समाज उभारणीसाठी अत्यंत प्रेरणादायी आहेत.

कार्यक्रमाचे संचलन आणि




उपस्थितांचे आभार प्रदर्शन प्रा. विजय देशमुख यांनी केले. अत्यंत शिस्तबद्ध आणि उत्साही वातावरणात हा जयंती उत्सव पार पडला.*श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय रिसोड येथे राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंती उत्साहात साजरी!*

*रिसोड (प्रतिनिधी):रणजितसिह. ठाकूर * स्थानिक श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय रिसोड येथे दिनांक ३१ मे २०२६, रविवार रोजी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना पुष्पहार अर्पण करण्यात आला. हा सोहळा महाविद्यालयाचे प्राचार्य संजय देशमुख आणि उपप्राचार्य संजय नरवाडे यांच्या हस्ते संपन्न झाला. याप्रसंगी कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षिका तसेच शिक्षकेतर कर्मचारी वृंद प्रामुख्याने उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्राचार्य संजय देशमुख यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या न्यायप्रियतेचे आणि प्रजाहिताच्या विविध निर्णयांचे दाखले देत त्यांच्या महान जीवनकार्यावर सविस्तर प्रकाश टाकला.

राजमाता अहिल्यादेवी होळकर या केवळ एक कुशल शासक नव्हत्या, तर त्या न्यायप्रियतेचे आणि जनकल्याणाचे एक महान प्रतीक होत्या. त्यांचे कार्य आणि विचार आजही समाज उभारणीसाठी अत्यंत प्रेरणादायी आहेत.

कार्यक्रमाचे संचलन आणि उपस्थितांचे आभार प्रदर्शन प्रा. विजय देशमुख यांनी केले. अत्यंत शिस्तबद्ध आणि उत्साही वातावरणात हा जयंती उत्सव पार पडला.

# सिल्लोडच्या ४५,६६५ विद्यार्थ्यांना १५ जूनला मोफत पुस्तके

दैनिक युवक आधार छत्रपती संभाजीनगर
योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी

सिल्लोड:-समग्र शिक्षण अभियानांतर्गत १५ जून रोजी सिल्लोड तालुक्यातील ४०९ शाळांमधील ४५ हजार ६६५ विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात येणार आहे. शिक्षण विभागाची तयारी अंतिम टप्प्यात असून, तालुक्यात पुस्तके दाखल झाल्याची माहिती गट शिक्षण अधिकारी रमेश ठाकूर यांनी दिली.

तालुक्यातील २८० जिल्हा परिषद आणि १२९ खासगी अनुदानित अशा एकूण ४०९ शाळांमधील विद्यार्थ्यांची नोंदणी पूर्ण झाली आहे. यामध्ये मराठी, उर्दू आणि सेमी-इंग्रजी माध्यमांचा समावेश आहे. विशेषतः सेमी-इंग्रजीच्या १३ हजार २७२ विद्यार्थ्यांची मागणी शिक्षण विभागाकडे नोंदवण्यात आली आहे. दरवर्षी काही विषयांची पुस्तके उशिरा मिळाल्यास शिक्षकांना केंद्र शाळेतून ती आणावी लागतात, ज्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते. यंदा हे नुकसान टाळून सर्व विषयांची पुस्तके पहिल्याच दिवशी एकाच वेळी उपलब्ध करून द्यावीत, अशी अपेक्षा शिक्षक वर्गातून व्यक्त होत आहे.

# पुणे जिल्हा रहिवाशी सेवा संघाच्या वतीने 'विद्यार्थी गुण-गौरव सोहळा'; विद्यार्थ्यांचा होणार सन्मान

दैनिक युवक आधार
मुंबई,/प्रतिनिधी

: पुणे जिल्हा रहिवाशी सेवा संघ, मुंबई यांच्या वतीने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशाचा गौरव करण्यासाठी 'विद्यार्थी गुण-गौरव सोहळा २०२६' चे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा रविवार, ५ जुलै २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज नाट्य मंदिर येथे पार पडणार आहे.

या कार्यक्रमात ५ वी ते १२ वीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात येणार असून त्यांना मोफत वह्यांचे वाटप देखील करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन देत त्यांच्या यशाचा गौरव करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला असल्याची माहिती संघाच्या वतीने देण्यात आली.

कार्यक्रमासाठी मा. श्री. अँड. धनराज वंजारी हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. निलमताई पोतले-वढद्युले तसेच मुंबई विद्यापीठाचे सिनेट सदस्य किसन सावंत यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे.

या उपक्रमात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी २७ जूनपर्यंत आपल्या मार्कलिस्टची झेरॉक्स प्रत आयोजकांकडे जमा करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम विशेषतः पुणे जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आला असून विद्यार्थी आणि पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संघाचे अध्यक्ष बाबासाहेब ठाकूर, उपाध्यक्ष रोहिदास टाव्हरे, सचिव दत्तात्रय वाळुंज आणि खजिनदार महेंद्र गडगे यांनी केले आहे.

# शेतकरी पुत्र दत्तामामा भरणे यांच्या उपस्थितीत सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांचा गौरव समारंभ संपन्न

दैनिक युवक आधार
सणसर :- विकास क्षत्रिय

भवानीनगर,ता.इंदापूर येथील श्री छत्रपती सहकारी साखर कारखाना,भवानीनगर येथे अधिकारी व कामगारांच्या सेवानिवृत्ती निमित्त चेअरमन पृथ्वीराज बापू जाचक व संचालक मंडळाच्या कल्पनेने आयोजित करण्यात आलेल्या गौरव समारंभास महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री तथा शेतकरी पुत्र मा.दत्तामामा भरणे यांनी उपस्थित राहून सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी बोलताना दत्तामामा भरणे यांनी सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या दीर्घकालीन, प्रामाणिक आणि समर्पित सेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. कारखान्याच्या उभारणीपासून ते प्रगतीच्या प्रत्येक टप्प्यावर या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपल्या कर्तव्यनिष्ठेने आणि मेहनतीने मोलाचे योगदान दिले असल्याचे त्यांनी सांगितले."कोणत्याही संस्थेची खरी ताकद तिचे कर्मचारी असतात.आपल्या कार्यकाळात या सर्वांनी निष्ठेने काम करून कारखान्याच्या प्रगतीत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यांचे योगदान भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरणारे आहे," असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

समारंभात सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना स्मृतिचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ




देऊन सन्मानित करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या कार्याचा गौरव करत पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. दत्तामामा भरणे यांनी सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना उत्तम आरोग्य, सुख, समाधान, आनंद आणि दीर्घायुष्य लाभो, अशा शुभेच्छा व्यक्त केल्या. तसेच त्यांच्या अनुभवाचा लाभ समाज व पुढील पिढीला मिळावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.या प्रसंगी कारखान्याचे चेअरमन पृथ्वीराज बापू जाचक व्हा. चेअरमन कैलास गावडे संचालक मंडळाचे सदस्य,अधिकारी, कर्मचारी व परिसरातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. गौरव समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# सावरकरांच्या विचारांचा जागर; वाशिममध्ये युवा वक्त्यांनी गाजवली वकृत्व स्पर्धा! "मेरा युवा भारत केंद्र वाशिम व मा. गंगा नर्सिंग महाविद्यालयाचा संयुक्त उपक्रम"

दैनिक युवक आधार
करण धोंगडे
वाशीम जिल्हा प्रतिनिधी

वाशिम २८ मे २०२६ रोजी मेरा युवा भारत केंद्र, वाशिम यांच्या वतीने मा. गंगा नर्सिंग महाविद्यालय, वाशिम येथे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची जयंती मोठ्या उत्साहात व देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. या निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी "स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे जीवनकार्य व राष्ट्रनिर्माणातील योगदान" या विषयावर वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दीपक सिंघल हे होते. प्रमुख अतिथी म्हणून कांचनमाला अगमकर मॅडम उपस्थित होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते व राज्य क्रीडा मार्गदर्शक अक्षय टेंभुर्णीकर, मेरा युवा भारत केंद्राचे स्वयंसेवक तथा जिल्हा युवा पुरस्कारार्थी प्रदीप पट्टेबहादूर व नोयल तोडे यांची उपस्थिती लाभली.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर आयोजित वकृत्व स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. स्पर्धकांनी सावरकरांचे क्रांतिकारी विचार, समाजसुधारणेतील योगदान, राष्ट्रप्रेम, विज्ञाननिष्ठ दृष्टीकोन तसेच स्वातंत्र्यलढ्यातील त्यांचे कार्य यावर प्रभावीपणे आपले विचार मांडले.

स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक श्रेया गजानन शेलोकर, द्वितीय क्रमांक आरती माधव रायपुरे, तृतीय क्रमांक गायत्री शिंदे यांनी मिळविला. तर संविधान भगत यांनी प्रोत्साहन पारितोषिक पटकाविले. विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह, मेडल व प्रमाणपत्र प्रदान करून गौरविण्यात आले.

कार्यक्रमात मान्यवरांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या विचारांचा अभ्यास करून राष्ट्रहितासाठी कार्य करण्याचे आवाहन केले. युवकांनी सामाजिक, शैक्षणिक व राष्ट्रीय बांधिलकी जपत देशाच्या विकासात योगदान द्यावे, असे प्रतिपादन यावेळी करण्यात आले.

सदर कार्यक्रम मेरा युवा भारत केंद्राचे जिल्हा युवा अधिकारी मयूरकुमार गोरमे व कार्यक्रम अधिकारी अनिल ढेंगे, तसेच सामाजिक कार्यकर्ते तथा मा. गंगा नर्सिंग महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. हरीश बाहिती यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पडला.



कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रदीप पट्टेबहादूर (माजी राष्ट्रीय युवा स्वयंसेवक, माय भारत केंद्र वाशिम) तसेच राजा प्रसेनजित अल्पसंख्यांक शिक्षण बहुउद्देशीय संस्था व नेहरू युवा बहुउद्देशीय मंडळ, केकतउमरा येथील स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तनुश्री देशमुख यांनी केले, तर प्रस्ताविकेतून कार्यक्रमाची रूपरेषा प्रदीप पट्टेबहादूर यांनी मांडली. उपस्थित सर्वांचे आभार वैष्णवी कोंगे यांनी मानले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या विचारांचे स्मरण करून राष्ट्रसेवेची प्रेरणा घेण्याचा संकल्प व्यक्त केला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, नेतृत्वगुण व वक्तृत्वकलेबाबत नवचैतन्य निर्माण झाल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

"स्वातंत्र्यवीर सावरकरांचे विचार हे केवळ इतिहासातील प्रेरणास्थान नसून आजच्या युवा पिढीला राष्ट्रनिर्माणासाठी दिशा देणारी शक्ती आहेत. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, सामाजिक बांधिलकी आणि नेतृत्वगुण अधिक बळकट होतात," अशी भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

# कै.कडुबा पाटील साखळे स्मृती ग्रंथालयात' पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर जयंती उत्साहात साजरी

दैनिक युवक आधार छत्रपती संभाजीनगर
योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी

सिल्लोड:- तालुक्यातील लिहाखेडी येथील 'कै. कडुबा पाटील साखळे स्मृती ग्रंथालयात' पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची जयंती काल (दि. ३१ मे) मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिवराम साखळे होते. यावेळी सचिव अशोक साखळे, कार्याध्यक्ष बाळाराम साखळे, नामदेव साखळे, संतोष साखळे, बाळा बावस्कर, हरिदास साखळे, विष्णू फरकाडे, रामदास साखळे, सुनील बावस्कर, कृष्णा साखळे, सिताराम साखळे, कृष्णा सपकाळ, शंकर सरोदे, संभाजी साखळे, गोविंदा साखळे, विशाल साखळे, श्रीमती ललिता नंदकिशोर साखळे आणि चंद्रभान साखळे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी अहिल्याबाई होळकर यांच्या लोककल्याणकारी कार्याचे स्मरण केले.




# एमटी कंटेनर डेपोतील व्यवहार पूर्णपणे रोखमुक्त; सोशल मीडियावरील 'फुकट' कंटेनर रिकामे होण्याच्या अफवांवर विश्वास ठेवू नका !

दैनिक युवक आधार
तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी

एमटी (रिकामे) कंटेनर डेपोमध्ये कंटेनर उतरवण्यासाठी किंवा उचलण्यासाठी ट्रान्सपोर्टर्सना द्यावे लागणारे चार्जेस आता बुकिंग पार्टी थेट शिपिंग लाईनला देणार आहे. जवाहरलाल नेहरू पोर्ट ऑथॉरिटी (JNPA) आणि ट्रान्सपोर्ट संघटनांच्या संयुक्त बैठकीत हा अत्यंत महत्त्वाचा आणि ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला आहे.

या नव्या नियमांमुळे सध्या सोशल मीडियावर मोठा संभ्रम निर्माण झाला असून "आता पैसे न भरताही कंटेनर रिकामा होणार" असा एक चुकीचा आणि दिशाभूल करणारा संदेश फिरत आहे. परंतु, प्रत्यक्षात असे नसून डेपोमधील व्यवहार केवळ रोखमुक्त (Cash-less) करण्यात आले आहेत.

नव्या नियमातील महत्त्वाचे मुद्दे:

ट्रान्सपोर्टर्सची होणारी अडवणूक आणि गैरसोय थांबवण्यासाठी JNPA प्रशासन आणि ट्रान्सपोर्ट प्रतिनिधींनी एकत्र येऊन हा तोडगा काढला आहे. ट्रान्सपोर्टर्सना आता डेपोच्या आवारात कंटेनर उतरवण्यासाठी किंवा उचलण्यासाठी कोणतीही रोख रक्कम (कॅश) किंवा आगाऊ भरणा करण्याची गरज भासणार नाही. कंटेनर हाताळणीचे हे सर्व शुल्क आता बुकिंग पार्टी थेट शिपिंग लाईनकडे जमा करणार आहे. डेपोच्या आवारात कोणत्याही प्रकारचे रोख (कॅश) व्यवहार होणार नाहीत. बुकिंग पार्टीने शिपिंग लाईनकडे पैसे भरल्याची खात्री पटल्यानंतरच ट्रान्सपोर्टर्सना कंटेनर उतरवून किंवा भरून दिला जाईल.

सोशल मीडियावर पसरणारा 'मोफत' सेवांचा संदेश पूर्णपणे चुकीचा आहे. केवळ पैसे भरण्याची पद्धत आणि माध्यम बदलले आहे, शुल्क रद्द झालेले नाही.



# प्रभाग क्र. १ चा संताप अनावर! पाणी नाही, रस्ते निकृष्ट, घनकचऱ्याचा प्रश्न गंभीर; नगरपंचायतीला निवेदन

**दैनिक युवक आधार**
**रोशन खोब्रागडे**

लाखनी - लाखनी नगरपंचायत अंतर्गत येणाऱ्या प्रभाग क्रमांक १ मधील नागरिकांनी मूलभूत सुविधांच्या गंभीर समस्यांविरोधात नगरपंचायतीकडे निवेदन सादर करून तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. पिण्याच्या पाण्यापासून ते रस्ते, घनकचरा व्यवस्थापन आणि विद्युत सुविधांपर्यंत अनेक प्रश्नांमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.

निवेदनानुसार, प्रभागातील सार्वजनिक नळांना नियमित पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत ही समस्या अधिकच गंभीर बनली असून प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी करण्यात आली आहे. याशिवाय घनकचरा व्यवस्थापन पूर्णपणे विस्कळीत झाले असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग साचत असून त्यामुळे दुर्गंधी व आरोग्याच्या समस्या निर्माण होत आहेत.

दरम्यान, प्रभागातील रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याचा आरोपही नागरिकांनी केला आहे. संबंधित रस्ते बांधकाम मंजूर अंदाजपत्रकानुसार झाली की नाही, याची स्वतंत्र चौकशी करण्यात यावी आणि दोषी आढळणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

रस्त्यांवर पुरेशा विद्युत दिव्यांची व्यवस्था नसल्याने रात्रीच्या वेळी नागरिकांना अंधारातून मार्गक्रमण करावे लागत आहे. तसेच सार्वजनिक ठिकाणी ज्येष्ठ नागरिक व नागरिकांना बसण्यासाठी खुर्च्या अथवा बाकड्यांची सुविधाही उपलब्ध नसल्याने गैरसोय होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

प्रभाग क्रमांक १ मधील नागरिकांनी नगरपंचायत प्रशासनाला इशारा दिला असून, समस्या तातडीने सोडविल्या नाहीत तर लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला आहे. "मूलभूत सुविधांपासून नागरिकांना वंचित ठेवणाऱ्या प्रशासनाने आता तरी जागे व्हावे," अशी भावना प्रभागातील नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# तिवरंग येथे "जागतिक मासिक पाळी स्वच्छता दिवस" उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**एम डी सुरोशे**

**महागाव :** दि. २९ मे २०२६ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र पोहंडूळ अंतर्गत उपकेंद्र कोनदरीच्या वतीने ग्रामपंचायत तिवरंग येथे "जागतिक मासिक पाळी स्वच्छता दिवस" उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे मार्गदर्शन मा. डॉ. ज्ञानेश्वर राठोड सर, वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र पोहंडूळ यांनी केले.

या कार्यक्रमास ग्रामपंचायत तिवरंगच्या मा. प्रा. सौ. जयश्री सुनिल राठोड मॅडम यांच्या विशेष उपस्थिती लाभली. कार्यक्रमामध्ये किशोरवयीन मुलींना मासिक पाळीदरम्यान उद्भवणाऱ्या विविध समस्या, त्यावरील योग्य उपाययोजना, वैयक्तिक स्वच्छतेचे महत्त्व, आवश्यक आरोग्य काळजी तसेच पोषणयुक्त आहार याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.




यावेळी मासिक पाळीविषयी समाजामध्ये असलेल्या गैरसमजुती दूर करून मुलींमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्यात आली. उपस्थित मुलींच्या शंका व समस्यांचे निरसन करण्यात आले. तसेच किशोरवयीन मुलींची रक्तक्षय तपासणी करून सीबीसी चाचणी घेण्यात आली. आवश्यक औषधोपचार व लोहवर्धक गोळ्यांचे वितरणही करण्यात आले.

"स्वच्छता हीच निरोगी आरोग्याची गुरुकिल्ली" हा संदेश देत कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. कार्यक्रमास श्रीमती रुपाली कागदे (आरोग्य सेविका), श्री विजय ढाकरगे (आरोग्य सेवक), श्री अजय मनवर (प्र. वै. अधिकारी), श्री शोयब महाल्ब (तंत्रज्ञ), श्री विक्रम महाजन (आरोग्य निरीक्षक), ग्रामपंचायत सचिव श्री जी. जी. ढाकरे, ग्रामपंचायत कर्मचारी श्री देविदास कौडकर तसेच आशा स्वयंसेविका श्रीमती सीमा जाधव व कौसल्या वाघमारे उपस्थित होते.

# लाखनी बसस्थानकाची राज्यात मानाची भरारी; 'ब' गटातून महाराष्ट्रात प्रथम क्रमांक

**दैनिक युवक आधार**
**रोशन खोब्रागडे**

**लाखनी** :हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियानांतर्गत लाखनी बसस्थानकाने उल्लेखनीय कामगिरी करत 'ब' गटामधून संपूर्ण महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावला आहे. या यशामुळे लाखनी तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) सन २०२५-२६ च्या मूल्यांकनानुसार 'ब' गटातील लाखनी बसस्थानकाला ९७ गुण मिळाले. या उत्कृष्ट कामगिरीबद्दल बसस्थानकाला ₹५० लाखांचे पारितोषिक जाहीर करण्यात आले आहे. स्वच्छता, प्रवाशांच्या सुविधा, सुरक्षितता, सुशोभीकरण आणि व्यवस्थापन या निकषांवर लाखनी बसस्थानकाने राज्यात अव्वल स्थान मिळवले.

या यशामागे लाखनी नगरपंचायतीचे नगरसेवक तथा गटनेते संदीप भांडारकर यांचे विशेष योगदान असल्याचे नागरिकांकडून सांगितले जात आहे. त्यांनी बसस्थानकासाठी निधी उपलब्ध करून देत विविध विकासकामे राबवली. त्यांच्या प्रयत्नांमुळे बसस्थानकाचे रूपडे पालटले असून प्रवाशांना अधिक चांगल्या सुविधा मिळत आहेत.

लाखनी बसस्थानकाच्या या यशाबद्दल नागरिक, प्रवासी, एसटी कर्मचारी तसेच स्थानिक प्रशासनाकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. राज्यातील इतर बसस्थानकांसाठी लाखनीचा आदर्श प्रेरणादायी ठरत असून स्वच्छता व प्रवासी सुविधांच्या बाबतीत नवा मापदंड निर्माण झाला आहे.स्वच्छ बसस्थानक, सुंदर बसस्थानक – आपला अभिमान!" या घोषवाक्याला साजेशी कामगिरी करत लाखनीने राज्यभरात आपला ठसा उमटवला आहे.

# सावता परिषद आयोजित ओबीसी जनगणना परिषदेस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे — दिपाली काळे

**दैनिक युवक आधार रिसोड**
**, प्रतिनिधी :रणजितसिह. ठाकूर.**

सावता परिषदेद्वारे रविवार, दि. ७ जून रोजी ओबीसी जनगणना परिषद आयोजित करण्यात आली असून या परिषदेस तालुक्यातील सर्व ओबीसी समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सावता परिषद रिसोड तालुकाध्यक्ष सौ. दिपाली काळे यांनी केले आहे.



प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात त्यांनी म्हटले आहे की, समाजाच्या हक्कांसाठी, सामाजिक न्यायासाठी तसेच आगामी जनगणनेत ओबीसी समाजाची प्रभावी नोंद होण्यासाठी जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. समाजाच्या विविध प्रश्नांवर चर्चा करून संघटनात्मक बळकटी देण्याच्या दृष्टीने ही परिषद महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

ही ओबीसी जनगणना परिषद दि. ७ जून रोजी सकाळी ११ ते दुपारी ४ वाजेपर्यंत हॉटेल दानिश एम्पायर वाशिम येथे आयोजित करण्यात आली आहे. वाशिम, अकोला, बुलढाणा, अमरावती व यवतमाळ जिल्ह्यातील समाजबांधव या परिषदेत सहभागी होणार आहेत.

ओबीसी समाजाच्या प्रगतीसाठी, हक्कांच्या संरक्षणासाठी आणि समाज संघटन अधिक मजबूत करण्यासाठी तालुक्यातील सर्व समाजबांधव, युवक, महिला व पदाधिकाऱ्यांनी या परिषदेत उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन सौ. दिपाली काळे, तालुकाध्यक्ष, सावता परिषद रिसोड यांनी केले आहे.

# सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे राज्यव्यापी धरणे आंदोलन.

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी** :केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी व विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांसाठी आंदोलन नीट प्रश्नपत्रिका फुटी प्रकरणी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली. शिक्षणातील भ्रष्टाचार व व्यापारीकरणाविरोधात विविध मागण्यांचे निवेदन मा.जिल्हाधिकाऱ्यांना सादर करून विद्यार्थ्यांच्या हिताच्या मागण्या करण्यात आल्या.यावेळी वंचित बहुजन आघाडी बीड जिल्हा पदाधिकारी व कार्यकर्ते,सम्यक विद्यार्थी आंदोलन बीड जिल्ह्यातील पदाधिकारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# शिवसंवादातून संघटन अधिक भक्कम करणार, प्रत्येक घरापर्यंत शिवसेनेची भूमिका पोहोचवा. :- खा.डॉ.श्रीकांत शिंदे

## पाटोदा येथील मेळाव्यात जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर व तालुकाप्रमुख राहुल चौरे यांच्या कार्याचे कौतुक

दैनिक युवक आधार
पाटोदा (प्रतिनिधी)

- शिवसंवादातून संघटन अधिक भक्कम करणार असुन आपण प्रत्येक घरा घरापर्यंत शिवसेनेची भूमिका पोहोचवा असे आवाहन शिवसेनेचे संसदीय नेते खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी पाटोदा येथे शिवसंवाद दौऱ्या प्रसंगी केले. शिवसंवाद दौऱ्यानिमित्त संपूर्ण पाटोदा शहर भगवामय झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. शहरातील प्रमुख चौक, रस्ते, स्वागत कमानी, भगवे झेंडे व बॅनरमुळे राजकीय वातावरण चांगलेच तापले होते. शिवसैनिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. या दौऱ्याची तालुकाभर जोरदार चर्चा सुरू आहे. या वेळी पाटोदा येथे नव्याने सुरू करण्यात आलेल्या शिवसेना कार्यालयाचे उद्घाटन प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले. या कार्यालय उद्घाटन सोहळ्यासाठी शिव सैनिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. भगव्या झेंड्यांनी सजलेले कार्यालय परिसर आकर्षणाचे केंद्र ठरले. विशेष म्हणजे पाटोदा तालुका प्रमुख पदाची जबाबदारी सांभाळत असताना राहुल भैय्या चौरे यांनी पाटोद्यात खासदार व मंत्री दर्जाचे नेते आणून स्वतःची राजकीय ताकद दाखवून दिल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. अनेकांना जे शक्य झाले नाही ते राहुल भैय्या चौरे यांनी करून दाखविल्याने शिवसैनिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. शिवसंवाद दौऱ्यासाठी तालुक्यात मोठ्या प्रमाणात नियोजन करण्यात आले होते. विविध गावांमधून आलेल्या शिवसैनिकांनी घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला, या वेळी युवकांची उपस्थिती विशेष लक्षवेधी ठरली. शहरात ठिकठिकाणी स्वागत फलक लावण्यात आले होते. या दौऱ्यामुळे पाटोदा तालुक्यात शिवसेनेची ताकद पुन्हा एकदा दिसून आली असून आगामी स्थानिक राजकारणात राहुल भैय्या चौरे यांची भूमिका महत्त्वाची ठरणार असल्याची चर्चा आता सुरू झाली आहे. मराठवाड्यात सुरू असलेल्या 'शिवसंवाद दौऱ्या' च्या दुसऱ्या टप्प्यात आष्टी विधानसभा मतदारसंघांमधील शिवसेना पदाधिकारी, युवासेना, महिला आघाडी तसेच स्थानिक शिव सैनिकांसोबत उत्साहपूर्ण आणि सखोल आढावा बैठका पाटोदा येथे रोहीदास मंगल कार्यालय येथे संपन्न झाली. आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक बळकटी, बूथ निहाय नियोजन, गाव पातळी वरील पक्ष विस्तार आणि जनसंपर्क मोहिमेच्या कामांचा या वेळी विस्तृत आढावा घेण्यात आला. शिवसेनेची विचारधारा आणि पक्षाची भूमिका प्रत्येक घरा घरापर्यंत पोहोचवण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी अधिक सक्रिय राहून नागरिकांशी सातत्याने संवाद साधावा असे आवाहन या वेळी करण्यात आले. शेतकरी, युवक, महिला आणि सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या जाणून घेत त्या सोडवण्यासाठी स्थानिक पातळीवर प्रभावीपणे काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या. मतदार यादी विशेष पुनरिक्षण मोहिमेच्या (SIR) अनुषंगाने प्रत्येक बूथवर संघटना अधिक सक्षम करण्यावर विशेष भर देण्यात आला. नवीन मतदार नोंदणी, मतदार यादी पडताळणी, बोगस नावे कमी करणे तसेच बीएलए, शाखाप्रमुख आणि स्थानिक पदाधिकाऱ्यांनी अधिक जबाबदारीने बूथस्तरावर काम करावे असे निर्देश देण्यात आले. या वेळी मंत्री भरत गोगावले, खासदार संदीपान भुमरे, शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी, संपर्क प्रमुख मनोज शिंदे, माजी खासदार आनंद परांजपे, माजी आमदार प्रा.संगिताताई ठोंबरे, युवासेनेचे अभिमन्यू खोतकर, रुपेश कदम यांच्या सह स्थानिक जिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख, विभागप्रमूख, शाखाप्रमुख, पदाधिकारी, कार्यकर्ते शिव सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अ. भा. संयुक्त अधिवक्ता मंच भारताचा स्थापना दिन उद्या; नागपुरात भव्य कार्यक्रमाचे आयोजन

दैनिक युवक आधार नागपूर
सतीश कडू संपादक विभाग

नागपूर:"ॲडव्होकेटप्रोटेक्शन ॲक्ट" संपूर्ण देशभर लागू करण्यात यावा, या मागणीसाठी गेल्या पाच वर्षांपासून अखिल भारतीय संयुक्त अधिवक्ता मंच भारत देशव्यापी सामूहिक लढा देत आहे. मंचाचा स्थापना दिन दरवर्षी ३१ मे रोजी देशभरात साजरा केला जातो. त्यानिमित्ताने मंचाशी संलग्न विदर्भातील सदस्य व पदाधिकारी यंदाचा पाचवा स्थापना दिन ३१ मे रोजी नागपूर येथील रविभवनच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये साजरा करणार आहेत.

या कार्यक्रमात विदर्भ, महाराष्ट्रासह विविध जिल्ह्यांतील मोठ्या संख्येने अधिवक्ता सहभागी होणार असल्याची माहिती नागपूर जिल्हाध्यक्ष तसेच मध्यप्रदेश, महाराष्ट्र, तेलंगणा आणि दिल्लीचे सहप्रभारी अधिवक्ता छत्रपती शर्मा यांनी पत्रकाद्वारे दिली.

अधिवक्ता शर्मा यांनी प्रसिद्धीपत्रकात नमूद केले आहे की, हे एक गैरराजकीय व्यासपीठ असून मंचाचा मुख्य उद्देश अधिवक्त्यांचे हित, कल्याण, सन्मान आणि सुरक्षेसाठी संघर्ष करणे हा आहे. तसेच सर्व अधिवक्ते व त्यांच्या कुटुंबियांचे भविष्य सुरक्षित करणे, त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे आणि त्यांच्या आर्थिक व सामाजिक उन्नतीचे संरक्षण करणे, हा मंचाचा प्रमुख हेतू आहे.

# भ्रामक जाहिराती व मिसब्रँडेड औषधांविरोधात एफडीएची राज्यव्यापी धडक कारवाई

## ७३.२४ लाख रुपयांचा औषधसाठा जप्त; दोषींवर कायदेशीर कारवाई सुरू

दैनिक युवक आधार
दीपक कोळवणकर पनवेल, प्रतिनिधी

: जनतेच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या आस्थापनांविरोधात अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) राज्यभरात मोठी कारवाई केली आहे. राज्यातील ७ जिल्ह्यांमधील १२ आयुर्वेदिक औषधविक्री आस्थापनांवर धाड टाकून ७३ लाख २४ हजार ६५६ रुपये किमतीचा आक्षेपार्ह जाहिराती असलेला व मिसब्रँडेड औषधसाठा जप्त करण्यात आला आहे.

एफडीएने दिलेल्या माहितीनुसार, भ्रामक व दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींच्या माध्यमातून औषधांची विक्री करणाऱ्या तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांविरोधात ही कारवाई करण्यात आली. जप्त करण्यात आलेल्या औषधसाठ्याबाबत संबंधितांवर कायदेशीर कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

याबाबत माहिती देताना अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सांगितले की, जनतेच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला अथवा आस्थापनेला प्रशासनाकडून कोणतीही सवलत दिली जाणार नाही. भ्रामक जाहिराती प्रसिद्ध करणे, अवैध औषध उत्पादन आणि विक्री करणाऱ्यांविरोधातील कारवाई यापुढे अधिक कठोर व सातत्यपूर्ण पद्धतीने राबविण्यात येणार आहे.

एफडीएच्या या कारवाईमुळे अवैध औषध व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून नागरिकांच्या आरोग्याच्या संरक्षणासाठी प्रशासनाने कठोर भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले आहे.



# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर...




पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या १८ व्या शतकातील एक आदर्श, न्यायप्रिय आणि प्रजावत्सल राणी होत्या. त्यांनी माळव्यावर यशस्वीपणे राज्य केले आणि संपूर्ण भारतात समाज सुधारणा, महिला सबलीकरण व मंदिर जीर्णोद्धाराचे महान कार्य केले. त्यांच्या जयंती निमित्त त्यांच्या कार्याची महती सांगणारा हा लेख...

भारतीय इतिहासात अनेक शूर राजे व राण्या होऊन गेल्या, ज्यांनी आपल्या कर्तृत्वामुळे अमरत्व प्राप्त केले. त्या पैकीच एक प्रेरणादायी व्यक्तिमत्व म्हणजे 'लोकमाता' पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या केवळ एक प्रभावी राज्यकर्त्या नव्हत्या, तर प्रजेच्या सुख-दुःखात मातेप्रमाणे धावून जाणाऱ्या एक महान जनसेविका होत्या.

•- जन्म आणि बालपण

अहिल्यादेवींचा जन्म ३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील चौंडी या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव माणकोजीराव शिंदे होते. त्या काळी महिलांना शिक्षण देण्याची पद्धत नसतानाही,त्यांच्या वडिलांनी त्यांना घरीच शिक्षण दिले. वयाच्या अवघ्या आठव्या वर्षी,१७३३ मध्ये त्यांचा विवाह होळकर घराण्याचे संस्थापक मल्हारराव होळकर यांचे सुपुत्र खंडेराव यांच्याशी झाला. प्रामुख्याने त्यांच्ये नाते संबंध माहेरच्या (शिंदे घराणे) आणि सासरच्या (होळकर घराणे) अशा दोन भागांत विभागलेले आहे.

१)माहेर (शिंदे घराणे) आई-वडील:- अहिल्याबाईंचे वडील माणकोजी शिंदे आणि आई सुशीलाबाई शिंदे होते त्यांचा जन्म सध्याच्या अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी गावी झाला

२)सासर (होळकर घराणे आणि वंशज):-

होळकर घराण्याचे संस्थापक मूळ पुरुष मल्हारराव होळकर होते. मल्हारराव होळकर यांचे सुपुत्र खंडेराव होळकर यांच्याशी अहिल्याबाईंचा विवाह झाला होता. खंडेराव १७५४ मध्ये कुंभेरीच्या लढाईत वीरगतीस प्राप्त झाले. अहिल्याबाईंचे सुपुत्र मालेराव होळकर हे अहिल्याबाईंनंतर गादीवर बसले, मात्र अल्पकाळातच त्यांचे निधन झाले. पुढे राज्य कारभार त्यांनी हिमतीने चालवला.

•- वैधव्य आणि राज्यकारभार:- अहिल्यादेवींच्या आयुष्यात अनेक दुःखाचे प्रसंग आले. वयाच्या २८ व्या वर्षी त्यांचे पती कुंभेरीच्या लढाईत वीरगती पावले. त्या नंतर काही वर्षांनी त्यांचे सासरे मल्हारराव होळकर यांचे ही निधन झाले. परंतु या दुःखाच्या डोंगराखाली न खचता त्यांनी अत्यंत धैर्याने होळकर घराण्याची व राज्याची सूत्रे हाती घेतली. त्यांनी माळव्यावर अत्यंत यशस्वी आणि न्यायप्रिय, लोकाभिमुख राज्यकारभार केला. सामाजिक कार्य आणि सुशासन

अहिल्यादेवींचा राज्य कारभार हा प्रजाहितदक्ष होता.

•- न्यायदान:- त्या प्रजेला समान न्याय देत असत त्यांच्या काळात गुन्हेगारांना कडक शिक्षा आणि गरिबांना मदत केली जात असे.

•- स्त्री सक्षमीकरण:- त्यांनी सती प्रथा, बालविवाह या सारख्या अनिष्ट प्रथांना आळा घातला आणि विधवा स्त्रियांना पुनर्विवाहाचा हक्क मिळवून दिला.

•- अर्थव्यवस्था आणि संरक्षण:- व्यापार वाढवण्यासाठी त्यांनी व्यापाऱ्यांना मदत केली, रस्ते सुरक्षित केले आणि महिलांचे एक सैनिक दल ही तयार केले होते.

•- धार्मिक आणि सांस्कृतिक कार्य:- अहिल्यादेवींचे नाव संपूर्ण भारतात आदराने घेतले जाते, कारण त्यांनी देशभर मंदिरे, घाट, धर्मशाळा आणि विहिरी बांधल्या. त्यांनी काशीचे विश्वनाथ मंदिर, गया येथील विष्णुपद मंदिर, उज्जैनचे महाकालेश्वर, व महाराष्ट्रातील भीमाशंकर व त्र्यंबकेश्वर अशा अनेक प्रसिद्ध तीर्थक्षेत्रांचा जीर्णोद्धार केला. तसेच हिंदू धर्मियांचे श्रेष्ठ पवित्र स्थान असलेल्या गया येथे त्यांनी अहिल्या घाट बांधला. असंख्य तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी मंदीर, घाट, मठाचे बांधकाम केले. अहिल्यादेवी होळकर यांचे सपूर्ण जीवन शौर्य, सेवा आणि त्यागाचे उत्तम प्रतीक होते. त्यांचे कार्य इतके महान होते की त्यांना सर्वसामान्य जनता 'लोकमाता' आणि 'पुण्यश्लोक' म्हणून आदराने ओळखते. त्यांचा राज्य कारभार आणि सामाजिक विचार आज ही देशासाठी, विशेषतः महिलांसाठी खूप मोठे प्रेरणादायी आहे. अशा या महान राष्ट्रमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना जयंती निमित्त मानाचा मुजरा...!

लेखक □
डॉ.राजेंद्र मुरलीधर सानप
सदस्य महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ,
इंद्रप्रस्थ कॉलनी नगर रोड बीड.
मो.नं.- ९४२००१९५९७

## चौलच्या विकासाला गती; डॉ. सचिन राऊळ यांच्या पुढाकाराने गावात विकासकामांची गगनभरारी

### चिखल-खड्ड्यांपासून विकासाच्या महामार्गाकडे चौलची वाटचाल

**दैनिक युवक आधार अलिबाग रेवदंडा निलेश फुंडे प्रतिनिधी**

ऐतिहासिक वारसा लाभलेल्या अलिबाग तालुक्यातील चौल गावात गेल्या काही वर्षांपासून रखडलेल्या विकासकामांना आता वेग आला असून, गावाच्या कानाकोपऱ्यात विकासाची नवी पहाट उगवताना दिसत आहे. वर्षानुवर्षे चिखल, खड्डे आणि अपुऱ्या पायाभूत सुविधांच्या समस्यांनी त्रस्त असलेल्या ग्रामस्थांना आता मोठा दिलासा मिळाला आहे. रायगड जिल्हा परिषद सदस्य डॉ. सचिन राऊळ यांच्या पुढाकारातून चौलमधील विविध वाड्या-वस्त्या आणि गल्ल्यांमध्ये कॉंक्रीट सिमेंट रस्त्यांचे जाळे उभे राहत असून, अनेक विकासकामे पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत.गेल्या अनेक दशकांत चौलमध्ये केवळ ठराविक भागांपुरतीच विकासकामे मर्यादित राहिल्याची भावना ग्रामस्थांमध्ये होती. मात्र डॉ. सचिन राऊळ यांनी जिल्हा परिषद सदस्यपदाची धुरा स्वीकारल्यानंतर गावातील विकासकामांना अक्षरशः गती मिळाली आहे. चौल पंचक्रोशीतील ग्रामस्थांच्या मते, "गावात विकासाची गंगा वाहू लागली असून, पूर्वी केवळ आश्वासने मिळत होती; आता प्रत्यक्षात कामे दिसत आहेत."सध्या गावातील विविध गल्ल्या,



वाड्या आणि वस्त्यांमध्ये कॉंक्रीट सिमेंट रस्त्यांची कामे यशस्वीपणे पूर्ण करण्यात आली असून उर्वरित कामेही लवकरच पूर्ण होणार आहेत. त्यामुळे पावसाळ्यातील चिखल, खड्डे आणि वाहतुकीच्या अडचणी मोठ्या प्रमाणात कमी होणार आहेत. तसेच रस्त्यांसोबतच पाणीपुरवठा, स्वच्छता, गटारे, पथदिवे आणि इतर मूलभूत सुविधांवरही विशेष भर देण्यात येत आहे. यासंदर्भात संपर्क साधला असता डॉ. सचिन राऊळ म्हणाले, "चौल हे ऐतिहासिक वारसा लाभलेले गाव आहे. या गावाचा सर्वांगीण विकास होणे ही काळाची गरज आहे. गावातील प्रत्येक वाडी-वस्तीपर्यंत दर्जेदार सुविधा पोहोचविण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. रस्ते, पाणी, स्वच्छता, प्रकाश व्यवस्था आणि इतर नागरी सुविधांच्या उभारणीसाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. चौलच्या विकासासाठी जिल्हा परिषद सदस्य म्हणून मी कायम प्रयत्नशील राहणार आहे."

विशेष म्हणजे, केवळ विकासकामांची घोषणा न करता त्यांचा नियमित पाठपुरावा, पाहणी आणि कामांच्या गुणवत्तेवर लक्ष ठेवण्याचे कामही डॉ. राऊळ करत असल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. विकासकामांचे उद्घाटन करण्यापासून ते कामे पूर्ण झाल्यानंतर त्याचा प्रत्यक्ष लाभ नागरिकांपर्यंत पोहोचतो की नाही याचीही ते खातरजमा करत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. "अडीअडचणीच्या काळात धावून येणारा आणि दिलेला शब्द पाळणारा नेता आम्हाला लाभला आहे," अशा प्रतिक्रिया चौलमधील विविध भागांतून ऐकायला मिळत आहेत. गावातील गल्लोगल्ली सध्या विकासकामांची चर्चा रंगली असून, चौलच्या विकासाचा हा वेग कायम राहिल्यास आगामी काळात हे ऐतिहासिक गाव आधुनिक सुविधांनी सुसज्ज होईल, असा विश्वास ग्रामस्थ व्यक्त करत आहेत.

## उरण-पनवेल मुख्य रोडवर मृत्यूचा सापळा; तेलीपाडा आणि नवीन शेवा येथील गतिरोधकांबाजूच्या खड्ड्यांमुळे अपघाताची दाट शक्यता!

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी**

उरण-पनवेल या मुख्य रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांसाठी तेलीपाडा आणि नवीन शेवा गावच्या हद्दीतील गतिरोधक गेल्या कित्येक महिन्यांपासून अत्यंत धोकादायक बनले आहेत. या मुख्य रस्त्यावरील गतिरोधकांना लागूनच मोठे खड्डे पडले असून, विशेषतः तेलीपाडा येथील एका गतिरोधकाच्या बाजूला पाइपलाइन टाकताना खोदलेला मोठे चर कंत्राटदाराने तसेच ठेवून दिले आहेत. हे खड्डे आणि चर चुकवण्याच्या नादात समोरून येणाऱ्या वाहनांशी थेट धडक होऊन मोठा अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. अवघ्या चार दिवसांवर पावसाळा येऊन ठेपला असून, त्यापूर्वी रस्ता दुरुस्त न झाल्यास येथे गंभीर दुर्घटना घडू शकते, अशी भीती नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

तेलीपाडा येथील एका गतिरोधकाच्या बाजूने उकरलेला रस्ता आणि तो चर योग्य रीतीने न बुजवल्यामुळे तो तशाच धोकादायक स्थितीत राहिला आहे, तर मुख्य रस्त्यावरील इतर गतिरोधकांच्या बाजूला मोठमोठाले खड्डे पडले आहेत. वेग मर्यादित करण्यासाठी असलेल्या गतिरोधकांवरच गाड्या आदळत असल्याने आणि ते वाचवताना अपघात होण्याची



शक्यता असल्याने वाहनचालकांचा जीव धोक्यात आला आहे.

उरण रेल्वे स्टेशनच्या दोन्ही बाजू अजूनही प्रवाशांसाठी पूर्ण क्षमतेने खुल्या झालेल्या नाहीत. त्यामुळे तेलीपाडा, करंजा, चाणजे आणि नवीन शेवा परिसरातील शेकडो प्रवाशांना लोकल ट्रेन पकडण्यासाठी उरण बाजारपेठेतून जाण्याऐवजी द्रोणागिरी स्टेशन गाठावे लागते. द्रोणागिरी स्टेशनवर यायचे असल्याने नागरिक याच उरण पनवेल मुख्य रस्त्याचा मार्ग निवडतात. सकाळी आणि संध्याकाळी ट्रेन पकडण्याच्या घाईत असणारे नोकरदार आणि वाहन चालक या मुख्य रस्त्यावरील खोदलेल्या चरांमुळे आणि खड्ड्यांमुळे त्रस्त झाले आहेत.

येत्या चार दिवसात पाऊस पडल्यानंतर या खोल चरांमध्ये आणि खड्ड्यांमध्ये पाणी साठणार आहे अशावेळी मुख्य रस्त्यावर वाहन चालकांना खोलीचा अंदाज येणार नाही त्यामुळे गाड्या घसरून गंभीर अपघात होऊ शकतात. पाऊस पडण्यापूर्वी वाहन चालकांची या त्रासातून सुटका करावी आणि रस्ता प्रभावी बनवून द्यावा अशी तीव्र मागणी नागरिकांकडून होत आहे.

## संस्कारांची सुवर्णवेल अन् अध्यात्माची गोडी ; संजनाच्या कल्पकतेतून घडतेय सुसंस्कारी पिढी!

### श्लोक, स्तोत्र आणि विज्ञानाच्या सुवर्णसंगमाने बालमनांचे प्रबोधन

**दैनिक युवक आधार रिसोड प्रतिनिधी. रणजितसिह. ठाकूर.**

आधुनिकतेच्या या वेगवान युगात संस्कारांची संस्कृती जपणे हे आजच्या काळातील मोठे आव्हान ठरत आहे. अशा काळात वाशिम शहरात एक कौतुकास्पद आणि सकारात्मक क्रांती घडत आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यरत असलेल्या आणि एमबीए पदवीधर असलेल्या संजना महेश अवस्थी यांनी आपल्या संवेदनशील भावनेतून 'दत्तछंद संस्कार वर्ग' हे संस्कारांचे नंदनवन फुलवले आहे. भावी पिढीला सुसंस्कारी, अध्यात्मप्रेमी आणि संवेदनशील बनवण्यासाठी त्यांनी घेतलेला हा वसा अत्यंत कौतुकास्पद आहे. त्यांच्या या निःशुल्क, निरागस आणि निरंतर ज्ञानयज्ञामुळे वाशिममधील बालमनांवर सुसंस्कारांचे सुवर्णसिंचन होत आहे.

या वर्गात दररोज ५ ते १६ वयोगटातील ३० पेक्षा अधिक मुलांची उपस्थिती असते. संजना अवस्थी यांच्या अथांग प्रयत्नांमुळे अवघ्या काही दिवसांतच लहानग्यांच्या मुखातून संस्कृत श्लोक आणि स्तोत्रांचे सात्त्विक सूर उमटू लागले आहेत. या वर्गाचे सौंदर्य वाढवताना त्यांनी मुलांना स्तोत्र पठणाचे महत्त्व आणि त्यामागील अर्थ अतिशय सोप्या भाषेत पटवून दिला आहे.

"करदर्शन अन् प्रभात वंदन, प्रसन्न होते बालकांचे मन..." या ओळींना सार्थ ठरवत मुले आता प्रातःकाळ वंदन श्लोक उत्तम रीतीने म्हणतात.

"मुखी चालिसा हनुमंताची, दूर पळते भीती मनाची..." याप्रमाणे श्री हनुमान चालिसा पठणाने मुलांमध्ये अद्भुत ऊर्जेचा संचार होत आहे. तसेच, "व्यंकटेश स्तोत्राचे होता पठण, भक्तीरसात न्हाऊन निघते जीवन..." आणि "रामरक्षेचे कवच लाभता भारी, सुरक्षित होई पिढी ही सारी..." या सात्त्विक ओळींचा प्रत्यय मुलांच्या शुद्ध उच्चारांमधून येतो. श्री व्यंकटेश स्तोत्र आणि श्री रामरक्षा स्तोत्र मुलांनी पूर्णपणे मुखोद्गत केले असून, त्यांच्या उच्चारांमधील स्पष्टता आणि तेज थक्क करणारे आहे.

संजना या केवळ पाठांतरावर भर न देता, लॅपटॉपच्या माध्यमातून देवाच्या ॲनिमेटेड शॉर्ट स्टोरीज दाखवून मुलांना खेळत-हसत अध्यात्माची गोडी लावतात. धार्मिक कथांसोबतच पॉझिटिव्ह मॅनिफेस्टेशन म्हणजेच सकारात्मक विचारसरणी, भूतदया, वेदांची माहिती आणि धर्मशास्त्रांमधील विज्ञानाची सांगड त्या अत्यंत कौशल्याने घालतात. याचेच फलित म्हणून मुले आता कोणतीही सुट्टी न घेता, वेळेच्या अर्धा तास आधीच क्लाससाठी यायला लागली आहेत. मुलांमध्ये झालेला आचार-विचारांचा हा बदल पालकांसाठी सुखावह ठरत आहे. मुले आता आपापसात खेळताना थँक्यू किंवा सॉरी ऐवजी 'जय श्री राम'चा गजर करतात. रोज सकाळी सूर्यनारायणाला अर्घ्य देणे, घरातील आई, वडील, बहीण आणि वडीलधाऱ्यांच्या पाया पडून आशीर्वाद घेणे आणि जेवणानंतर आईचे कृतज्ञतापूर्वक कौतुक करणे, हा त्यांच्या दैनंदिन जीवनाचा भाग बनला आहे.

या संस्कारांच्या वर्गात अनेक बालके आपली उत्कृष्ट आणि अष्टपैलू चमक दाखवत आहेत. यामध्ये प्रामुख्याने अर्पिता रोहित कोकास, आरव धीरजसिंह चौहान, आयुष लखनसिंह ठाकूर, रणवीर उमेश यादव, आर्यन विलास इंगळे, आराध्या अजय शिंदे आणि दृष्टी विजयसिंह ठाकूर या मुलांचा समावेश असून त्यांनी प्रत्येक उपक्रमात उत्कृष्ट कामगिरी केली आहे. मुक्या प्राण्यांवर अथांग माया करणारी ही बालके आता रस्त्यावर गाय दिसताच धावत जाऊन तिचे लाड करतात आणि तिला चारा भरवतात. मुलांमधील ही भूतदया आणि संवेदनशीलता पाहून वाशिममधील पालकांचे डोळे सुखावले आहेत.

या उपक्रमाच्या माध्यमातून केवळ धार्मिक शिक्षणच दिले जात नाही, तर आपण जन्माला आल्यानंतर या सृष्टीचा, पर्यावरणाचा, प्राणी आणि पक्षीमात्रांचासांभाळ कसा करायचा, याचे व्यावहारिक धडे दिले जात आहेत. बालवयातच निसर्गप्रेम, पर्यावरण आणि प्राणिमात्रांवर दया करण्याचे संस्कार मिळाल्यामुळे ही मुले भविष्यात सुजाण नागरिक बनतील, यात शंका नाही. संजना अवस्थी यांनी वाशिम शहरात स्वतःहून लावलेले हे रोपटं भविष्यात संस्कारांचा महावृक्ष बनेल, असा विश्वास व्यक्त होत आहे.





# उमेश शिंदे लिखित व आनंद शिंदे बाबा दिग्दर्शित 'बापाचं स्वप्न' लघुपट आज 31 मे रोजी होणार प्रदर्शित"

**दैनिक युवक आधार नांदेड**

**गंगाधर कदम अर्धापूर प्रतिनिधी |**

हदगाव तालुक्यातील उंचेगाव खुर्द येथील स्थानिक कलाकारांच्या अभिनयाने सजलेला आणि सामाजिक आशय मांडणारा 'बापाचं स्वप्न' हा मराठी लघुपट नुकताच उत्साहपूर्ण वातावरणात पूर्ण झाला असून, हा लघुपट https://www.youtube.com/@Umeshfilms1 या लिंकवर आज दि. 31 मे 2026 रोजी प्रदर्शित होणार आहे.



उमेश फिल्म्स निर्मित या लघुपटाचे लेखन उमेश शिंदे यांनी केले असून निर्मितीसाठी किसान दुवारे यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. लघुपटाचे दिग्दर्शन उंचेगाव नगरीचे सुपुत्र आनंद शिंदे बाबा यांनी केले असून त्यांनी कथेला प्रभावीपणे पडद्यावर साकारण्याचा प्रयत्न केला आहे. लघुपटाचे छायाचित्रण गोविंद भोयर, पवन शिंदे आणि सत्यम जाधव यांनी केले आहे, तर स्थिरचित्रणाची जबाबदारी नामदेव पावले यांनी सांभाळली. प्रोडक्शन विभागात विशाल मोरे, ऋषी कदम आणि अमर तवर यांनी विशेष परिश्रम घेतले आहेत.या लघुपटात उमेश शिंदे, विशाल मोरे, अनिल शिंदे, ऋषी कदम, अमर तवर, सुदाम दरणे, नामदेव मुधळ, अतुल साबळे, तनीष्का खुपसरे, राधिका देशमुख, सागरताई शिंदे, सिद्धी शिंदे, अक्षिनी देवराये, अभय काळे, कैलास वारुळे, बालू दुवारे तसेच बालकलाकार साई कदम यांनी विविध भूमिका साकारल्या आहेत.बापाचं स्वप्न' या लघुपटाची कथा पारंपरिक कुटुंबव्यवस्था, नातेसंबंध आणि वडिलांच्या संघर्षमय जीवनावर आधारित असून समाजाला सकारात्मक दिशा देणारा संदेश यातून दिला जाणार असल्याचे दिग्दर्शक आनंद शिंदे बाबा यांनी सांगितले. या लघुपटाच्या निर्मितीसाठी उंचेगाव खुर्द येथील ग्रामस्थांचे मोलाचे सहकार्य लाभले असून, स्थानिक कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा हा एक स्तुत्य प्रयत्न असल्याची भावना निर्मात्यांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे 'बापाचं स्वप्न' या लघुपटाबाबत प्रेक्षकांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.

# नागपूर मध्यवर्ती कारागृहातील पुरुष व महिला बंदयांसाठी "Basic Life Support" प्रशिक्षणाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपूर** : "सुधारणा पुनर्वसन" हे महाराष्ट्र कारागृहाचे ब्रिद असुन कारागृहात बंदयांसाठी विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यात येतात. मा. श्री. सुहास वारके, अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे, मा. श्री. योगेश देसाई, विशेष कारागृह महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे व श्री. वैभव सु. आगे, अधीक्षक, नागपूर मध्यवर्ती कारागृह तथा कारागृह उपमहानिरीक्षक, पूर्व विभाग, नागपूर यांचे मार्गदर्शनाखाली नागपूर मध्यवर्ती कारागृहातील पुरुष व महिला बंदयांसाठी "Basic Life Support" प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले असुन त्यामध्ये 30 महिला बंदी व 60 पुरुष बंदी असे 90



प्रशिक्षणार्थी बंदयांनी सहभाग घेतला आहे सदर प्रशिक्षणाचा उद्देश बंदयांना आरोग्यसेवा क्षेत्रातील मुलभूत माहीती, आपात्कालीन परिस्थिती हाताळण्याचे कौशल्य व रोजगारभिमूख प्रशिक्षण उपलब्ध करुन देणे हा आहे. आज रोजी शालीनीताई मेघे हॉस्पीटल हिंगणा रोड, नागपूर येथील वैद्यकिय अधिकारी यांचेमार्फत हृदयक्रिया बंद पडणे, श्वसन बंद होणे, बेशुध्दावस्था, अपघातग्रस्तांना प्राथमिक उपचार देणे, आपात्कालीन परिस्थितीत रुग्णाची स्थिती ओळखणे तसेच सी.पी.आर. देण्याची योग्य पध्दत याचे प्रात्याक्षीक प्रशिक्षणार्थी बंदी व कारागृह अधिकारी/कर्मचारी यांना देण्यात आले. तसेच डमी मॉडलच्या साहयाने प्रात्याक्षीक व सराव करुन घेण्यात आला. त्यामुळे प्रशिक्षणार्थी बंदयांना केवळ सैध्दांतीक ज्ञानच नव्हे तर प्रत्यक्ष कौशल्य आत्मासात करण्याची संधी मिळाली. सदर कार्यक्रमाकरीता श्री. श्रीधर काळे, उपअधीक्षक, डॉ. रामेश्वर कोकुर्डे, मुख्य वैद्यकिय अधिकारी, श्री. आनंद पानसरे, वरिष्ठ तुरुंगाधिकारी, श्री. वामन निमजे, तुरुंगाधिकारी श्रेणी-1, श्री. भिमराव राऊत, तुरुंगाधिकारी श्रेणी-1, श्री. मनोहर भोसले, तुरुंगाधिकारी श्रेणी-1 डॉ. कुदसिया फिरदौस, वैद्यकिय अधिकारी, श्री. विठ्ठल उगले, सुभेदार, श्री. संजय गायकवाड, हवालदार, श्री. सुभाषचंद्र शाहू, शिपाई, श्री. धनपाल मेश्राम, क्रिष्णा पाडवी, प्रयास सामाजिक कार्यकर्ता, शालीनीताई मेघे हॉस्पीटल नागपूर येथील वैद्यकिय अधिकारी डॉ. वृंदा सोरटे, डॉ. रोशनी मानवानी, डॉ. अरीबा सिध्दीकी, डॉ. सिध्दांत शेट्टी, श्री. अश्वीन रडके, श्री. उमेश वडाफाले, वैद्यकिय समाज सेवक, डॉ. राजी वर्भे, अध्यक्ष रोटरी क्लब नॉर्थ, नागपूर, श्री. भोजराज शहारे, श्री. नेपाल कावडे, श्री. प्रफुल्ल धानेकर, श्रीमती समर्पीता मुखर्जी, तसेच पुरुष व महिला बंदी व कारागृह अधिकारी/ कर्मचारी उपस्थित होते.

# माणुसकीची भिंत : गरजूंना आधार देणारा मनोज भुजबळ यांचा अनोखा उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी:** जगदीश क्षीरसागर

पनवेल : समाजात अनेक कुटुंबे अशी आहेत की ज्यांना दोन वेळचे अन्न, अंगावरील कपडे किंवा दैनंदिन वापराच्या वस्तू मिळविण्यासाठी संघर्ष करावा लागतो. अशा गरजूंसाठी मदतीचा हात पुढे करत पनवेल महानगरपालिका प्रभाग क्रमांक १७ चे नगरसेवक तथा ॲड. मनोज भुजबळ यांनी सुरू केलेला "माणुसकीची भिंत" हा उपक्रम गेल्या अनेक वर्षांपासून अविरतपणे सुरू आहे.या उपक्रमाअंतर्गत नागरिकांना त्यांच्या घरातील वापरण्यायोग्य पण




नको असलेले कपडे, भांडी, चादरी, शालेय साहित्य तसेच इतर आवश्यक वस्तू माणुसकीच्या भिंतीच्या शेडमध्ये ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अनेकदा अशा वस्तू भंगारात जातात किंवा निरुपयोगी म्हणून बाजूला पडून राहतात. मात्र, त्याच वस्तू एखाद्या गरजवंतासाठी मोठा आधार ठरू शकतात.

"आपल्यासाठी जुने झालेले साहित्य दुसऱ्याच्या जीवनात नवी आशा निर्माण करू शकते," या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. येथे ठेवलेल्या वस्तू गरजू नागरिक कोणत्याही शुल्काशिवाय घेऊन जाऊ शकतात. त्यामुळे समाजात माणुसकी, सहकार्य आणि सामाजिक बांधिलकीची भावना अधिक दृढ होत आहे.

ॲड. मनोज भुजबळ यांच्या या उपक्रमामुळे अनेक गरजू कुटुंबांना मदतीचा हात मिळाला असून नागरिकांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. हा उपक्रम केवळ वस्तूंचे वाटप करणारा नसून, समाजातील संवेदनशीलतेची जपणूक करणारा आणि माणुसकीचे नाते अधिक घट्ट करणारा ठरत आहे.

नागरिकांनी घरातील चांगल्या स्थितीतील कपडे, भांडी, शालेय साहित्य व इतर उपयोगी वस्तू भंगारात न देता "माणुसकीची भिंत" येथे जमा करून या सामाजिक चळवळीत सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

"घरातील नको असलेली वस्तू फेकू नका... ती एखाद्याच्या आयुष्यात आनंद, आधार आणि आशेचा किरण ठरू शकते."

# गटविकास अधिकाऱ्यांच्या लेखी आश्वासना नंतर साखरी ग्रामस्थांचे उपोषण मागे

**दैनिक युवक आधार दिग्रस**

**तालुका प्रतिनिधी उमेश साखरकर**

दिग्रस तालुक्यातील साखरी गावातील भीषण पाणीटंचाईच्या प्रश्नावर अखेर प्रशासनाला दखल घ्यावी लागली असून गटविकास अधिकारी रमेश खरोडे यांनी दिलेल्या लेखी आश्वासना नंतर ग्रामस्थांनी सुरू केलेले उपोषण स्थगित केले आहे. अनेक दिवसांपासून पाण्यासाठी जीवघेणा संघर्ष करणाऱ्या ग्रामस्थांच्या एकजुटीपुढे प्रशासनाला झुकावे लागल्याची चर्चा परिसरात सुरू आहे साखरी गावात शासनाच्या "हर घर जल" योजनेअंतर्गत पाण्याची टाकी, विहीर व पाईपलाईनचे काम करण्यात आले. मात्र प्रत्यक्षात गावात नियमित पाणीपुरवठा सुरूच करण्यात आला नाही. लाखो रुपयांचा निधी खर्चूनही नागरिकांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत असल्याने ग्रामस्थांमध्ये प्रचंड संताप निर्माण झाला होता. गावातील महिला, वृद्ध आणि लहान मुलांना भर उन्हात दोन किलोमीटर अंतर पार करून दुसऱ्यांच्या विहिरीतून पाणी आणावे लागत असल्याने परिस्थिती अत्यंत गंभीर बनली होती.गटविकास अधिकारी यांनी तातडीने आंदोलनस्थळी भेट देत ग्रामस्थांशी चर्चा केली. यावेळी साखरी गावातील पाणीपुरवठा तात्काळ सुरू करण्यात येईल, तसेच नागरिकांना नियमित पाणी मिळण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतील, असे लेखी आश्वासन उपोषण कर्ते ज्ञानेश्वर गजानन व्यवहारे व ईतर गावकरी यांना देण्यात आले.प्रशासनाकडून लेखी हमी मिळाल्यानंतर ग्रामस्थांनी तात्पुरते आमरण उपोषण मागे घेतले असले तरी, दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी न झाल्यास यापेक्षाही तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. या वेळी या उपोषनाला राष्ट्रिय आदिवासी एकता परिषद चे जिल्हा अध्यक्ष दिलीप जवादे राष्ट्रिय आदिवासी कर्मचारी संघटनेचे राज्य पदाधिकारी उत्तम सोळंके वंचित बहुजन आघाडी चे तालुका अध्यक्ष पुंडलिक कुरडे अमोल बाराहाटे राष्ट्रिय आदिवासी छात्र संगठन चे प्रदेश अध्यक्ष गजानन गंडाळे राष्ट्रिय आदिवासी एकता परिषद चे दिग्रस तालुका अध्यक्ष रामेश्वर पेंदोर यांनी या उपोषण ला भेट देत समर्थन दर्शविले



# नवीन पनवेलमध्ये महिलांसाठी मोफत कॅन्सर तपासणी व आरोग्य शिबिराचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल(प्रतिनिधी)**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवस वर्षानिमित्त सेवाभावी संस्था श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या विद्यमाने ३० वर्षावरील महिलांसाठी कॅन्सर जनजागृती व मोफत कॅन्सर तपासणी शिबिर तसेच सर्वांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर मंगळवार दिनांक २ जून रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत नवीन पनवेल येथील चांगु काना ठाकूर विद्यालयात होणार आहे. शिबिरामध्ये विशेषतः गर्भाशय मुखाचा कर्करोग, स्तनाचा कर्करोग आणि मुखाचा कर्करोग याबाबत जनजागृती व मोफत तपासणी केली जाणार आहे. याशिवाय बीएमआय, रक्तदाब, रक्तातील साखर, डोळ्यांची तपासणी, ईसीजी, रक्त तपासणी, क्षयरोग तपासणी, छातीचा एक्स-रे, फॅमिली प्लॅनिंग सल्ला आदी सुविधा उपलब्ध असतील. तसेच विविध तज्ज्ञ डॉक्टरांकडून स्त्रीरोग, अस्थिरोग, बालरोग, नेत्ररोग आणि दंतचिकित्सा विषयक मार्गदर्शन दिले जाणार असून एचपीव्ही लसीकरणाबाबतही माहिती देण्यात येणार आहे. त्याचबरोबर आयुष्यमान आणि आभा कार्ड काढण्याची सुविधा यावेळी उपलब्ध करून देण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी डॉ. अस्मिता घरत (८४५४००९७६६) आणि गौरव कांडपिले (९९२०८६८००८) यांच्याशी संपर्क साधावा.




# अतिक्रमणाच्या वादातून हॉटेल मालकावर जमावाचा हल्ला- "मजीद कुरेशीचे नाव का घेतले?" म्हणत बॉटलने वार; मनोज टॅटू पाटील जखमी

**दैनिक युवक आधार दर्यापूर**

**ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी**

दर्यापूर, दि. 29 मे 2026:अंजनगाव टी पॉईंट येथे अतिक्रमण हटवण्याच्या वादातून हॉटेल व्यवसायिक मनोज टॅटू पाटील यांच्यावर 20 ते 25 जणांनी साडेसहा वाजता काचेच्या बॉटलने हल्ला केला. पाटील यांच्या चेहऱ्याला गंभीर दुखापत झाली असून



दर्यापूर ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. प्रकृती स्थिर आहे. पाटील यांच्या माहितीनुसार, अतिक्रमण काढताना मजीद कुरेशी यांच्या तक्रारीवरून वाद झाला. "तू मजीद कुरेशीचे नाव का घेतले?" असे म्हणत एकाने हुज्जत घातली. त्यानंतर जमावाने पाटील यांना घेरून चेहऱ्यावर बॉटलने वार केला. जखमी अवस्थेतही त्यांनी पाठलाग केला, पण ट्रक आडवा आल्याने आरोपी पळाले. दर्यापूर पोलिसांनी अज्ञात 20 ते 25 जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सीसीटीव्ही फुटेजवरून तपास सुरू आहे. घटनेमुळे परिसरात तणाव आहे. 'टॅटू पाटील' म्हणून परिचित असलेल्या मनोज पाटील यांच्यावरील हल्ल्याचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# शेतकरी बंधूनी डिएपी खतास पर्यायी खते वापरावीत कृषी विभागाकडून आवाहन

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/प्रतिनिधी अकोला** : राज्यामध्ये मागील ३ वर्षात खरीप हंगामात ४४ लाख मे.टन रासायनिक खतांचा वापर झाला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने युरिया, डीएपी, एमओपी (म्युरेट ऑफ पोटॅश), संयुक्त खते व एसएसपी (सिंगल सुपर फॉस्फेट) या खतांचा वापर केला जातो. महाराष्ट्र राज्य हे मृद परिक्षण व जमिन आरोग्य पत्रिकांचे आधारे एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन प्रणाली वापराकरीता अग्रेसर आहे. राज्यामध्ये लवकरच पेरणीला सुरुवात होणार असून डिएपी खताची शेतक-यांकडून जास्त मागणी होणार आहे. डिएपी (डी अमोनिअम फॉस्फेट) खता मध्ये १८ टक्के नत्र तर ४६ टक्के स्फुरद ही अन्नद्रव्य आहेत. राज्यामध्ये डीएपी खताचा पुरवठा अपेक्षेप्रमाणे होत नाही त्यामुळे पर्यायी खत वापरणे गरजेचे आहे. स्फुरद युक्त खतामध्ये डीएपी खतानंतर एसएसपी (सिंगल सुपर फॉस्फेट) या खताची सर्वाधिक मागणी आहे. एसएसपी खत हे देशातंर्गत तयार होत असून यामध्ये स्फुरद-१६ टक्के सह सल्फर व इतर सूक्ष्म अन्नद्रव्ये आढळून येतात. सल्फर अन्नद्रव्यामूळे तेलबिया पिकांमध्ये एसएसपी खताचा वापर फायदेशीर ठरणार आहे. डिएपी खताच्या एका गोणी ऐवजी युरिया अर्धी गोणी व एसएसपी तीन गोणी खतांचा वापर डिएपीस चांगला पर्याय आहे. एसएसपी बरोबरच संयुक्त खते जसे की एनपीके-१०:२६:२६, एनपीके-२०:२०:०:१३, एनपीके- १२:३२:१६, युरिया एसएसपी कॉम्पलेक्स व एनपीके-१५:१५:१५ या खतांच्या वापरामुळे नत्र व स्फुरद बरोबरच पालाश हे अन्नद्रव्य सुध्दा पिकांना उपलब्ध होते. त्यामुळे या संयुक्त खतांचा वापर केल्यास पिकांसाठी पोषक ठरतो. त्याचबरोबर टिएसपी (Tripple Super Phosphate) या खतामध्ये ४६ टक्के स्फुरद अन्नद्रव्याची मात्रा असुन




डिएपी खताच्या एका गोणी ऐवजी युरिया अर्धी गोणी व टिएसपी एक गोणी खतांचा वापर केल्यास तो देखिल डिएपी खतास उत्तम पर्याय आहे. चालू खरीप हंगामामध्ये शेतक-यांनी केवळ डिएपी खतावरच अवलंबून न राहता बाजार मध्ये उपलब्ध असलेल्या पर्यायी खत्तांचा वापर करण्याचे आवाहन कृषी विभागाकडून सर्व शेतकरी बांधवाना करण्यात येत आहे.

# दादर हादरलं! पीएनजी गॅस पाइपलाइन फुटल्याने परिसरात खळबळ

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी:- मयुर धुरी (दादर मुंबई)**

दादरच्या गोखले रोड परिसरात पीएनजी गॅस पाइपलाइन फुटल्याने एकच खळबळ उडाली. गॅसगळतीमुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून सुरक्षेच्या दृष्टीने प्रशासनाने तातडीने उपाययोजना केल्या. झाले असे महानगर पालिकीच्या कर्मचारी यांच्या कडून झाडाचा बुंदा कापण्याचे काम सुरू होते जेसीबी चा धक्का या पाईपलाईने यास लागून पाईप फुटला आणि यातून मोठ्या प्रमाणात गॅस गळीत होऊ लागली.अग्निशमन दल, पोलिस आणि महानगर गॅसच्या पथकांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.





# कर्तृत्व,संस्कार आणि समाजसेवेचा गौरव; श्री.नामदेवराव यादवराव पाचरणे पाटील यांचा अमृत महोत्सव सोहळा

**दैनिक युवक आधार वाशीम**
**करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी**

रिसोड समाजात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणारे, कुटुंबाचा आधारस्तंभ, संस्कारांचे जतन करणारे आणि अनेकांसाठी प्रेरणास्थान ठरलेले ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व श्री.नामदेवराव यादवराव पाचरणे यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या अमृत महोत्सव सोहळ्याची सर्वत्र जोरदार चर्चा सुरू आहे. आयुष्याची पंचाहत्तर र्षे यशस्वीपणे पूर्ण करत त्यांनी आपल्या कर्तृत्व, प्रामाणिकपणा, सामाजिक बांधिलकी आणि कुटुंबवत्सल स्वभावाच्या बळावर समाजात एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या या गौरवशाली जीवनप्रवासाचा सन्मान करण्यासाठी समस्त पाचरणे पाटील परिवाराच्या वतीने भव्य अमृत महोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. "वय हे केवळ आकड्यांमध्ये मोजले जाते; पण माणसाचे खरे मोठेपण त्याने कमावलेल्या माणुसकीत, संस्कारांत आणि समाजासाठी केलेल्या कार्यात असते," याची प्रचिती नामदेवराव पवारणे यांच्या जीवनाकडे पाहिल्यानंतर येते. आयुष्यभर कुटुंबाच्या प्रगतीसाठी, समाजातील एकोपा टिकवण्यासाठी आणि पुढील पिढीला चांगले संस्कार देण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली कुटुंबातील अनेक सदस्यांनी विविध क्षेत्रात यश संपादन केले असून आजही ते कुटुंबातील प्रत्येकासाठी प्रेरणा आणि मार्गदर्शक म्हणून ओळखले जातात. श्री. नामदेवराव पाचरणे यांनी आपल्या आयुष्यातील प्रत्येक जबाबदारी अत्यंत प्रामाणिकपणे पार पाडली. जीवनातील अनेक चढ-उतारांना धैर्याने सामोरे जात त्यांनी संयम,परिश्रम आणि चिकाटीच्या बळावर यशाचा मार्ग तयार केला. त्यामुळेच त्यांचा जीवनप्रवास हा केवळ त्यांच्या कुटुंबापुरता मर्यादित न राहता समाजातील तरुणांसाठी प्रेरणादायी ठरला आहे. त्यांनी जपलेली मूल्ये, माणुसकी आणि नातेसंबंधांची श्रीमंती हीच त्यांच्या आयुष्याची खरी संपत्ती असल्याचे त्यांच्या सहवासात आलेल्या प्रत्येकाला जाणवते.या अमृत महोत्सव सोहळ्यानिमित्त विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणून 'राधा म्युझिकल इव्हेंट, नांदेड' यांचा बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून उपस्थितांना संगीताची पर्वणी अनुभवता येणार आहे. याशिवाय मान्यवरांचे



मनोगत, सत्कार समारंभ, शुभेच्छा संदेश आणि कुटुंबीयांच्या भावना व्यक्त करणारे विविध कार्यक्रमही होणार आहेत. त्यामुळे हा सोहळा केवळ वाढदिवसाचा कार्यक्रम न राहता कुटुंबातील ऐक्य, प्रेम आणि संस्कारांचा उत्सव ठरणार आहे. अमृत महोत्सव सोहळा दि. 31 मे 2026, रविवार रोजी दुपारी 12.15 वाजता रिसोड येथील लंवोदर लॉन्समध्ये संपन्न होणार आहे. या कार्यक्रमास नातेवाईक,मित्रपरिवार, समाजबांधव आणि शुभेच्छुक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असून श्री.नामदेवराव पाचरणे यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होणार आहे. या विशेष प्रसंगी उपस्थित राहून ज्येष्ठांचा आशीर्वाद घ्यावा व त्यांच्या कार्याला मानवंदना द्यावी, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

यावेळी कार्यक्रमाचे आयोजन समस्त पाचरणे पाटील परिवाराच्या वतीने करण्यात आले असून लवोंदर लॉन्स, रिसोड येथे होणाऱ्या या भव्य सोहळयास उपस्थित राहण्याचे आवाहन महादेवराव पाचरणे, विष्णू पाचरणे, ब्रह्मदेव पाचरणे व सत्यम पाचरणे यांनी केले आहे. समाजबांधव, मित्रपरिवार, नातेवाईक व शुभेच्छुकांचे सहर्ष स्वागत करण्यात आले असून या सोहळयाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

आयुष्याच्या पंचाहत्तर वर्षांच्या या सुवर्णमयी प्रवासाचा गौरव करणारा हा सोहळा निश्चितच संस्मरणीय ठरणार असून, "माणूस किती वर्षे जगला यापेक्षा त्याने त्या वर्षांत किती माणसे जोडली, किती मने जिंकली आणि समाजासाठी किती योगदान दिले हेच त्याच्या आयुष्याचे खरे यश असते," या विचाराला साजेसा हा अमृत महोत्सव ठरणार आहे. समस्त पाचरणे पाटील परिवाराने आयोजित केलेल्या या सोहळयामुळे कुटुंबातील प्रेम, एकोपा आणि ज्येष्ठांविषयीचा आदर यांचे सुंदर दर्शन घडणार आहे.

# जोपर्यंत रस्त्याचे काम पूर्ण होत नाही, तोपर्यंत टोल सुरू नको!'

## खारपाडा टोलनाक्यावर उद्या कोकणकरांचा महाआक्रोश, थेट टोलबंदीसाठी आंदोलन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, ( वार्ताहर ) :**




मुंबई-गोवा महामार्गावरील खारपाडा टोलनाक्यावर टोलमाफी देण्यात आल्याचा दावा संपूर्णपणे खोटा आणि निव्वळ अफवा असल्याचे समोर आले आहे. राजकीय पक्षांचे नेते 'अर्ध्या हळकुंडात पिवळे' होऊन टोलमाफीचे खोटे श्रेय घेण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप आता स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांनी केला आहे. या फसवणुकीच्या निषेधार्थ आणि "जोपर्यंत महामार्गाच्या रस्त्याचे काम पूर्ण होत नाही, तोपर्यंत एकही रुपया टोल वसूल करू देणार नाही" हा आक्रमक पवित्रा घेत, खारपाडा टोल पूर्णपणे बंद करण्यासाठी (टोलबंदीसाठी) येत्या रविवारी (३१ मे २०२६) सकाळी ११:०० वाजता खारपाडा टोलनाक्यावर भव्य जनआंदोलन छेडण्यात येणार आहे.

मुंबई-गोवा महामार्गावरील खारपाडा टोल बंद करण्यासाठी गेल्या २५ मे पासून सलग बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू आहे. आता या आंदोलनाला तीव्र स्वरूप देण्यासाठी रविवार, दिनांक ३१ मे २०२६ रोजी सकाळी ठीक ११:०० वाजता खारपाडा टोलनाका (पेण, जिल्हा रायगड) येथे 'जनआक्रोश समिती' आणि स्थानिक नागरिकांच्या वतीने महाआंदोलन पुकारण्यात आले आहे. या आंदोलनात संपूर्ण कोकणकर रस्त्यावर उतरणार असून, "खारपाडा टोल बंद करूनच राहणार," असा निर्धार जनआक्रोश समितीने केला आहे. या जनआंदोलनात स्थानिक नागरिक, वाहनचालक आणि सर्व कोकणकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सुरेंद्र पवार आणि संजय जांगम यांनी केले आहे .

MH-46 आणि MH-06 क्रमांकाच्या वाहनांना टोलमाफीची घोषणा 'खोटी'!

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने (NHAI) कुठेही असं लेखी स्वरूपात दिलेले नाही की MH-06 (पेण/रायगड) आणि MH-46 (पनवेल) या क्रमांकाच्या वाहनांना टोलमाफी देण्यात आली आहे. हा निव्वळ राजकीय नेत्यांनी पसरवलेला गैरसमज असून टोलनाका प्रशासनाने याबाबतची अधिकृत आणि खरी स्थिती जाहीर करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

"राजकीय पक्षांची आंदोलने फसवी, टोलमाफीचे कोणतेही लेखी आदेश नाहीत!"

"राजकीय पक्षांची आंदोलने आणि दावे अत्यंत फसवे आहेत. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने (NHAI) कुठेही असं लेखी स्वरूपात दिलेले नाही की MH-06 आणि MH-46 या क्रमांकाच्या वाहनांना टोलमाफी देण्यात आली आहे. हा निव्वळ राजकीय नेत्यांनी पसरवलेला गैरसमज आहे. टोलनाका प्रशासनाने याबाबतची अधिकृत आणि खरी स्थिती जाहीर करावी. जोपर्यंत रस्त्याचे काम पूर्ण होत नाही, तोपर्यंत टोलवसुली पूर्णपणे बंदच झाली पाहिजे. या फसवणुकी विरोधात उद्या हजारोंच्या संख्येने उपस्थित राहून टोलमुक्त महामार्गाच्या लढ्यात सर्व नागरिकांनी सहभागी व्हावे."

– संतोष ठाकूर (सामाजिक कार्यकर्ते)

"टोलमाफी झाली तर मग आजच माझे ९५ रुपये का कट झाले?"

"टोलमाफी झाल्याच्या खोट्या घोषणा करून राजकीय नेते फक्त जनतेची दिशाभूल करत आहेत. जर खरंच टोलमाफी झाली आहे, तर मग आमच्या वाहनांचे पैसे का कापले जात आहेत? माझ्या MH-46-CH-1455 या क्रमांकाच्या वाहनाचे आज, ३० मे २०२६ रोजी सकाळी ०९:०८ वाजता खारपाडा टोल प्लाझा येथे FASTag द्वारे तब्बल ९५ रुपये कट झाले आहेत (टॅक्स आयडी: PH605300938632220). रस्त्याचे काम अजूनही अपूर्ण असताना अशा प्रकारे होणारी टोलवसुली म्हणजे सर्वसर्वसामान्य वाहनचालकांच्या खिशावर थेट दरोडा आहे."

– रितेश सावंत (त्रस्त वाहनचालक)

# वनराई समाधान शिबिर आणि वनराई माहितीपट प्रदर्शन

**दैनिक युवक आधार नागपूर**
**डॉ सुनिल भगत प्रतिनिधी दक्षिण**






वनराई स्वयंसेवी संस्था , गडचिरोली तर्फे आयोजित समाधान शिबिर आमदार निवास, नागपूर येथे दिनांक २६ मे २०२६ रोजी आयोजित करण्यात आले होते. डॉ चंद्रसुरेश डोंगरवार संचालित शिक्षण , आरोग्य आणि ग्रामविकास क्षेत्रामध्ये विशेष योगदान करण्यात येत असते. डॉ चंद्रसुरेश डोंगरवार हे ३० वर्षापासून गडचिरोली जिल्ह्यात विविध ठिकाणी शासकीय वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

शिबिराचे उद्घाटन गोविंद पोतदार, अध्यक्ष, रामकृष्ण हॉस्पिटल , वर्धमाननगर, नागपूर आणि रामदेव अग्रवाल उपाध्यक्ष, समृद्ध भारत यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले.

संगीता वालदे, प्रमुख, समृद्ध भारत, महिला बचत गट ह्या प्रामुख्याने हजर होत्या.

ह्याप्रसंगी डॉ सुनिल भगत, कार्याध्यक्ष , देवयानी भगत राज्य महिला सहकार्यवाह महाराष्ट्र अधश्रद्धा निमूलन समिती नागपूर यांनी वनराई फाउंडेशन ला अनेक शुभेच्छा व्यक्त केल्या.

डॉ सतीश मेश्राम, अस्थीशल्यचिकित्सक,

प्रभानंद बावणे, वरिष्ठ अभियंता, इस्पात, शिवाजी जाधव, शिक्षक, अनिल वाघ, सेवादल कार्यकर्ता, अरुण केदार, विदर्भ राज्य आंदोलन समन्वयक, मुकेश मसुरकर, युवा अध्यक्ष विदर्भ राज्य, प्रताप काशीकर, शंकानाद, चंदा मोटघरे, manis, कामिनी बनकर, राजसाक्षी अखबार, सुषमा डबराल, मनकी आवाज,दामोदर रामटेके, संजय रामटेके यांनी आपले अनुभव कथन केले.

ह्याप्रसंगी रबीमोहन जोशी ह्यांनी तयार केलेला माहितीपट ह्याचे प्रदर्शन करण्यात आले.

डॉ डोंगरवार यांनी वनराई स्वयसेवी संस्थेचे उद्दिष्टे स्पष्ट केलीत. ह्याप्रसंगी दिवसभर २०० च्या वर मान्यवर उपस्थित राहून मार्गदर्शन केले आणि वनराई च्या कार्याला सदिच्छा व्यक्त केल्या.

निवासी उपजिल्हाधिकारी, तथा अपर जिल्हादंडाधिकारी , नांदेड किरण अंबेकर साहेबांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना राष्ट्रवादीचे नेते शशी पाटील क्षीरसागर , राष्ट्रवादी मुदखेड चे तालुकाध्यक्ष आनंद टिप्परसे , अरविंद पांचाळ उपसरपंच दाभड , तसेच भाजपाचे बाबुराव क्षीरसागर आदी उपस्थित सर्व मंडळी

( दैनिक युवक आधार )



# पनवेल जॉब ड्राईव्ह २०२६ ला उत्स्फूर्त प्रतिसाद; शेकडो युवक-युवतींना मिळाल्या रोजगाराच्या संधी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७५ व्या अर्थात अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त आयोजित विविध सामाजिक उपक्रमांच्या मालिकेअंतर्गत आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि एकलव्य फाउंडेशनच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेला "पनवेल जॉब ड्राईव्ह २०२६" हा भव्य रोजगार मेळावा आज उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरित्या संपन्न झाला. शेकडो युवक-युवतींनी या रोजगार मेळाव्यात सहभाग नोंदवून रोजगाराच्या संधींचा लाभ घेतला.

पनवेल शहरातील मार्केट यार्ड येथील श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या रोजगार मेळाव्याला सकाळपासूनच युवक-युवतींची मोठी गर्दी झाली होती. रोजगाराच्या शोधात असलेल्या उमेदवारांनी आपली शैक्षणिक पात्रता, कौशल्ये आणि अनुभव यानुसार विविध



कंपन्यांच्या प्रतिनिधींशी थेट संवाद साधत मुलाखती दिल्या.

या मेळाव्यात बँकिंग, माहिती तंत्रज्ञान (आयटी), आयटीईएस, रिटेल, ग्राहक सेवा, फायनान्स, विमा, बॅक ऑफिस, मानव संसाधन (एचआर) आदी विविध क्षेत्रांतील नामांकित कंपन्यांनी सहभाग घेतला. अनेक कंपन्यांनी जागेवरच प्राथमिक मुलाखती घेत पात्र उमेदवारांची निवड प्रक्रिया सुरू केली. त्यामुळे सहभागी युवक-युवतींना रोजगारासाठी थेट व्यासपीठ उपलब्ध झाले. युवकांना रोजगाराच्या संधी त्यांच्या परिसरातच उपलब्ध करून देणे, उद्योग क्षेत्र आणि रोजगार शोधणारे युवक यांच्यातील दरी कमी करणे तसेच कौशल्याधारित रोजगाराला चालना देणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता. या उद्देशाला प्रतिसाद देत शेकडो युवक-युवतींनी उत्साहाने सहभाग घेतला.

या रोजगार मेळाव्यात ३आय इन्फोटेक लिमिटेड, रिलायन्स, टीमलीज सर्व्हिस, ओटू बीज सर्व्हिसेस, यशस्वी ग्रुप, एस. एच. केळकर लिमिटेड, सुधरलँड, महिंद्रा इंटर्ग्रेटेड बिझनेस सोल्युशन, एचडीएफसी बँक, एनआयआयटी फाऊंडेशन, टाटा कन्स्लटी सर्व्हिसेस, डिजीटाईड सोल्युशन, एचडीबी फायनांशल सर्व्हिसेस, टाटा एआयए लाईफ इन्शुरन्स, भारती एअरटेल, वेस्टसाईड ट्रेंट लिमिटेड, एसबीआय कॅप सिक्युरिटीज आदी कंपन्यांचा सहभाग होता. कंपन्यांच्या प्रतिनिधींनी उमेदवारांच्या शैक्षणिक पात्रता, संवाद कौशल्य, तांत्रिक ज्ञान आणि अनुभवाच्या आधारे मुलाखती घेतल्या.

या उपक्रमामुळे स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी शोधण्यासाठी मोठ्या शहरांमध्ये धावपळ करण्याची गरज भासली नाही. एकाच छताखाली विविध क्षेत्रांतील कंपन्यांशी संपर्क साधण्याची संधी उपलब्ध झाल्याने सहभागी युवक-युवतींनी समाधान व्यक्त केले. रोजगाराभिमुख उपक्रमांच्या माध्यमातून युवकांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी सातत्याने प्रयत्न करणाऱ्या आयोजकांच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले.

रोजगार मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी सहभागी कंपन्या, एकलव्य फाउंडेशनचे पदाधिकारी, स्वयंसेवक, कार्यकर्ते आणि सर्व सहकाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली. त्यांच्या योगदानाबद्दल आयोजकांच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

# बनावट आयुर्वेदिक औषधे आणि बोगस उपचार केंद्रांचा वाढता विळखा : जनतेच्या आरोग्याशी सुरू असलेला जीवघेणा खेळ

राज्यात बनावट आयुर्वेदिक औषधांचा काळाबाजार आणि बोगस उपचार केंद्रांचा सुळसुळाट दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे.अनेक ठिकाणी परवानगीशिवाय आयुर्वेदिक उपचार केंद्रे चालवले जात आहेत,तर काही ठिकाणी खोट्या व दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांची आर्थिक आणि मानसिक फसवणूक केली जात आहे.नुकतीच राज्यभरातील सात जिल्ह्यांमध्ये १२ आयुर्वेदिक औषधविक्री आस्थापनांवर धडक कारवाई करून तब्बल ७३ लाख २४ हजार ६५६ रुपयांचा मिसब्रँडेड व आक्षेपार्ह जाहिराती असलेला औषधसाठा अन्न व औषध प्रशासन विभागाकडून जप्त करण्यात आला.या कारवाईमुळे राज्यातील बनावट औषध व्यवसायाचे गंभीर वास्तव पुन्हा एकदा समोर आले आहे.अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट शब्दांत इशारा दिला आहे की,जनतेच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या कोणालाही प्रशासनाकडून कोणतीही सवलत दिली जाणार नाही. भ्रामक जाहिराती,अवैध औषध उत्पादन आणि बेकायदेशीर विक्रीविरोधातील कारवाई अधिक कठोर आणि सातत्यपूर्ण केली जाईल.प्रशासनाची ही भूमिका महत्त्वाची असली तरी प्रत्यक्षात राज्यातील अनेक शहरांमध्ये आणि ग्रामीण आणि शहरी भागात ही अजूनही बोगस आयुर्वेदिक उपचार केंद्रे खुलेआम सुरू असल्याचे वास्तव नाकारता येत नाही.विशेष म्हणजे आर्थिक राजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबई शहरातही बनावट आयुर्वेदिक उपचार केंद्रांचे







जाळे मोठ्या प्रमाणात पसरले असल्याचे अनेकदा समोर आले आहे.मुंबई शहर आणि उपनगराच्या अनेक भागांमध्ये तसेच गर्दीच्या बाजारपेठांमध्ये अनेक तथाकथित आयुर्वेदिक उपचार केंद्रे दवाखाने लोकांना “हमीशीर उपचार” देण्याच्या नावाखाली लुटत आहेत.काही केंद्रांवर कोणतीही वैद्यकीय पदवी नसलेले लोक स्वतःला डॉक्टर किंवा वैद्य म्हणून सादर करतात.मोठमोठे बॅनर,सोशल मीडियावरील जाहिराती आणि व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून “कॅन्सर पूर्ण बरा”, “मधुमेह कायमचा नष्ट”, “किडनी विकारावर खात्रीशीर उपाय”, “गुडघे दुःखीपासून कायमची मुक्तता”, “लठ्ठपणा ७ दिवसांत कमी” अशा प्रकारच्या भ्रामक जाहिराती करून लोकांना जाळ्यात ओढत आहेत.गरीब आणि मध्यमवर्गीय नागरिक हे कमी खर्चात उपचार मिळतील या आशेने अनेक जण अशा आयुर्वेदिक उपचार केंद्रांकडे वळतात.मात्र प्रत्यक्षात त्यांच्याकडून हजारो,लाखो रुपये उकळले जातात.काही वेळा चुकीची बनावट औषधे दिल्यामुळे रुग्णांची प्रकृती आणखी बिघडते. अनेकांना गंभीर दुष्परिणामांना सामोरे जावे लागते. काही प्रकरणांमध्ये तर वेळेवर योग्य उपचार न मिळाल्याने रुग्णांचा जीव धोक्यात आल्याच्या घटनाही घडल्या आहेत.आजकाल सोशल मीडिया हे या बोगस व्यवसायाचे सर्वात मोठे माध्यम बनले आहे.फेसबुक,यूट्यूब,इंस्टाग्राम आणि विविध वेबसाईट्सवर आकर्षक व्हिडीओ व बनावट अनुभव दाखवून लोकांचा विश्वास संपादन केला जातो.काही जण खोटे रुग्ण उभे करून “आम्ही पूर्ण बरे झालो” अशा प्रतिक्रिया दाखवतात.यामुळे सर्वसामान्य लोक सहजपणे फसतात.विशेषतः गंभीर आजारांनी त्रस्त असलेले रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांची मानसिक अवस्था लक्षात घेऊन त्यांची फसवणूक केली जाते.राज्यातील अनेक बोगस आयुर्वेदिक उपचार केंद्रांमध्ये औषधांची कोणतीही गुणवत्ता तपासणी होत नाही.उत्पादन कुठे तयार झाले,त्यात कोणते घटक आहेत,त्याचा शरीरावर काय परिणाम होईल याबाबत कोणतीही अधिकृत माहिती नसते.काही ठिकाणी तर बनावट लेबल लावून औषधे विकली जातात.अशा औषधांमुळे यकृत,मूत्रपिंड आणि हृदयाशी संबंधित गंभीर दुष्परिणाम होण्याची शक्यता असते.या वाढत्या प्रकारांमुळे केवळ आरोग्य व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह निर्माण होत नाही,तर खऱ्या आयुर्वेद शास्त्राची प्रतिमाही मलिन होत आहे.आयुर्वेद ही भारताची प्राचीन आणि प्रभावी उपचार पद्धती मानली जाते. मात्र काही बोगस लोकांच्या गैरप्रकारांमुळे संपूर्ण आयुर्वेद व्यवस्थेबद्दल समाजात संशय निर्माण होत आहे.त्यामुळे अशा फसव्या आयुर्वेदिक व्यवसायांवर कठोर कारवाई करणे अत्यंत गरजेचे आहे.प्रशासनाने केवळ अधूनमधून कारवाई करून थांबता कामा नये. नियमित तपासण्या,परवाना पडताळणी,ऑनलाईन जाहिरातींवर नियंत्रण आणि बोगस आयुर्वेदिक दवाखान्यांवर तातडीने गुन्हे दाखल करणे आवश्यक आहे.तसेच नागरिकांनीही जागरूक राहणे तितकेच महत्त्वाचे आहे.कोणत्याही आयुर्वेदिक डॉक्टरकडे उपचार घेण्यापूर्वी त्यांची अधिकृत नोंदणी,वैद्यकीय पात्रता आणि औषधांचा परवाना तपासणे गरजेचे आहे.संशयास्पद जाहिराती आणि अवैध उपचार केंद्रांची माहिती प्रशासनाला देणे ही प्रत्येक नागरिकाची प्राथमिक जबाबदारी आहे.जनतेच्या जीवाशी खेळ करणाऱ्या बनावट औषध माफियांना वेळीच आळा घातला नाही तर भविष्यात परिस्थिती आणखी गंभीर होऊ शकते.त्यामुळे सरकार,अन्न व औषध प्रशासन,आरोग्य विभाग आणि नागरिक यांनी एकत्रितपणे या बोगस साखळीविरोधात लढा उभारणे ही काळाची गरज बनली आहे.



- केतन दत्ताराम भोज,घाटकोपर
सदस्य - मराठी वृत्तपत्र लेखक संघ,मुंबई
मो - ८३६९५५४४१८

## पनवेलमध्ये "TOKYO DRIFT Festival" कार्यक्रमाबाबत चौकशी व कारवाईची मागणी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, प्रतिनिधी** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पनवेल महानगरपालिका क्षेत्राचे युवक अध्यक्ष अक्षय विकास अहिरे यांनी पनवेल तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना निवेदन देत "TOKYO DRIFT Festival" या कार्यक्रमाची सखोल चौकशी करून आवश्यक ती कारवाई करण्याची मागणी केली आहे.निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, दिनांक 30 मे 2026 रोजी सायंकाळी 6 वाजता आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात मोठ्या प्रमाणात युवक-युवती सहभागी होण्याची शक्यता आहे. कार्यक्रम रात्रभर चालणार असल्याची माहिती असून त्यामुळे वाहतूक कोंडी, ध्वनीप्रदूषण, सार्वजनिक शांतता भंग तसेच कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.याशिवाय अशा प्रकारच्या कार्यक्रमांमध्ये मद्यपान किंवा इतर प्रतिबंधित पदार्थांचा गैरवापर होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने युवकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने विशेष खबरदारी घेण्याची गरज असल्याचे निवेदनात म्हटले आहे. अक्षय अहिरे यांनी प्रशासनाकडे कार्यक्रमासाठी आवश्यक परवानग्या, सुरक्षा व्यवस्था, अग्निसुरक्षा उपाययोजना, वाहतूक नियंत्रण तसेच इतर कायदेशीर बाबींची तातडीने चौकशी करण्याची मागणी केली आहे. नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्यात यावी, अशीही मागणी त्यांनी केली.सार्वजनिक हित आणि युवकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने प्रशासनाने या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी अपेक्षा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) तर्फे व्यक्त करण्यात आली आहे.

## पीएम किसान योजनेची वार्षिक ई-केवायसी ३० जूनपूर्वी पूर्ण करा

**दैनिक युवक आधार अकोला**

**दिलीप कराळे प्रतिनिधी** : प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम किसान) योजनेचा लाभ घेणाऱ्या सर्व पात्र शेतकऱ्यांना पुढील हप्ता अखंडित सुरू ठेवण्यासाठी ३० जूनपूर्वी आपली वार्षिक ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे बंधनकारक करण्यात आले आहे. मुदतीत ही प्रक्रिया पूर्ण न केल्यास संबंधित शेतकरी लाभापासून वंचित राहण्याची शक्यता आहे.

योजनेमध्ये पारदर्शकता आणणे, गळती रोखणे आणि केवळ खऱ्या व जिवंत लाभार्थींपर्यंतच शासनाचे अर्थसाहाय्य पोहचवणे हा या मोहिमेमागचा मुख्य उद्देश आहे. यासाठी राज्यभरात २० मे २०२६ पासून विशेष मोहीम राबवण्यात येत आहे. प्रशासकीय स्तरावर यासाठी जय्यत तयारी करण्यात आली असून, गावपातळीवर याबद्दल जनजागृती करण्यात येत आहे.

सध्या वार्षिक ई-केवायसी मोहीम राबवली




जात आहे. ३० जून ही या प्रक्रियेची अंतिम मुदत असून, विहित मुदतीत ही प्रक्रिया पूर्ण न झाल्यास आगामी हप्ते तांत्रिक कारणास्तव थांबवले जाऊ शकतात. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांनी ई-केवायसी प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हा नोडल अधिकारी (पीएम किसान) तथा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मुरली इंगळे यांनी केले.

**दिव्यांग व वृद्ध शेतकऱ्यांसाठी घरपोच**

**सुविधा :-**

ज्या वृद्ध किंवा आजारी लाभार्थ्यांना शारीरिक हालचालींमुळे केंद्रावर जाणे शक्य नाही, त्यांच्यासाठी शासनाने विशेष सोय केली आहे. गाव पातळीवरील ग्रामस्तरीय नोडल अधिकारी आणि क्षेत्रीय कर्मचारी अशा लाभार्थींच्या घरी जाऊन ‘फेस ऑथेंटिकेशन’द्वारे त्यांची ई-केवायसी पूर्ण करण्यास मदत करणार आहेत.

**दोन सोप्या पद्धतीने करा प्रमाणीकरण**

बायोमॅट्रिक पद्धत : शेतकरी आपल्या जवळच्या सामूहिक सुविधा केंद्रावर जाऊन अंगठ्याचा ठसा देऊन ई-केवायसी करू शकतात.

फेस ऑथेंटिकेशन : पीएम किसान मोबाइल ॲप डाऊनलोड करून स्वतःच्या चेहऱ्याद्वारे घरबसल्या ही प्रक्रिया पूर्ण करू शकतात.

## पनवेल रेल्वे स्थानकात संभाव्य अपघात टाळण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, ( वार्ताहर )** : पनवेल रेल्वे स्थानकात प्लॅटफॉर्मच्या सुरुवातीलाच असलेल्या खराब आणि धोकादायक भागामुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. सकाळच्या गर्दीच्या वेळेत हजारो प्रवासी गाडी पकडण्यासाठी धावपळ करत असतात. अशावेळी एखाद्याचा पाय अडकून मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. स्थानक परिसरातील तुटलेले भाग, उघडी जागा आणि असमतोल रस्ता यामुळे ज्येष्ठ नागरिक, महिला आंणि लहान मुलांना अधिक त्रास सहन करावा लागत आहे. अनेकदा प्रवाशांनी याबाबत तक्रारी करूनही परिस्थितीत कोणताही बदल झालेला दिसत नाही. लोकप्रतिनिधी आणि संबंधित अधिकारी स्थानकाला भेट देतात, पाहणीही करतात; मात्र प्रत्यक्षात समस्या कायम असल्याने प्रवाशांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. संभाव्य अपघात टाळण्यासाठी रेल्वे प्रशासनाने तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.




## २१ वी राष्ट्रीय कॅडेट तलवारबाजी स्पर्धा: महाराष्ट्राला 'इपी' सांघिक प्रकारात कांस्यपदक!

**दैनिक युवक आधार**
**निफाड क्रीडा प्रतिनिधी**
**विलास गायकवाड**

नाशिक /_रुद्रपूर (उत्तराखंड)येथे सुरू असलेल्या २१ व्या राष्ट्रीय कॅडेट तलवारबाजी स्पर्धेत महाराष्ट्राच्या संघाने चमकदार कामगिरी करत 'इपी' (Epee) सांघिक प्रकारात कांस्यपदक (Bronze Medal) पटकावले आहे. २८ मे रोजी झालेल्या अत्यंत चुरशीच्या आणि अटीतटीच्या सामन्यात हरियाणाकडून महाराष्ट्राला पराभव स्वीकारावा लागला, ज्यामुळे महाराष्ट्राला कांस्यपदकावर समाधान मानावे लागले. या क्रीडा प्रकारात हरियाणाच्या संघाने सुवर्णपदक, तर पंजाबच्या संघाने रौप्यपदक पटकावले. महाराष्ट्र आणि मणिपूर या दोन्ही राज्यांना संयुक्तपणे कांस्यपदक जाहीर झाले. महाराष्ट्राच्या कांस्यपदक विजेत्या संघात खालील खेळाडूंचा समावेश होता:सारंग शेटकर (नाशिक),जानवी जाधव (लातूर) विधी पाटील (पुणे),किरा पुरंदरे (मुंबई) महाराष्ट्राच्या या यशामागे प्रशिक्षक आणि मार्गदर्शकांचे मोठे योगदान लाभले. खेळाडूंना अजिंक्य दुधारे, स्वामी श्वेता चंडालिया, दत्ता गलाले, जय शर्मा आणि राजू शिंदे यांचे बहुमूल्य मार्गदर्शन लाभले. महाराष्ट्राच्या तलवारबाजांनी राष्ट्रीय पातळीवर मिळवलेल्या या यशाबद्दल क्रीडा क्षेत्रातून त्यांचे कौतुक होत आहे. भारतीय तलवारबाजी असोसिएशनचे अध्यक्ष सतीश पाटील, उपाध्यक्ष अशोक दुधारे, महाराष्ट्र फेन्सिंग असोसिएशनचे कार्याध्यक्ष शिवाजी राजे जाधव, सरचिटणीस डॉ. उदय डोंगरे, खजिनदार राजकुमार सोमवंशी आणि राजू शिंदे यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांनी विजेत्या खेळाडूंचे आणि त्यांच्या मार्गदर्शकांचे जाहीर अभिनंदन केले असून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.



# सेलूच्या कर्तृत्ववान लेकीवर अभिनंदनाचा वर्षाव साक्षी कुलकर्णीचा विविध संघटनांच्या वतीने सत्कार

**दैनिक युवक आधार**

**सेलू:** येथील साक्षी श्रीपाद कुलकर्णी मसलेकर यांनी केंद्र शासनाच्या आपत्कालीन सूचना प्रणालीच्या निर्मिती मध्ये दिलेल्या योगदानाबद्दल शहरातील विविध शैक्षणिक, सामाजिक, साहित्यिक, सांस्कृतिक संघटना, पत्रकार संघ, महिला मंडळाच्या वतीने शुक्रवार ( दि.२९) रोजी स्वामी रामानंद तीर्थ हिंदी -मराठी ग्रंथालयाच्या वाचन कक्षात नूतन विद्यालय शिक्षण संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. विनायकराव कोठेकर यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष मिलिंद सावंत यांची उपस्थिती होती. तर व्यासपीठावर भास्करराव कुलकर्णी, सत्कारमूर्ती साक्षी कुलकर्णी यांची उपस्थिती होती. कमी वयात देशपातळीवर सेलूचा नावलौकिक वाढविल्या बद्दल सेलूची कर्तृत्ववान लेक साक्षीवर



मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव झाला. नूतन विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष पाटील, चंद्रकांत कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त केले. प्राचार्य डॉ. विनायकराव कोठेकर मनोगतात म्हणाले की," मुली कुठेही कमी नाहीत हे साक्षीने बुध्दीमत्ता, अभ्यास आणि कर्तृत्ववातून सिध्द केले आहे. छोटासा ग्रामीण भाग गंगामसला व्हाया सेलू ते दिल्ली हा साक्षीचा प्रवास सर्वांनाच प्रेरणा देणारा आहे." तर नगराध्यक्ष मिलिंद सावंत यांनी, " साक्षीने भविष्यात इसरो आणि नासामध्ये जाऊन काम करावे. जीवनातील सर्व यशोशिखरे गाठावीत. " अशी भावना व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी यांनी केले. सुत्रसंचलन डॉ. काशिनाथ पल्लेवाड यांनी केले.तर आभार प्रदर्शन सुभाष मोहकरे यांनी केले. कार्यक्रमास नूतन विद्यालय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ.एस.एम.लोया, सहसचिव जयप्रकाश बिहाणी, महेशराव खारकर, उपेन्द्र बेलूलकर, विजय चौधरी, मनिष कदम,ज्येष्ठ पत्रकार नारायणराव पाटील, शिवनारायण मालाणी, गणेश माळवे, पुनमचंद खोना,विजया कोठेकर, ललिता गिल्डा, वसुधा खारकर, डॉ.भाग्यश्री धामणगावकर, सुनिल गायकवाड, माधव गव्हाणे, नारायण इक्कर, वल्लभ लोया, दत्तात्रय माकोडे, यांच्यासह शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती.कार्यक्रम यशस्वीतेसाठी सत्कार सोहळा संयोजन समितीचे समन्वयक डॉ.सुरेश हिवाळे, डॉ. शरद ठाकर आणि विविध संघटनांच्या सदस्यांनी पुढाकार घेतला.

सत्कार सोहळ्याने वातावरणात चैतन्य निर्माण झाले

शहरातील नूतन विद्यालय शिक्षण संस्था, स्वामी रामानंद तीर्थ हिंदी - मराठी ग्रंथालय, नूतन विद्यालय, शब्दसह्याद्री व अक्षर प्रतिष्ठान, शारदा विद्यालय, विवेकानंद शैक्षणिक संकुल,जनुभाऊ रानडे व्याख्यानमाला, पत्रकार संघ, व्हाईस ऑफ मिडीया, सेलू नागरी सहकारी पतसंस्था, टेबल टेनिस असोशियशन, महाराष्ट्र, पेंशनर्स असोशियशन, महिला मंडळ,सेलू, मॉर्निंग गृप, नवचेतना प्रतिष्ठान, नूतन महाविद्यालय, शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख शिक्षण परिषद, रेल्वे प्रवासी संघ, श्री शंकरलिंग मंदिर देवस्थान या संस्थेच्या वतीने साक्षी कुलकर्णीचा सत्कार करण्यात आला. सत्कार सोहळ्याने वातावरणात चैतन्य निर्माण झाले होते.

# स्वयं-अर्थसहाय्य शिक्षकांचा आक्रोश : आता सन्मानासाठी मतदान

## मोटर सायकलची वाहनाला धडक, एकाचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : मोटरसायकलने अज्ञात वाहनाला पाठीमागून दिलेल्या धडकेत रोशन सुरेश मानकुमरे (21 राहणार कावडी, जावळी, सातारा) याचा मृत्यू झाला. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात 29 मे रोजी करण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार 29 मे रोजी मध्यरात्री दोनच्या सुमारास रोशन हा केटीएम आरसी मोटरसायकल क्रमांक एम एच 47 एपी 9545 घेऊन मुंबई पुणे एक्सप्रेस वरच्या पुणेकडे जाणाऱ्या लेनवर भाताण येथे दुचाकीला प्रवेश करण्यास मनाई असताना देखील जात होता. त्यावेळी अज्ञात वाहनाला पाठीमागून धडक दिल्याने झालेल्या अपघातात तो गंभीर जखमी झाला. त्याला एमजीएम हॉस्पिटल, कामोठे येथे दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले.

## सोन्याच्या दागिन्यांची चोरी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** :अनोळखी महिलेने घरात प्रवेश करून 29 ग्राम सोन्याच्या वजनाचे दागिने चोरून नेल्याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात 29 मे रोजी करण्यात आला.    तमन्ना रघुवंशी या खारघर येथे राहत असून 29 मे रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास अनोळखी महिलेने त्यांच्या कडी लावलेल्या रूम मधून कडी उघडून आत मध्ये प्रवेश केला आणि त्यांच्या निळया रंगाच्या सुटकेस मधून 29 ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने चोरी करून नेले.

## विद्यार्थ्याला शिवीगाळ करून मारण्याची दिली धमकी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : तलवार बाळगून अमेटी युनिव्हर्सिटी भाताण येथे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याला शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी आरोपी तुषार सिंग (अमेटी यूनिवर्सिटी) आणि त्याच्यासोबतचे सात ते आठ साथीदार यांच्या विरोधात 29 मे रोजी पनवेल तालुका पोलीस ठाणे विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.    29 मे रोजी अमेटी युनिव्हर्सिटी भाताण या महाविद्यालयातील तिसऱ्या वर्षाची परीक्षा दिलेला स्टुडन्ट तुषार सिंग हा त्याच्यासोबत सात ते आठ जणांना घेऊन तीन कारने महाविद्यालयात आला आणि शस्त्र अधिनियमाचे उल्लंघन करून तुषार सिंग याने उजव्या हातात तलवार बाळगली आणि युनिव्हर्सिटीत शिक्षण घेणारा अमन खान याला शिवीगाळ केली आणि मारण्याची धमकी देऊन कॉलेजमध्ये दहशत निर्माण केली. या प्रकाराची माहिती मिळाल्यानंतर पनवेल तालुका पोलिसांनी आरोपी कडील तलवार हस्तगत केली आणि आरोपी तुषार सिंग आणि त्याच्या साथीदारांविरोधात गुन्हा दाखल केला. पोलिसांनी यातील तीन जणांना अटक केली आहे.

## खा.डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या शिवसंवाद दौऱ्यानिमित्त पाटोदा शहर भगवामय

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी)** - शिवसेनेचे संसदीय गटनेते खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या शिवसंवाद दौऱ्यानिमित्त संपूर्ण पाटोदा शहर भगवामय झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. शहरातील प्रमुख चौक, रस्ते, स्वागत कमानी, भगवे झेंडे व बॅनरमुळे राजकीय वातावरण चांगलेच तापले होते. शिवसैनिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. या दौऱ्याची तालुकाभर जोरदार चर्चा सुरू आहे. या वेळी पाटोदा येथे नव्याने सुरू करण्यात आलेल्या शिवसेना कार्यालयाचे उद्घाटन प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले. कार्यालय उद्घाटन सोहळ्यासाठी शिवसैनिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. भगव्या झेंड्यांनी सजलेले कार्यालय परिसर आकर्षणाचे केंद्र ठरले. विशेष म्हणजे पाटोदा तालुका प्रमुख पदाची जबाबदारी सांभाळत असताना राहुल भैय्या चौरे यांनी पाटोद्यात खासदार व मंत्री दर्जाचे नेते आणून स्वतःची राजकीय ताकद दाखवून दिल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. अनेकांना जे शक्य झाले नाही ते राहुल भैय्या चौरे यांनी करून दाखविल्याने शिवसैनिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे .शिवसंवाद दौऱ्यासाठी तालुक्यात मोठ्या प्रमाणात नियोजन करण्यात आले होते. विविध गावांमधून आलेल्या शिवसैनिकांनी घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला. या वेळी युवकांची उपस्थिती विशेष लक्षवेधी ठरली. शहरात ठिकठिकाणी स्वागत फलक लावण्यात आले होते. या दौऱ्यामुळे पाटोदा तालुक्यात शिवसेनेची ताकद पुन्हा एकदा दिसून आली असून आगामी स्थानिक राजकारणात राहुल भैय्या चौरे यांची भूमिका महत्त्वाची ठरणार असल्याची चर्चा आता सुरू झाली आहे.

**दैनिक यु वक आधार**

ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका

देश उभा राहतो तो सैनिकाच्या शौर्यावर, शेतकऱ्याच्या घामावर आणि शिक्षकाच्या संस्कारांवरअवलंबून असतो. शिक्षक हा केवळ नोकरी करणारा कर्मचारी नसतो; तो समाजाच्या भविष्यास आकार देणारा शिल्पकार असतो. एका पिढीच्या हातात पुस्तक देऊन दुसऱ्या पिढीचे भविष्य घडवणारा शिक्षक आज स्वतःच्या भविष्याबाबत असुरक्षित आहे, ही आपल्या शिक्षण व्यवस्थेची सर्वात वेदनादायक शोकांतिका आहे. स्वयं-अर्थसहाय्य आणि कॉन्व्हेंट शाळांमध्ये काम करणारे हजारो शिक्षक आज शिक्षण देतात, विद्यार्थ्यांचे जीवन घडवतात, शाळेची गुणवत्ता टिकवून ठेवतात; पण त्यांच्या स्वतःच्या आयुष्याला कोणतीही हमी नाही. सकाळी शाळेत जाताना मनात एकच भीती असते. "उद्या ही नोकरी राहील का?" कारण अनेक ठिकाणी स्पष्ट सेवा नियम नाहीत, कायदेशीर संरक्षण नाही, आणि शिक्षकांच्या हक्कांचे रक्षण करणारी प्रभावी व्यवस्था नाही. कित्येक शिक्षकांची अवस्था इतकी असुरक्षित आहे की, संस्थाचालकाने एका दिवसात सांगितले, "उद्यापासून शाळेत येऊ नका," तर त्या शिक्षकाकडे न्याय मागण्यासाठी ठोस मार्गच नसतो. वर्षानुवर्षे सेवा करूनही एका क्षणात अस्तित्व संपल्यासारखी भावना निर्माण होते. ज्याच्या हातात विद्यार्थ्यांचे भविष्य आहे, त्याच शिक्षकाचे स्वतःचे भविष्य अंधारात आहे. ही वेदना केवळ नोकरीपुरती मर्यादित नाही. अनेक शिक्षकांना आजही अधिकृत "स्कूल कोड" मिळालेला नाही. शासनाच्या कागदोपत्री त्यांचे अस्तित्वच अस्पष्ट आहे. शिक्षक म्हणून आयुष्य दिले, विद्यार्थ्यांना घडवले, पण शासनाच्या नोंदीत नावच नाही, यापेक्षा मोठा अपमान कोणता असू शकतो? ही फक्त प्रशासकीय चूक नाही; हा शिक्षकांच्या सन्मानावर झालेला आघात आहे. शिक्षक आजारी पडला तर? अपघात झाला तर? गंभीर आजाराने उपचाराची वेळ आली तर? या प्रश्नांची उत्तरे अनेक शिक्षकांकडे नाहीत. वैद्यकीय सुविधा नाहीत, आरोग्य विमा नाही, संस्थात्मक सुरक्षा नाही. काही शिक्षक स्वतःच्या मुलांच्या शिक्षणासाठी साठवलेली रक्कम उपचारांवर खर्च करतात, तर काहींना कर्ज काढावे लागते. अनेक कुटुंबे एका आजारामुळे आर्थिकदृष्ट्या कोसळतात. विद्यार्थ्यांना नैतिकता शिकवणारा शिक्षक स्वतःच्या संकटात मात्र एकटा उभा असतो. निवृत्तीनंतरची परिस्थिती तर आणखी वेदनादायक आहे. अनेक शिक्षक १५-२० वर्षे सेवा करतात, पण त्यांच्या भविष्याची कोणतीही हमी नसते. भविष्य निर्वाह निधीची ठोस व्यवस्था नाही, निवृत्ती वेतन नाही, सामाजिक सुरक्षा नाही. आयुष्यभर इतरांचे भविष्य उजळवणारा शिक्षक स्वतःच्या वृद्धापकाळाबाबत चिंतेत जगतो. हे वास्तव कोणत्याही संवेदनशील समाजाला अस्वस्थ करणारे आहे. दुसरीकडे संस्थाचालकांच्याही अडचणी वास्तव आहेत. शिक्षणाचा अधिकार (RTE) कायद्यांतर्गत २५% विद्यार्थ्यांची फी शासनाने वेळेवर द्यायची असते; पण अनेकदा चार-पाच वर्षे निधी मिळत नाही. शाळा चालवायची, शिक्षकांचे वेतन द्यायचे, इमारतींचे मेंटेनेस करायचे, डिजिटल सुविधा उभारायच्या हे सर्व आर्थिक पाठबळाशिवाय करणे किती कठीण आहे, हे बाहेरून दिसत नाही. आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांना स्मार्ट क्लासरूम, डिजिटल शिक्षण, प्रयोगशाळा, ई-लर्निंग सुविधा आवश्यक आहेत. पण अनेक संस्था केवळ अस्तित्व टिकवण्यासाठी संघर्ष करत आहेत. एका बाजूला शासनाचे नियम, दुसऱ्या बाजूला निधीअभावी निर्माण झालेल्या समस्या आणि तिसऱ्या बाजूला शिक्षकांची असुरक्षितता या तिहेरी संकटात शिक्षणव्यवस्था अडकली आहे. परंतु या संपूर्ण व्यवस्थेत सर्वात मोठा प्रश्न असा आहे की शिक्षकांच्या वेदनांना खरंच आवाज कोणी दिला? अनेक वेळा शिक्षकांचा प्रश्न केवळ निवडणुकांपुरता वापरला गेला. निवडणुकीच्या काळात आश्वासने दिली गेली, तात्पुरती मदत देण्यात आली, सहानुभूती व्यक्त करण्यात आली; पण शिक्षकांच्या मूलभूत प्रश्नांवर कायमस्वरूपी कायदे निर्माण करण्यासाठी किती जणांनी संघर्ष केला? स्कूल कोड, सेवा संरक्षण, वैद्यकीय सुरक्षा, विमा योजना, नियमित वेतन, निवृत्ती सुरक्षा, शिक्षणाचा अधिकार (RTE)कायद्यांतर्गत निधी, संस्थांच्या आर्थिक अडचणी हे प्रश्न फक्त भाषणांमध्ये राहिले. शिक्षकांच्या डोळ्यातील अश्रू अनेकांनी पाहिले, पण त्या अश्रूंमागची वेदना सभागृहात किती जणांनी मांडली? म्हणूनच २०२६ ची शिक्षक मतदारसंघ निवडणूक ही केवळ राजकीय निवडणूक नाही. ही शिक्षकांच्या सन्मानाची लढाई आहे. ही सुरक्षिततेसाठीची लढाई आहे. ही त्या प्रत्येक शिक्षकाच्या अस्तित्वाची लढाई आहे, जो आजही असुरक्षिततेत काम करत आहे. शिक्षकांनी आता क्षणिक लाभ आणि कायमस्वरूपी सुरक्षितता यातील फरक ओळखण्याची वेळ आली आहे. तात्पुरत्या मदतीपेक्षा पुढील अनेक वर्षांच्या सुरक्षिततेचा विचार करणे आवश्यक आहे. शिक्षकांना सहानुभूती नको; त्यांना अधिकार हवेत. त्यांना आश्वासने नकोत; त्यांना कायदेशीर संरक्षण हवे आहे. सभागृहात असा प्रतिनिधी हवा जो शिक्षकांचा प्रश्न केवळ राजकारण म्हणून पाहणार नाही, तर तो शिक्षण व्यवस्थेच्या अस्तित्वाचा प्रश्न म्हणून मांडेल. ज्याला शिक्षकांची वेदना समजते, जो शिक्षण क्षेत्रातून आलेला आहे, ज्याने ही असुरक्षितता जवळून अनुभवली आहे, तोच शिक्षकांचा आवाज प्रामाणिकपणे मांडू शकतो. जर शिक्षकांमधूनच सक्षम प्रतिनिधित्व निर्माण झाले, तर स्कूल कोडची सक्ती, शिक्षकांसाठी सेवा नियमावली, मेडिकल सुरक्षा, विमा योजना, निवृत्ती संरक्षण, शिक्षणाचा अधिकार (RTE)कायद्यांतर्गत निधीची वेळेवर अंमलबजावणी आणि संस्थांना आर्थिक सहाय्य यांसारखे प्रश्न प्रभावीपणे सभागृहात मांडले जाऊ शकतात. आज शिक्षकांसमोर इतिहास घडवण्याची संधी आहे. स्वतःच्या सन्मानासाठी, सुरक्षिततेसाठी आणि शिक्षण व्यवस्थेच्या भविष्यासाठी सजगपणे निर्णय घेण्याची वेळ आली आहे. कारण प्रश्न फक्त एका निवडणुकीचा नाही; प्रश्न त्या शिक्षकाच्या आयुष्याचा आहे जो रोज विद्यार्थ्यांना भविष्याची स्वप्ने दाखवतो, पण स्वतः मात्र असुरक्षिततेच्या अंधारात जगतो. शिक्षक सुरक्षित असेल, तरच शिक्षण व्यवस्था मजबूत होईल. आणि शिक्षण व्यवस्था मजबूत असेल, तरच देशाचे भविष्य उज्ज्वल राहील.



**डॉ. प्रशांत विघे**
**सिनेट सदस्य**
**संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती**
**मो. 9326877749**

## अन्न आणि औषध पुरवठा आयुक्त, तुकाराम मुंढेंचा कारवाई चा धडाका.

**दैनिक युवक आधार,**

**ता.कर्जत / वैभव गायकवाड, :** अन्न व औषध पुरवठा ही अत्यंत महत्वाची अशी महाराष्ट्र सरकारची सेवा आहे. त्याद्वारेच सर्व खाद्य पदार्थ, औषधं आणि त्यांच्या योग्य पुरवठ्यावर नियंत्रण ठेवले जाते. महाराष्ट्र राज्याचे नवे अन्न व औषध पुरवठा आयुक्त म्हणून श्री. तुकाराम मुंढे यांनी काही दिवसांपूर्वीच आपला पदभार सांभाळाला. श्री. तुकाराम मुंढे हे २००५ च्या बॅच चे आय ए एस अधिकारी आहेत. त्यांच्या कामाचा जो पवित्रा आजवर आपल्या सर्वांना माहित आहे, त्याच पद्धतीत त्यांनी आपल्या नवीन कार्यालयात देखील आपली छाप उमटवली. सर्व कर्मचाऱ्यांना वेळेवर येण्याची सक्ती, कामात कोणताही निष्काळजीपणा नसावा, भ्रष्टाचार विरहित कर्मचारी, कामकाज आणि कार्यालय, पारदर्शक व्यवहार अश्या सक्त निर्देशांवर तुकाराम मुंढे यांचे कामकाज चालते.

आपला पदभार सांभाळताच दुसऱ्याच दिवसापासून त्यांनी धाडसत्र



सुरु केले. यामध्ये मुंबई, पुणे, नाशिक, कोकण, अमरावती या ठिकाणी अवैध आणि बेकायदेशीर चालू असलेल्या गोष्टी निदर्शनास आल्या. यामध्ये लाखो रुपयांचे भेसळयुक्त सामान हस्तगत करण्यात आले. या सर्व कारवायांमध्ये तब्बल २५ गुन्ह्यांची नोंद करण्यात आली असून, ३३ भेसळखोर आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. ५ गुटखा वाहतूक करणाऱ्या गाड्या व २७ आरोपी ह्या गुन्ह्यात सापडले आहेत. तसेच आपल्या रोजच्या जीवनशैलीमध्ये वापरले जाणारे दूध व दुग्धजन्य पदार्थांमध्ये देखील भेसळ करणारी टोळी जेरबंद करण्यात आली. ज्यामध्ये १९४ किलो बनावट क्रीम, ६४ किलो बनावट पनीर, शेकडो लिटर बनावटीचे तूप व २१५ किलो भेसळयुक्त मावा जप्त करण्यात आला आहे.

तुकाराम मुंढेंच्या या कारवाईमुळे भेसळखोरांमध्ये आता कधी आणि कुठे धाड पडेल, असे जबर भीतीचे वातावरण पसरले आहे. तुकाराम मुंढेंच्या अशा धडक कारवाई मुळे माफिया गॅंग आणि त्यांना पोसणारे स्थानिक राजकीय नेते यांना ते नेहमी खुपतात, त्यामुळे मुंढेंची दर दीड-दोन वर्षात सारखी बदली होत असते, पण जिथे जिथे तुकाराम मुंढे यांची बदली होते तिथे अवैध कामे करणाऱ्यांची गय केली जात नाही. पुनः या धडाकेबाज आयुक्तांचे सर्व नागरिकांकडून कौतुक केले जात आहे. जोपर्यंत तुकाराम मुंढे सारखे आयुक्त आपल्या राज्यसेवेमध्ये काम करत आहेत तोपर्यंत सामान्य जनता नक्कीच निश्चिंत राहू शकते.

## शासनास मुरुड नगर परिषदेचा प्रस्ताव पाठविण्यासंदर्भात जिल्हा प्रशासनाची चालढकल

**दैनिक युवक आधार**

**लातूर ग्रामीण मोहम्मद पिंजारी**

मुरुड ग्रामपंचायतीचे रूपांतर नगरपंचायत किंवा नगर परिषदेत करण्यासाठी शासनाच्या नगर विकास विभागाने आमदार रमेश कराड यांच्या पत्राला अनुसरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार कक्ष अधिकारी विशाल कांबळे नगर विकास विभाग यांनी दिनांक 22/01/2026 रोजी तसेच दिनांक 8/04/2026 रोजी नगरपंचायत किंवा नगरपरिषद गठीत करण्यासाठी जिल्हाधिकारी लातूर यांना पत्र पाठवून परिपूर्ण प्रस्ताव आणि स्वयंस्पष्ट अभिप्राय मागितला होता आजतगायत परिपूर्ण प्रस्ताव व स्वयं स्पष्ट अभिप्राय जिल्हा प्रशासनाने महाराष्ट्र शासनाला सादर न केल्यामुळे मुरुड नगरपरिषद संघर्ष कृती समितीचे अध्यक्ष जयदीप सुरवसे, सचिव शब्बीर सय्यद यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन तत्काळ महाराष्ट्र शासनास मुरुड नगरपरिषदेचा प्रस्ताव स्वयंस्पष्ट अभिप्राय शासनास सादर करण्याची विनंती केली आहे.दिलेल्या निवेदनात विस्तृत असे म्हटले आहे की, जिल्हाधिकारी भारत बास्टेवाड यांनी दीड महिन्यापूर्वी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेऊन उपस्थित नगररचनाकार अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, मंडळ अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक, कृषी अधिकारी यांना एक आठवड्याच्या आत मुरुड येथील अकृषिक रोजगाराची टक्केवारी काढून परिपूर्ण प्रस्ताव दाखल करण्याचे आदेश दिले होते या बैठकीत मुरुडचे उपसरपंच वैभव सापसोड, मुरुड नगर परिषद संघर्ष कृती समितीचे अध्यक्ष जयदीप सुरवसे उपस्थित होते. तसेच जिल्हाधिकारी यांनी दिनांक 22/4/2026 रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद लातूर, उपविभागीय अधिकारी लातूर, तहसीलदार लातूर, गटविकास अधिकारी पंचायत समिती लातूर, सहाय्यक संचालक नगर रचना शाखा लातूर आदिना पत्र पाठवून मौजे मुरुड, ता.जि. लातूर ही ग्रामपंचायत नगरपरिषद म्हणून स्थापन करण्याबाबत सन २०११ च्या जनगणना नुसार मौजे मुरुडची लोकसंख्या, सध्यस्थितीत अंदाजीत लोकसंख्या, अकृषक रोजगाराची टक्केवारी, येथे सध्यस्थितीतले कार्यरत शासकीय/निमशासकीय कार्यालये, ग्रामपंचायतीची माहिती, दळणवळण व्यवस्था, विविध व्यवसायाची माहिती, राष्ट्रीकृत / खाजगी बँका व तेथील असलेल्या सोईसुविधा याबाबतची सर्व अद्यावत आकडेची आवश्यकता आहे. तसेच अ.क्र. मुद्दे १. मुरूड ग्रामपंचायतीची स्थापना २. प्रस्तावित क्षेत्राची २००१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ३. प्रस्तावित क्षेत्राची २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ४. प्रस्तावित क्षेत्राची अकृषक रोजगाराची टक्केवारी (एकत्रित व गावनिहाय) (प्रमाणित) ५. मुरूड ग्रामपंचातीचे नगर पंचायतीमध्ये रुपांतरीत करण्याबाबत ग्रामपंचायतीचा ठराव ६. प्रस्तावित भागत औद्योगिक क्षेत्र आहे काय? ७. विद्यमान ग्रामपंचायतीचा कालावधी कधी संपुष्टात येत आहे ? पुढील निवडणुकीचा दिनांक ८. प्रस्तावित नगर पंचायत करण्यासाठी निर्गमित करावयाच्या उद्घोषणेचे अनुसूची अ व अनुसूची ब चे प्रारुप (गट/ सर्व्हे क्रमांक व चतू सिमा दर्शविणारी सुची) अभिप्राय ९. प्रस्तावित नगर पंचायतीच्या अनुषंगाने हद्दीची चतुः सिमा रंगाने दर्शविणारा नकाशा १०. महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ३ च्या तरतुदीव्यतिरिक्त नगर पंचायत स्थापनेबाबत अन्य अनुषंगीक बाबी ११. प्रस्तावित नगर पंचायतीमध्ये समाविष्ट गावाचे गावनिहाय क्षेत्रफळ, लोकसंख्या व लोकसंख्येची घनता (प्रती चौ.कि.मी.) दर्शविणारा तक्ता १२. नगर पंचायातीमध्ये समाविष्ट गावांची सन २००१ ते सन २०११ मध्य लोकसंख्या वाढीची टक्केवारी १३. समाविष्ट गावांचे मागील तीन आर्थिक वर्षाचे एकूण उत्पन्न १४. समाविष्ट गावांचे सरासरी वार्षिक दरडोई उत्पन्न (सन २०११ च्या लोकसंख्येनुसार) १५ संचालक, नगर रचना पुणे यांचे स्वयंस्पष्ट अभिप्राय री प्रकरणी शासनाकडून वारंवार विचार होत.

## मेरा युवा भारत (MY Bharat) हिंगोलीच्या वतीने स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**कळमनुरी तालुका प्रतिनिधी**

'मेरा युवा भारत' (MY Bharat) हिंगोलीच्या वतीने प्रखर राष्ट्रभक्त, थोर स्वातंत्र्यसेनानी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची जयंती कळमनुरी येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात जिल्ह्यातील असंख्य युवकांनी एकत्र येत सावरकरांच्या विचारांना उजाळा दिला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर उपस्थितांनी सावरकरांच्या देशसेवेचे आणि क्रांतीकार्यातील अतुलनीय योगदानाचे स्मरण केले.

देशभक्ती आणि राष्ट्रउभारणीचा संदेश

या प्रसंगी बोलताना वक्त्यांनी सावरकरांचे विचार, त्यांचे प्रखर राष्ट्रप्रेम, अंदमान येथील त्यांचा खडतर कारावास आणि त्यांचे




समाजसुधारणच काय यावर प्रकाश टाकला.

युवकांना आवाहन: आजच्या तरुण पिढीने सावरकरांच्या विचारांतून प्रेरणा घेऊन राष्ट्रउभारणीत आणि समाजसेवेत स्वतःला झोकून दिले पाहिजे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

तरुणांचा निर्धार: देशहितासाठी सदैव तत्पर राहण्याची आणि सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग नोंदवण्याची शपथ यावेळी उपस्थित युवकांनी घेतली.

'मेरा युवा भारत' उपक्रमाचा उद्देश

'मेरा युवा भारत' (MY Bharat) हा केंद्र सरकारचा एक महत्त्वाचा उपक्रम असून, याद्वारे युवकांमध्ये नेतृत्वगुण विकसित करणे आणि त्यांना राष्ट्रउभारणीच्या कार्यात जोडणे हे मुख्य उद्दिष्ट आहे. याच अंतर्गत हिंगोलीत तरुणांना प्रेरित करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला हिंगोली जिल्ह्यातील विविध क्षेत्रांतील तरुण, सामाजिक कार्यकर्ते आणि 'मेरा युवा भारत'चे समन्वयक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मेरा युवा भारत हिंगोली चे जिल्हा युवा अधिकारी प्रणित सांगवीकर व अनिल ढेंगे सर तसेच समन्वयक विजय खुडे यांनी सहकार्य केले

# व्हॉट्सअपवरच ‘वृत्तपत्र’ चालवणाऱ्यांवर कारवाईची मागणी

दैनिक युवक आधार नागपूर
सतीश कडू संपादक विभाग

हदगाव/नांदेड केदार दायमा : सध्या काही जणांकडून कोणतीही अधिकृत नोंदणी, परवानगी किंवा मुद्रित आवृत्ती (हार्ड कॉपी) न काढता केवळ व्हॉट्सअॅपवर पीडीएफ स्वरूपात “वृत्तपत्र” प्रसारित करण्याचा प्रकार वाढताना दिसत आहे. या प्रकारामुळे खरी पत्रकारिता, नियमबद्ध प्रकाशन व्यवस्था आणि वाचकांचा विश्वास धोक्यात येत असल्याची चिंता व्यक्त होत असून, अशा “मटका पद्धतीने” चालणाऱ्या अनधिकृत माध्यमांवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी नागरिक आणि जबाबदार पत्रकारांकडून होत आहे.

मुद्रित माध्यम चालवण्यासाठी शासनाने ठरवलेल्या काही स्पष्ट अटी आहेत. त्यामध्ये नोंदणी, संपादक व प्रकाशकांची माहिती, छपाईची व्यवस्था, प्रकाशनाचा पत्ता, तसेच जबाबदारी निश्चित करणारी कागदपत्रे आवश्यक असतात. मात्र काही जण या सर्व नियमांना बगल देत, कुठल्याही जबाबदारीशिवाय व्हॉट्सॲप ग्रुपवर पीडीएफ तयार करून तेच “दैनिक” किंवा “साप्ताहिक” म्हणून प्रसारित करीत आहेत. या प्रकारामुळे पत्रकारितेच्या नावाखाली दिशाभूल, अफवा आणि अप्रमाणित माहिती पसरवण्याचा धोका वाढला आहे.

स्थानिक पातळीवर पाहता, काही “व्हॉट्सॲप वृत्तपत्रे” जाहिराती देखील स्वीकारत असल्याचे समोर येत आहे. कोणतीही अधिकृत नोंदणी नसताना जाहिराती घेणे हा नियमभंग असून, यामुळे प्रामाणिकपणे नोंदणीकृत वृत्तपत्र चालवणाऱ्यांवर अन्याय होत आहे. नियमित खर्च करून छपाई करणाऱ्या आणि शासनाच्या नियमांचे पालन करणाऱ्या प्रकाशनांना अशा अनधिकृत स्पर्धेमुळे आर्थिक फटका बसत आहे.

याबाबत ज्येष्ठ पत्रकारांचे मत असे आहे की, डिजिटल माध्यमे नक्कीच काळाची गरज आहेत; परंतु त्यासाठीही कायदेशीर चौकट आणि उत्तरदायित्व आवश्यक आहे. केवळ व्हॉट्सॲपवर पीडीएफ टाकणे म्हणजे वृत्तपत्र नाही. वाचकांपर्यंत विश्वासार्ह आणि पडताळलेली माहिती पोहोचवणे हीच खरी पत्रकारिता आहे. नियमांचे पालन न करणाऱ्यांवर कारवाई झाली नाही, तर भविष्यात कोणतीही व्यक्ती स्वतःला “संपादक” म्हणत समाजात गोंधळ निर्माण करू शकते.

नागरिकांनीही अशा अनधिकृत “वृत्तपत्रांपासून” सावध राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे. कोणतीही माहिती शेअर करण्यापूर्वी तिची खातरजमा करणे गरजेचे आहे. तसेच प्रशासनानेही याची दखल घेत, संबंधित विभागामार्फत तपास करून दोषींवर कडक कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

एकूणच, पत्रकारितेची शुचिता आणि विश्वासार्हता टिकवण्यासाठी नियमबद्ध माध्यमांना प्रोत्साहन देणे आणि व्हॉट्सॲपवरच “वृत्तपत्र” चालवणाऱ्या अनधिकृत प्रवृत्तीवर आळा घालणे ही काळाची गरज असल्याचे स्पष्ट होत आहे.

# देशभरातील १० लाखाहून अधिक रुग्णांना जेनेरिक औषधाचा लाभ

## सामान्य ग्राहकांच्या रोजच्या औषध खर्चात १२८ कोटींची बचत

दैनिक युवक आधार
मुंबई / रमेश औताडे

परवडणाऱ्या ब्रँडेड-जेनेरिक औषधे उपलब्ध करून देणाऱ्या भारतातील सर्वात विश्वासार्ह प्लॅटफॉर्म असलेल्या प्लॅटिनम आर एक्स ने मोठा टप्पा गाठला असून देशभरातील १० लाखांहून अधिक रुग्णांनी लाभ घेतला आहे. दर्जेदार जेनेरिक पर्याय उपलब्ध करून देत कंपनीने ग्राहकांच्या औषध खर्चात एकूण १२८ कोटी रुपयांपेक्षा जास्त बचत केली आहे.




मधुमेह, उच्च रक्तदाब आणि हृदयविकारासारख्या आजारांमुळे लाखो भारतीयांना दरमहा दोन हजार ते पाच हजार रुपयांपर्यंत औषधांवर खर्च करावा लागतो. या वाढत्या खर्चामुळे ७० कोटींहून अधिक लोक औषधांचे डोस चुकवतात, औषधे पुन्हा घेण्यास उशीर करतात किंवा उपचार अर्धवट सोडतात. ही परिस्थिती बदलण्यासाठी प्लॅटिनम आर एक्स ची सुरुवात करण्यात आली.

आशुतोष पांडे प्लॅटिनमआरएक्स चे सह-संस्थापक आशुतोष पांडे म्हणाले, “भारतीय रुग्णांचे १२८ कोटी रुपये वाचणे हे आमच्यासाठी केवळ आकडेवारी नाही, हे ते पैसे आहेत जे आता कुटुंबांच्या दैनंदिन गरजांसाठी, मुलांच्या शिक्षणासाठी आणि घरखर्चासाठी वापरले जात आहेत. भारतात परवडणारी औषधे उपलब्ध असली तरी लोकांमध्ये विश्वास आणि योग्य माहितीची कमतरता आहे.

या विचारातून त्यांनी कंपनी सुरू केली. रुग्णांमध्ये ब्रँडेड जेनेरिक औषधांचा वापर २०२४ मध्ये २२ टक्के होता, तो २०२५ मध्ये जवळपास दुपटीने वाढून ४० टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. २०२६ अखेरीस हा आकडा ७० टक्क्यांहून जास्त होण्याची अपेक्षा आहे. या आकडेवारीवरून रुग्णांचा ब्रँडेड जेनेरिक औषधांवरील विश्वास हळूहळू वाढत असल्याचे दिसून येत आहे. दीर्घकालीन आजार असलेले रुग्ण दरमहा औषधांच्या खर्चात सरासरी १५०० रुपयांची बचत करत आहेत.

# रामशेठ ठाकूर यांचा अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त शेलघर येथे कृतज्ञता सोहळा दणक्यात साजरा

## महेंद्रशेठ खऱ्या अर्थाने माझा वारसा चालवतोय : रामशेठ ठाकूर

## रामशेठ यांनी हाताला बोट धरून मला राजकारणात आणले : महेंद्रशेठ घरत

दैनिक युवक आधार
उलवे, वार्ताहर

: माजी खासदार रामशेठ ठाकूर यांचा अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त शेलघर येथे शुक्रवारी (ता. २९) 'कृतज्ञता सोहळा' एम. जी. ग्रुपतर्फे दणक्यात साजरा करण्यात आला. रामशेठ हे सुप्रसिद्ध उद्योजक असल्याने त्यांचा भव्य सत्कार बांधकाम व्यावसायातील डेल्टा ग्रुपचे मॅनेजिंग डायरेक्टर नितीन गाजीपारा, टुडे ग्रुपचे मॅनेजिंग डायरेक्टर ब्रदेशभाई शहा, सोनाली रिॲलिटीचे मॅनेजिंग डायरेक्टर मयुरेश चौधरी यांच्या हस्ते एम. जी. ग्रुपचे प्रमुख महेंद्रशेठ घरत यांनी करून दाखवला. यावेळी रामशेठ ठाकूर यांना गुरू समजून आयुष्याची वाटचाल करणारे महेंद्रशेठ घरत यांनी गुरुदक्षिणा म्हणून रोलॅक्सचे अनोखे घड्याळ भेट दिले आणि गुरु-शिष्याचे नाते अनोखे असते हे दाखवून दिले.

सत्काराला उत्तर देताना माजी खासदार रामशेठ ठाकूर म्हणाले, "महेंद्रशेठ यांनी दातृत्वाचा वसा माझ्याकडून घेतला आहे; परंतु तो एक पाऊल पुढे जाऊन माझ्यापेक्षा वेगळे समाजोपयोगी काम करतोय. घरे, बंगले, गाड्या आपल्या सहकाऱ्यांना देऊन त्यांचेही आयुष्य उजळत आहे. जे मलाही जमले नाही. 'सुखकर्ता' बंगल्यावरून दिनदुबळयांची, गरजवंतांची तो ज्या पद्धतीने सेवा करतोय, याचा मला रास्त अभिमान आहे. त्याने आज कामगार क्षेत्रात जागतिक पातळीवर आदरयुक्त दबदबा निर्माण केला आहे. बैठका व पर्यटनाच्या माध्यमातून त्याने संपूर्ण जग पालथे घातले आहे. हे कौतुकास्पद आहे. त्यामुळे राजकारणात आमचे प्रवाह वेगळे आहेत, पण नातेसंबंधांत ते कधीही आडवे येणार नाहीत, याची काळजी आम्ही दोघांनीही घेतली आहे."

यावेळी आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत रामशेठ ठाकूर यांच्या जुन्या आठवणींत रमले होते. ते म्हणाले, "रामशेठ ठाकूर हे शेलघरचे जावई आहेत. दिवंगत ज. आ. भगत साहेबांची कन्या शकुंतलाताई त्यांच्या सहचारिणी आहेत. त्यामुळे शेलघर गावावर त्यांचे विशेष प्रेम आहे. भगत साहेबांच्या ओसरीत असलेला रामशेठ ठाकूर साहेबांचा फोटो पाहत मी मोठा झालो. पुढे ते शिक्षक झाले, तेव्हा ते वाशीला राहत होते. त्यावेळी मी त्यांच्या घरी बीएमटीसीने जायचो. प्रशांत आणि परेशही तेव्हा लहान होते. त्यामुळे छान गप्पागोष्टी रंगायच्या. रामशेठ यांनी एकदा आम्हाला चेंबूरला चित्रपट पाहायलाही नेले होते, अशी आठवणही महेंद्रशेठ यांनी यावेळी सांगितली. गेल्या ५० वर्षांपासून त्यांना मी पाहत आलोय. त्यांनी मला अक्षरशः हाताला बोट धरून राजकारणात आणले. माझ्या आजच्या वाटचालीत त्यांचा खूप मोठा वाटा आहे. त्यामुळे त्यांचे ऋण माझ्यावर आहेत. ते सर्वच बाबतीत मोठे आहेत, पण आजही माझे ऐकतात. त्यामुळे राजकीय वादळे कितीही आली तरी आमचे कौटुंबिक संबंध कायमच मधुर राहतील," असा विश्वासही महेंद्रशेठ घरत यांनी बोलून दाखवला. सध्या मी कामगारांच्या हक्कांच्या लढाईसाठी पूर्वनियोजित बैठकांसाठी जिनिव्हाच्या दौऱ्यावर जात आहे. त्यामुळे २ जून या रामशेठ ठाकूर साहेबांच्या वाढदिवशी मी प्रत्यक्ष भारतात नाही. त्यामुळे त्यांचा कृतज्ञता सोहळा आयोजित केला आहे.




यावेळी आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांच्या वाढदिवसानिमित्त काढण्यात आलेल्या 'सुखकर्ता' विशेषांकाचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. महेंद्रशेठ घरत जिनिव्हा दौऱ्यावर जाण्यापूर्वी त्यांनी आपल्या तीन सहकाऱ्यांना फोर व्हीलर भेट दिल्या. त्यांच्या चाव्या रामशेठ ठाकूर, उद्योजक मयुरेश चौधरी यांच्या हस्ते दिल्या आणि आपल्या सहकाऱ्यांच्या चेहऱ्यावर महेंद्रशेठ घरत यांनी हास्य फुलविले. नाना गडकरी यांनी आपल्या सुमधुर आवाजाने रसिकांचे मनोरंजन केले. यावेळी जिल्हा परिषद सदस्य ॲड. अविनाश ठाकूर, मो. का. मढवी गुरुजी आणि घरत परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# बाल संस्कार आणि व्यक्तिमत्व विकास, चिचोली , फेटरी, नागपूर येथे निवासी शिबिर

दैनिक युवक आधार
*डॉ सुनिल भगत* प्रतिनिधि

संत गाडगेबाबा बहुद्देशीय आश्रम जरूड ता.वरूड जिल्हा अमरावती आणि बुद्ध विहार समन्वय समिती,नागपूर तसेच

शांती वन चिंचोली फेटरी नागपूर यांचे सहकार्याने आयोजित बाल संस्कार आणि व्यक्तिमत्व विकास निवासी आठ दिवसीय शिबिर आयोजित करण्यात आले होते. अशोक सरस्वती संचालित आणि सामाजिक कार्यकर्ता ह्यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती नागपूर यांनी या कार्यक्रमाला हजेरी लावली होती. दिनांक २८ मे रोजी सकाळी दहा वाजता या चमूने उपस्थित निवासी अंदाजे १०० मुले आणि मुली यांना मार्गदर्शन केले. यावेळी देवयानी भगत, राज्य महिला कार्यवाह यांनी चमत्काराचे सादरीकरण करून विद्यार्थ्यांना बूवाबाबा कसे फसवणूक करत असतात यावर भाष्य केले.= डॉ सुनिल भगत, कार्याध्यक्ष, जिल्हा नागपूर यांनी विविध शगुन अपशकुन कसे जीवनामध्ये बाळगले जातात जे पुष्कळदा जीवनात अंधश्रद्धा म्हणून नुकसान करतात.

प्रीती नगरारे यांनी सिकल सेल अनिमिया या विषयावर आधारित विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. रामभाऊ डोंगरे राज्य कार्यकारिणी सदस्य यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन यावर मार्गदर्शन केले. संध्या राजूरकर, अध्यक्ष नागपूर जिल्हा शाखा यांनी आजचे विद्यार्थी आणि पालक यावर चर्चा केली. सुवर्णा डोंगरे यांनी पालकाची जबाबदारी यावर आपले मत व्यक्त केले. ह्यानिमित्त अशोक सरस्वती ह्यांनी ह्या सत्राची सूत्रे सांभाळली. ह्यानिमित्त डॉ चिंचखेडे , मंडपे ताई कल्पना गायमुखे ,दिवे ताई आणि इतर अनेक कार्यकर्ते यांनी व्यवस्था सांभाळली.





# त्या महिलेची हत्या नव्हे तर आत्महत्या

दैनिक युवक आधार
नवीन पनवेल वार्ताहर

पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत बंबावीपाडा जवळील रस्त्यावर पोलिसांना 3 मे रोजी एका महिलेचा मृतदेह ब्लॅंकेटमध्ये गुंडाळलेल्या अवस्थेत सापडून आला होता. त्यानंतर पोलिसांनी अनोळखी इसमाविरोधात हत्येचा गुन्हा दाखल केला. मात्र त्या महिलेची हत्या नव्हे तर तिने आत्महत्या केल्याचे पोलीस तपासात उघड झाले आहे. त्यामुळे आता या महिलेने आत्महत्या का केली आणि या महिलेचा मृतदेह रस्त्यालगत कोणी आणून टाकला याचा शोध पोलीस घेत आहेत.

आत्महत्या केलेल्या महिलेचे नाव रुक्सार मंजूर शेख (35 वर्ष) असून ती शिवाजीनगर, गोवंडी येथे राहत होती. तीन मे रोजी पोलिसांना तिचा मृतदेह बंबावीपाडा बस स्टॉपच्या अलीकडे रेल्वे सबवेच्या बाजूला रस्त्याच्या कडेला ब्लॅंकेटमध्ये गुंडाळलेल्या अवस्थेत सापडून आला. त्यानुसार पोलिसांच्या पथकाने पुढील तपास सुरू केला आणि आरोपी विरोधात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तीन पथके तयार केली. तिची ओळख पटवण्यात आली आणि तिच्या कुटुंबीयांकडून तिची माहिती घेण्यात आली. शहर पोलिसांनी मुंबई, सीएसटी, गोवंडी परिसर, मुंबई ते पनवेल रेल्वे स्टेशन परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, रेल्वे बोगीतले फुटेज, वाशी टोल नाका, जुना उरण रोड येथील सीसीटीव्ही चेक केले. यावेळी एप्रिल महिन्यात एका सीसीटीव्ही फुटेजमध्ये ती दिसून आली. त्यानंतर कुठेही दिसली नाही. याच दरम्यान या मृत महिलेच्या मृतदेहाचा शवविच्छेदन अहवाल पोलिसांना प्राप्त झाला. मात्र या शवविच्छेदन अहवालात तिची हत्या झाली नसून तिने आत्महत्या केली असल्याचे अहवालातून स्पष्ट झाले. मात्र या महिलेने आत्महत्या का केली हे गुलदस्त्यात आहे. पनवेल पोलिसांची तपास चक्रे सुरू असली तरी देखील ही महिला पनवेलमध्ये कशासाठी आली आणि तिने आत्महत्या केल्यानंतर तिला ब्लॅंकेटमध्ये गुंडाळून बंबाबीपाडा जवळ कोणी टाकले हे देखील अद्याप उघड झाले नाही. या संपूर्ण प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक शाकीर मुसा पटेल करत आहेत.

प्रेम प्रकरणातून या महिलेने आत्महत्या केली असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे आणि त्यानंतर काही व्यक्तींनी तिचा मृतदेह रिक्षा किंवा इतर वाहनातून रस्त्यालगत टाकला असावा असे बोलले जात आहे. हा प्रकार करणारे जेव्हा समोर येतील तेव्हाच हे संपूर्ण प्रकरण उघडकिस येईल.

# वझर येथे राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमीत्त विविध उपक्रपाचे आयोजन.

दैनिक युवक आधार
तालूका प्रतिनिधी महादेव उप्पे

देगलूर(दि.०१) देगलूर तालुक्यातील मौजे वझर येथे प्रति वर्षीप्रमाणे राजमाता,राष्ट्रमाता, अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त विविध उपक्रमाने जयंती साजरी केली जाते.त्याचेच औचित साधून यावेळी वझर येथे अहिल्यादेवी होळकर यांच्या उत्सव समितीच्या वतीने सर्व रोगनिदान शिबिर व तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व बहुजनांचे व धनगर समाजाचे नेते दीपक बोराडे यांच्या मार्गदर्शनाचा कार्यक्रम अशा विविध उपक्रमाने जयंती साजरी होणार असून वझर येथील जयंती मंडळाच्या वतीने यंदाची जयंती डीजे व बँड बाजामुक्त होणार आहे.

तरी या जयंतीनिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रम, समाज प्रबोधनाचे कार्यक्रम आणि सर्व रोगनिदान शिबिर आदी उपक्रम राबविण्यात येत असून यावेळी तज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन लाभणार असून यावेळी डॉ.राम मदने(एम.डी. मेडिसिन),डॉ. राम श्रीरामे (बालरोगतज्ञ),डॉ.दिलीप मदने (हाड व स्नायू तज्ञ) डॉ.सचिन मंतावर (नेत्र तज्ञ),डॉ.प्रियंका मंतावर (कान नाक घसा तज्ञ),डॉ.नितीन मदने(स्त्री रोग तज्ञ),डॉ.रवी सुरनर(दमा व छाती विकार तज्ञ),आदीजण उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून देगलूर येथील उपविभागीय अधिकारी अनुप पाटील,देगलूरचे तहसीलदार भरत सूर्यवंशी यांची उपस्थिती लाभणार आहे.

तरी या कार्यक्रमाचा जास्तीत जास्त जनतेने लाभ घ्यावा असे कार्यक्रम जयंती मंडळाच्या वतीने व तसेच शांताराम पाटील पळणीटकर,शरद पाटील वाघमोडे,धनाजी लवटे,तेजराव लवटे,नरसिंग चोरमले सर यांनी आव्हान केले आहे.

# समता सैनिक दल आयोजित "सृजन शिल्प" तीस दिवसीय बाल संस्कार शिबिर

डॉ सुनिल भगत प्रतिनिधी
दैनिक युवक आधार नागपूर

समता सैनिक दल, आणि बौध्यजन विकास मंडळ कुकडे लेआउट, नागपूर यांनी १ मे- ३१ मे २०२६ , तीस दिवसीय "सृजन शिल्प" बाल संस्कार शिबीर घेण्यात आले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी संगीत, चित्रकला, कराटे, लाठी प्रशिक्षण आणि इतर अनेक उपक्रम या निमित्ताने राबविण्यात आले आहेत.

स्मृतिशेष एड. विमलकीर्ती चिमणकर संस्थापीत ह्या समता सैनिक दल, एकक, कुकडे लेआउट, नागपूर हे शिबिर आयोजित केले होते. ह्यानिमित महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती जिल्हा नागपूर यांच्या वतीने ह्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. निांक २९ मे २०२६ रोजी सकाळी आठ वाजता ह्या कार्यक्रमाची सुरुवात झाली. डॉ सुनिल भगत,कार्याध्यक्ष जिल्हा नागपूर यांनी विविध शगुन आणि अपशकुन कसे जीवनात अंधश्रद्धा पसरवतात ह्यावर विविध उदाहरणाद्वारे मार्गदर्शन केले. वैज्ञानिक दृष्टीकोन या विषयावर रामभाऊ डोंगरे, राज्य समन्वयक यांनी मार्गदर्शन केले. देवानंद बडगे, राज्य सांस्कृतिक सह कार्यवाह, दक्षिण शाखा पदाधिकारी मंगला गाणार, सुषमा शेवडे, इंदू उमरे यांनी चळवळीची गीते आणि विविध चमत्काराचे सादरीकरण केले.

ह्याप्रसंगी अंदाजे १०० विद्यार्थी ह्या शिबिरामध्ये सहभागी झाले आहेत.

समता सैनिक दल नागपूर जिल्हा संघटिका मार्शल अस्मिता लोखंडे, मार्शल वासनिक सर, मार्शल वंदना बुचूंडे, मार्शल विभा साव, मार्शल दर्शना मोडक, मार्शल वंदना कांबळे आणि इतर मान्यवर यांनी ह्या शिबिरासाठी विशेष परिश्रम घेतले आहेत.






# देहरंग धरणातील गाळ उपसा आणि वाहतुकीमुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

दैनिक युवक आधार
पनवेल (वार्ताहर)

: देहरंग धरणातून मोठ्या प्रमाणात गाळ काढण्याचे काम सध्या सुरू असून, दिवसभर जेसीबी, डंपर आणि इतर अवजड वाहने सतत सुरू असल्याचे चित्र दिसत आहे. काही वाहनांची वाहतूक रात्रीच्या वेळेसही सुरू असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

धरणातून काढण्यात आलेला गाळ अनेक वीटभट्टी मालकांनी विविध ठिकाणी साठवून ठेवल्याचे दिसून येत आहे. मात्र, या गाळ उपसा आणि साठवणुकीसाठी संबंधित मालकांनी



तहसील कार्यालयातून किती प्रमाणात अधिकृत परवानग्या घेतल्या आहेत, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.काहींनी कोणतीही परवानगी नसताना बिनधास्तपणे गाळ वाहतूक सुरू असल्याची चर्चा स्थानिकांमध्ये आहे. याशिवाय, डंपरमधून रस्त्यावर मोठ्या प्रमाणात गाळ सांडत असल्याने नागरिकांच्या सुरक्षेचाही प्रश्न निर्माण झाला आहे. विशेषतः वळणाच्या रस्त्यांवर गाळ पडल्यामुळे मोटरसायकलस्वार आणि इतर वाहनचालकांच्या अपघाताचा धोका वाढला आहे. स्थानिक नागरिकांनी प्रशासनाने तात्काळ लक्ष देऊन संबंधितांची चौकशी करावी, अशी मागणी केली आहे. देहरंग परिसरातील नागरिकांचा प्रश्न असा आहे की? गाळ काढण्यासाठी नेमक्या किती जणांना परवानगी देण्यात आली आहे?, संबंधित वीटभट्टी मालकांकडे वैध परवाने आहेत का?, रात्री सुरू असलेल्या वाहतुकीवर नियंत्रण कोण ठेवणार?, रस्त्यावर पडणारा गाळ साफ करण्याची जबाबदारी कोणाची? स्थानिक प्रशासन आणि तहसील कार्यालयाने याबाबत स्पष्ट भूमिका घेऊन नागरिकांच्या सुरक्षेसाठी योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# खोपोली नगर परिषदेत ऑक्ट्रॉय इन्स्पेक्टर शिवाजी माळी यांनी संघर्षातून घडलेला कर्तृत्ववान प्रवास...

दैनिक युवक आधार
खालापूर - संतोष शेवाळे

खोपोली नगर परिषदेत ऑक्ट्रॉय इन्स्पेक्टर म्हणून सुरू झालेला त्यांचा प्रवास सिटीबस मॅनेजर, टॅक्स सुपरिटेंडंट, ऑफिस सुपरिटेंडंट अशा विविध जबाबदाऱ्यांमधून अधिक समृद्ध होत गेला. प्रत्येक पदावर काम करताना त्यांनी प्रामाणिक प्रशासन, कुशल नेतृत्व आणि लोकांशी जपलेला आत्मीयतेचा धागा कधीही तुटू दिला नाही.

नोकरीच्या धकाधकीतही कुटुंबाला आधार देणे, प्रत्येक संकटात खंबीरपणे उभे राहणे आणि घरातील प्रत्येकाच्या आयुष्यात विश्वासाचा मजबूत स्तंभ बनणे — हीच त्यांची खरी ओळख ठरली.

निवृत्तीनंतरही थांबणे त्यांच्या स्वभावात नव्हते. जन्मगाव वडगांव (जयराम स्वामी) येथे शेती व्यवसायात सक्रिय सहभागी होत त्यांनी मातीतून नव्या उर्जेचा शोध घेतला. मेहनत, नियोजन आणि जिद्दीच्या जोरावर त्यांनी शेतीलाही नवसंजीवनी दिली.

वाचनाची प्रचंड आवड, शिस्तप्रिय स्वभाव, संयमी विचार आणि नेतृत्वगुण यामुळे ते आमच्यासाठी नेहमीच प्रेरणास्थान राहिले आहेत. ईश्वरचरणी प्रार्थना — त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि आनंदी आयुष्य लाभो... वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा!

- (जेष्ठ पत्रकार दिनकर भुजबळ खोपोली )



# माहूर तहसील कार्यालयात इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग स्टेशनची सुविधा उपलब्ध

दैनिक युवक आधार:
श्रीक्षेत्र माहूर:प्रतिनिधी/सय्यद इसा

नांदेड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या दूरदर्शी संकल्पनेतून जिल्ह्यातील सर्व तहसील कार्यालयांमध्ये इलेक्ट्रिक वाहन इ व्ही चार्जिंग स्टेशन उभारण्याचा उपक्रम राबविण्यात येत असून, त्याअंतर्गत माहूर तहसील कार्यालय येथेही इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग स्टेशनची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे.

या सुविधेमुळे शासकीय अधिकारी व कर्मचारी यांना त्यांच्या इलेक्ट्रिक वाहनांचे चार्जिंग करणे सुलभ होणार आहे. तसेच विविध कामांसाठी तहसील कार्यालयात येणाऱ्या नागरिकांनाही या सुविधेचा लाभ घेता येणार असल्याची माहिती तहसीलदार अभिजीत जगताप यांनी दिली आहे माहूर हे राज्यातील एक महत्त्वाचे धार्मिक व पर्यटनस्थळ असून, श्री रेणुकामाता देवी दर्शनासाठी दरवर्षी लाखो भाविक येथे येत असतात. वाढत्या इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराच्या पार्श्वभूमीवर माहूर येथे उपलब्ध होणारी ही सुविधा भाविक व पर्यटकांसाठी विशेषतः उपयुक्त ठरणार आहे. त्यामुळे पर्यावरणपूरक वाहतुकीला चालना मिळण्याबरोबरच पर्यटन सुविधांमध्येही भर पडणार आहे. सध्या पेट्रोल व डिझेलच्या वाढत्या किमती तसेच जागतिक स्तरावरील विविध घडामोडी व युद्धजन्य परिस्थितीमुळे ऊर्जा सुरक्षेचे महत्त्व अधिक वाढले आहे. अशा परिस्थितीत पर्यायी व



स्वच्छ ऊर्जेचा वापर वाढविणे ही काळाची गरज आहे. इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी चार्जिंग सुविधांचे जाळे उभारणे ही अत्यंत महत्त्वाची बाब असून, त्या दृष्टीने माननीय जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांची ही संकल्पना अभिनंदनीय व दूरदर्शी आहे. या उपक्रमामुळे हरित ऊर्जा, प्रदूषणमुक्त वाहतूक व्यवस्था आणि शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांना चालना मिळणार असून, जिल्हा प्रशासनाच्या पर्यावरणपूरक उपक्रमांमध्ये आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला जाणार आहे.

# मुदखेड काँग्रेस कमिटी कार्यालयात राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात साजरी

दैनिक युवक आधार प्रतिनिधी : योगेश चौदंते

मुदखेड शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने रविवारी . ठाकरे चौक येथील शहर काँग्रेस कमिटी कार्यालयात राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती मोठ्या उत्साहात आणि आदरपूर्वक साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी ज्येष्ठ माजी नगरसेवक गोविंद गोपणपल्ले यांच्या हस्ते राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर उपस्थित मान्यवरांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी अहिल्यादेवी होळकर यांच्या समाजहितकारी कार्याचा, लोककल्याणकारी धोरणांचा आणि आदर्श शासनकारभाराचा गौरवपूर्ण उल्लेख करण्यात



आला. या कार्यक्रमास माजी नगरसेवक गोविंद गोपणपल्ले, माजी नगरसेवक गंगाधर डांगे, गटनेता प्रतिनिधी तथा शहर युवक काँग्रेस अध्यक्ष मुजीब पठाण, नांदेड जिल्हा काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस गिरीश कोत्तावार, सुभाष चौदंते, शहर युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष वेदांत शेवटे, विठ्ठल आचार्य, सामाजिक कार्यकर्ते रमेश बोडके, शेख गौसभाई फुलवाले, मोहनभाई फुलवाले, गंगाधर पाटील मगरे तसेच शेख अनिसभाई नायगावकर यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा आदर्श समाजाने घ्यावा, असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे वातावरण उत्साहपूर्ण व प्रेरणादायी होते. शेवटी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर जयंती मोठ्या उत्साहात साजरी

दैनिक युवक आधार
श्रीक्षेत्र माहूर: प्रतिनिधी/ सय्यद इसा

लोकमाता न्यायप्रिय आणि जनकल्याणकारी राज्यकर्त्या म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त माहूर शहरासह तालुक्यात ठिक ठिकाणी समाजप्रबोधन महिला सक्षमीकरण लोककल्याण आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देणारे कार्यक्रम साजरे करत जयंती उत्साहात साजरी करण्यात आली



पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर चौकासह श्री दत्तकृपा प्रतिष्ठान येथे जयंती साजरी करण्यात आली यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जीवनकार्य न्यायव्यवस्था महिला सक्षमीकरण धर्मकार्यातील योगदान आणि लोककल्याणकारी विचार यावर उपस्थित मान्यवरांनी आपले विचार व्यक्त करून उत्साहात जयंती साजरी केली

यावेळी माजी नगराध्यक्ष प्रा राजेंद्र केशवे ॲड रमण जायभाये नीलकंठ मस्के डॉ निरंजन केशवे संजय भाऊ राठोड ज्ञानेश्वर लाड गोपू महामुने अविनाश भोयर सौ राधा उपलेचवार राजु सौंदलकर विलास गावंडे तानाजी मनभे अनिल वाघमारे विनोद सूर्यवंशी नंदकुमार जोशी सर इलियास बावाणी अविनाश भोयर योगेश परसवाळे पुरुषोत्तम लांडगे कैलास महल्ले संतोष महल्ले सौ स्वाती आडे रामकृष्ण केंद्रे कैलास फड पवन पांढरे नवल वानखेडे बळीराम डुरके संतोष गंधे संजय गुरनुले परमेश्वर कानडे आनंद हिंगाडे संतोष हिंगाडे बालाजी गेंटलवार लव गावंडे दत्तकृपा प्रतिष्ठानचे विजय कांबळे यांचे सह मान्यवर उपस्थित होते तालुक्यातील मनीरामथड येथे पिंटू पाटील वायफनीकर यांचे सह मान्यवरांनी अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी केली तर तालुक्यात सर्व ठिकाणी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.